# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक ♦ वर्ष सातवे ♦ २५ डिसेंबर २०१७ ♦ संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो




BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD.1918
(SCHEDULED BANK)
MERRY CHRISTMAS
and a prosperous new year
Call Toll-Free: 1800 233 6000 | www.bccb.co.in
Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207

# ख्रिस्तायन

## नाताळ ई-अंक     वर्ष सातवे

## २५ डिसेंबर २०१७

### संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो

## अंतरंग

संपादकीय...

**कथा / ललित लेख :-**

दर्शन - जोसेफ तुस्कानो
याद राखा - वर्जेश सोलंकी
मै तेरी दुश्मन --- प्रा. नेहा सावंत
येशू बाळाचे दर्शन --- फा. एलायस रॉड्रीग्ज
ख्रिसमस... एक असेही सल - जॉन कोलासो
"तारपा वहारं कहाली रडं" - फा. आशिष रॉड्रीग्ज
"सोशल मिडीयावरून चालणारी - इग्नेशियस डायस
आणि जुळता जुळता तुटलं - सुहास बिऱ्हाडे
नकुशा - बेर्नादेत रूमाव
पिरेल काकाची बखर - सॅबी परेरा
लेखक - सिरील मिनेझीस
प्रौढ अविवाहीत - सायमन रॉड्रिग्ज
रावजी - आयवन क्रास्टो
साखळी - सिमसन रॉड्रिग्ज
झाड आणि माणूस - सबिना फोस
ती - पेट्रेशिया गोन्सालवीस
एक स्वप्न ! - सुनिल बी. डिमेलो
नास्तिक आस्तिक आणि... - सचिन सिल्वेस्टर रॉड्रिग्ज
ऊधळपट्टी - सुनील सायमन डिमेलो
यात मा का सुकला - सचिन रॉड्रीग्ज अठवरे डॉट कॉम
मुस्लिम कुटुंबानुभव..! - फ्रँक मिरांडा
इलेक्शन ड्यूटी - मिल्टन रिबेलो
आईपणाची आस - डॉ.रिबेका दोडती
लव्ह,लाईफ & एलिफंट... -- अपर्णा लव्हेकर

**कविता / चारोळया :-**

सायमन मार्टिन, फेलिक्स डिसोजा, महेश लिलापंडित, तनवीर सिद्दीक़ी, सचिन मेंडिस, एडवर्ड डिसोझा, डॉ. रिबेका दोडती, बर्नड लोपीस, रवीन्द्र लाखे, पास्कोल कोरिया, मेल्सीना तुस्कानो, रमेश सावंत, संजय लोहार, जिम रॉड्रिग्ज, एमेल आल्मेडा, फ्रँक मिरांडा

**कलाकुसर :-** ऑस्टिन डाबरे, रॉयल बी. रॉड्रिग्ज, पॉल डिमेलो, लिओनार्ड रिबेलो

**सहसंपादक – एडवर्ड डिसोजा**

**संपादन साहाय्य**

स्वप्निल रिबेलो     स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

सचिन सिल्वेस्टर रॉड्रिग्ज

अंक सजावट

**राजन जेरोम डिमेलो**

अंक मांडणी व तांत्रिक सहकार्य

**वनवसई टिम**

© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन

**संपर्क / अभिप्राय**

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा

ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrebello25@gmail.com
(9819436078)

१वसई :- admin@onevasai.com

**आभार**

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

# संपादकाच्या लेखणीतून...

प्रिय वाचक बंधू-भगिनींनो, प्रथम आपणा सर्वांना नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा. पुन्हा एकदा "ख्रिस्तायन"चा हा अंक आपल्यापाशी घेवून येताना खूप आनंद झाला आहे. मराठी साहित्य क्षेत्रात नाताळ अंक रूपी चळवळीचा हा आमचा एक छोटासा प्रयत्न आहे. ही चळवळ अधिक फोफावी अशी आमची इच्छा आहे. ह्या रोपट्याला अनेक फांद्या आणि फळे पुढे लगडतील अशी आशा बाळगतोय किंबहुना तसा एक दुर्दम्य विश्वास मनी नक्कीच आहे.

वसईतील ख्रिस्ती समाजाच्या नाताळ सणाची एक वेगळी खासियत आहे. नाताळ सणाचा आनंद, हौस आणि मजा काही औरच असते.. डिसेंबर महिना सुरू झाला की आपल्या चित्तवृती एकदम उल्हासून येतात. मनाला एक चैतन्य प्राप्त होते, मन हौशी होते. कारणही तसेच असते ना... गुलाबी थंडीचे दिवस आणि नाताळ सणाची चाहुल... नाताळ गीतांची धुन कानी पडायला सुरुवात होते... नवीन कपडे खरेदी... केक फराळाची तयारी.. रंगीबेरंगी दिव्यांची रोषणाई... सगळं कसं हवंहवंसं वाटणारं...

आम्हीही ह्याच आनंदात हौसेने मजा लुटण्यासाठी गेली सात वर्षे "ख्रिस्तायन" ऑनलाइन नाताळ अंकाद्वारे सामील होत आहोत. पुर्णपणे नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा "ख्रिस्तायन" हा पहिला प्रिंट व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

वसई परिसरातील नव लेखक-कवींना आणि चित्रकारांना आपल्या साहित्य कृतीद्वारे आणि कलेद्वारे लोकांसमोर आणण्यासाठी एक चांगला "प्लॅटफॉर्म" म्हणून हा अंक आहे आणि असणार आहे, पण त्याच बरोबर प्रथितयश लेखक-कवींना सुद्धा आम्ही या चळवळीत सामावून घेतले आहे.. ज्येष्ठ कवी सायमन मार्टिन, विज्ञानलेखक जोसेफ तुस्कानो, फा. एलायस रॉड्रिग्ज, जॉन कोलासो, प्रा. नेहा सावंत, वर्जेश सोलंकी, महेश लिलापंडित, इग्नेशियस डायस, फेलिक्स डिसोजा, ललित लेखिका बेर्नादेत रुमाव आणि कवियत्री सबीना फोस हे दिग्गज आमच्या या चळवळीत सहभागी झाले आहेत. आमचे मित्र सायमन रॉड्रिग्ज ह्यांनी लागोपाठ सातव्या वर्षी आमची बोलीभाषा "कादोडी" भाषेतील लेखासह आपला सहभाग दर्शविला आहे.

माझ्या मराठी मायबोलीला शतकांपासूनची दिवाळी अंकांची मोठी परंपरा लाभली आहे. दिवाळी सुरु झाली की सगळ्यांनाच वेध लागतात ते दिवाळी अंकांचे. दिवाळीच्या फराळाबरोबरच साहित्याचाही फराळ चवीनं चाखला जातो. असेच वेध नाताळ सण जवळ आला की लागावेत म्हणून या दिवाळी अंकांच्या धर्तीवर नाताळ अंक काढण्याचे धाडस आम्ही गेली सात वर्षे करतो आहोत. आजच्या मोबाईल आणि इंटरनेटच्या जमान्यात वाचनसंस्कृतीची बिकट वाट सुरू आहे. त्याला उत्तर देण्याचे सामर्थ्य अशा अंकातून आम्हाला निर्माण करायचे आहे कारण वाचनसंस्कृती वाढली तरच आपल्या जगण्याला नवा अर्थ आहे; म्हणूनच त्याच मोबाईल आणि इंटरनेट माध्यमात ऑनलाइन अंक आम्ही प्रकाशित करत आहोत. वाङ्मयाची निर्मिती केवळ विचारातून नव्हे, तर अनुभवातून होते आणि हे अनुभव आपल्याला जीवन जगण्यास दिशा देणारे असतात. कला आणि साहित्य निर्मितीमध्ये अनुभूतीला पर्याय नाही.

हा अंक 'पीडीएफ' स्वरुपात सुद्धा आम्ही देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**Merry Christmas & Happy New Year.**

# दर्शन --- जोसेफ तुस्कानो, बोरीवली (प)

विजय, उत्तर वसईतल्या खारभाट गावचा तरुण. बी. एस्सी. होताच त्याला टी. आय. एफ. आर. ह्या शहरातल्या प्रख्यात संशोधन संस्थेत नोकरी मिळाली. फिजिक्स व मॅथ्स घेऊन फर्स्ट क्लास मिळविल्याने, तसेच त्याच्या इंटरव्ह्यूमधील अचूक व हजरजबाबी उत्तरांनी खूष होऊन, त्या संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख व जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. परळीकर ह्यांनी त्याला आपल्या विभागात असिस्टंट म्हणून निवडले होते….. विजय तसा बालपणापासून खुशाग्र बुद्धीचा होता. शाळेपासूनच अभ्यासात चमकत होता. विज्ञानाची आवड तर त्याला प्राथमिक शाळेपासूनच लागली होती. त्याचे दोस्त जेव्हा गोष्टींची पुस्तके वाचण्यात मग्न असायचे तेव्हा हा विज्ञानविषयक पुस्तकांची चाळणी करीत बसायचा. त्यातच गावचं वातावरण त्याचा छंद जोपासायला पोषक ठरत होते. त्यामुळे शाळेतील पाठ्यपुस्तकातून शिकण्याअगोदरच ‘आकाशाचा रंग निळा का?’ दिवसरात्री का होतात?’ ‘मडक्यात पानी थंड का राहते?’ ‘उन्हाळ्यात बेडूक गांडुळादी प्राणी कुठे असतात?’ ‘समुद्रकाठी गोलाकार वाळू का आढळते?’ ‘स्टार्च अन्न बनविण्याची रासायनिक किमया वनस्पतीच्या हिरव्या पानांनी कशी अवगत केलीय?’ इत्यादी प्रश्नांची उत्तरे त्याने आपल्या वडीलधाऱ्यांना व शिक्षकांना सतावून माहिती करून घेतली होती.

पावसाळ्यात आकाशात दिसणारे, सप्तरंगी इंद्रधनुष्य त्याला वेडावून टाकायचे, तर काळोखात लुकलुकणारे काजवे त्याला भुरळ घालायचे. त्यांच्यामागे कुतुहलाने अवलोकन करीत सायंकाळच्या काळोखात घराजवळ अरुंद रस्त्यावर भटकत असताना, शेतावरून परतणाऱ्या आईच्या हातचे धपाटेदेखील त्याने खाल्ले होते.

एकदा तर त्याने काही काजव्यांना अलगदपणे पकडून पुठ्ठ्याच्या एका बाजूने बंद असलेल्या नळकांडीत कोंबले व त्याचे दुसरे तोंड एका काचेच्या गोलाकार तुकड्याने बंद करून एक नैसर्गिक विजेरी तयार केली होती. पण हाय! त्याच्या वडीलधाऱ्यांनी त्याची अनमोल कृती बालिश समजून कुचकामी ठरविली होती. तरी देखील त्याच्या बालमनाची विज्ञाननिष्ठा प्रचंड वेगाने वाढतच गेली. मात्र, त्याच्या धार्मिक कुटुंबात त्याची काहीशी कुचंबणा होई.

आणि विजयचं कुटुंब अगदी धर्मभोळेच होते म्हणाना. त्याचे वडील चर्चमध्ये क्वायर मास्टर होते. पंचवीस वर्षापूर्वी खारभाटात पॅरिश प्रिस्ट म्हणून नेमल्या गेलेल्या गोवेकरी फादरांनी विजयच्या वडिलांना व्हायोलिनचे धडे दिले होते, नि हा हा म्हणता अक्षराचा गंध नसलेले तात्या उत्कृष्ट व्हायोलिनवादक बनले. चर्चमध्ये मिस्सा प्रार्थनेच्या वेळी, लॅटिन गीतांना ते आपल्या व्हायोलिनची साथ देत तेव्हा काहीच अर्थ न समजूनसुद्धा निव्वळ भक्तिभावाने तोंडपाठ केलेल्या त्या प्रार्थनागीतांना वेगळीच खुमारी प्राप्त होई. चर्चमध्ये बलिदानवेदीची सजावट करणे, आयमेरीची बेल वाजविणे, फादरांचा स्वयंपाक करून त्यांना घरकामात मदत करणे अशी सटरफटर कामे तात्या फावल्या वेळी करीत, मग गावचे लोक लग्न, बाळाचा बाप्तिस्मा या सारख्या सुप्रसंगी तात्यांना ‘पोस्त’ देत... तात्यांच्या श्रध्दाळू वृत्तीमुळे त्यांच्या कुटुंबातील अन्य मंडळीदेखील सतत देवभक्तीच्या प्रभावाखाली वावरत असत, विजयचा अपवाद सोडला तर!

ह्या खारभाटला लागूनच वाघोली गाव वसलेले आहे, फातीमा माऊली हे वाघोलीचे दैवत आणि मे महिन्यात फातिमा माऊलीचा नोव्हेना सुरू झाला की, परिसरातील ख्रिश्चनच नव्हे तर अन्य धर्मीयसुद्धा माऊलीला गाऱ्हाणी घालण्यासाठी नोव्हेनाच्या प्रार्थनेला हजर राहतात. सतत पंधरा दिवस हा नोव्हेना चाले व नोव्हेना भेटविलेले वारकरी न चुकता नेमाने नऊ दिवस वाघोलीला येत. कुणी परीक्षेत घवघवीत यश मिळावे म्हणून माऊलीला नोव्हेना भेटवित असे. एखाद्याचं आजारी मूल माऊलीच्या कृपेने खडखडीत बरे झाल्यामुळे आभार मानण्यासाठी नोव्हेना भेटविण्यात येई. एखादा धंद्यात बरकत यावी म्हणून नोव्हेनाच्या प्रार्थनेत माऊलीशी मागणी करी. प्रत्येकाच्या वेगळया मागण्या व वेगळी गाऱ्हाणी. खारभाटचे भाविक तर वर्षानुवर्षे ह्या नोव्हेनाला हजर राहत आलेले आणि या वर्षी ती अद्भुत घटना घडली! साऱ्या वसई तालुक्यात नि परिसरात त्या बातमीने खळबळ माजविली होती. गाडीघोड्यात ही वार्ता कर्णोपकर्णी झाली होती. वसईचे मुखपत्र मानल्या जाणाऱ्या स्थानिक 'परिवार' साप्ताहिकाने १० मे १९६० रोजीच्या खास रिपोर्टात खारभाटला आपला खास प्रतिनिधी पाठवून चक्षूवैसत्यम मिळवलेली माहिती छापली होती. ती माहिती खूपच अद्भुत होती.

**"माऊलीचे छोट्या मुलांना दर्शन**

*वसईच्या उत्तरेस असलेल्या खारभाट गावातील दोन छोट्या मुलांनी दोन दिवसापुर्वी आपल्याला फातीमा माऊलीने दर्शन दिल्याचं दावा केल्याने गावात भक्तीची प्रचंड लाट उसळली आहे. आमचे खास प्रतिनिधी श्री. न्यायेश गासकर ह्यांनी खारभाट गावात सबंधित लोकांशी प्रत्यक्ष चर्चा केल्यानंतर खालील हकीकत समजली गेल्या आठवड्यापासून खारभाटलगत असलेल्या वाघोली गावी माऊलीचा नोव्हेंना सुरू झाल्यामुळे खारभाटची काही मंडळी पहाटे पाच वाजता नोव्हेनाच्या पहिल्या प्रार्थनेला जायला निघाली होती. खारभाट व वाघोली गावांच्या मधोमध निळडोंगरी नावाची लहानशी टेकडी ऐसपैस पसरली आहे. ही टेकडी ओलांडली की वाघोलीतील चर्चचा क्रॉस दिसू लागतो. झपाझप पावले टाकीत खारभाटची मंडळी निघाली होती. जरी सगळे एकत्र घोळक्याने निघाले होते, तरी मुलांचा नि मोठ्यांचा असे दोन गट पडले होते.*

*दुधाळ चंद्रप्रकाशात हुंदडत खिदळत मुले पुढे पुढे जात होती नि त्यांचे आईबाप मागोमाग येत होते. आज नोव्हेंनाचा पाचवा दिवस होता... रॅचेल नि सिरील ही सातवीत शिकणारी मुले, त्या दिवशी सगळ्या ग्रुपला मागे टाकून ती दोघे निळडोंगरीच्या कडेकडेने पुढे निघाली होती. टेकडीच्या पलीकडे वाघोली गावच्या हद्दीत येणारा चक्रेश्वर तलाव स्तब्धपणे पहुडला होता. त्याच्या पांढऱ्या शुभ्र पाण्यात मिटलेली कमळे थंडगार वाऱ्याच्या झुळकेसोबत डूलत होती. कमरेत वाकून नि तळव्यावर जोर देत त्या दोन मुलांनी ती उंच वाट पार केली, तोच टेकडीच्या दुसऱ्या बाजूस दिसलेल्या एक विलक्षण चमत्कारिक दृश्याने ते दोघेही दिङ:मुढ झाले. किती घाबरले ते! तोंडातून चकार शब्दही बाहेर पडेना. एका आकर्षक गोलाकार वस्तूवर पायघोळ वस्त्रे घातलेली एक मानवी आकृती उभी राहून त्या मुलांना खुणावीत होती. क्षणातच त्या मुलांना काल नोव्हेनाच्या वेळेला फादरांनी सांगितलेली गोष्ट आठवली. पोर्तुगालमधल्या एका गावी फातिमा माऊलीचे तीन मुलांना दर्शन होते, ती गोष्ट!*

*दोघांनी त्वरित गुडघे टेकले नि त्या आकृतीला माऊली समजून नमस्कार करण्यासाठी माना खाली घातल्या. पुन्हा नजर वर करण्याचे धाडस केले तर*

*समोरचे ते मनोहर दृश्य दिसेनासे झाले होते व मागाहून आलेल्या मंडळींनी त्यांना घेरले होते. कावऱ्याबावऱ्या अवस्थेतील गुडघे टेकलेल्या त्या दोघांना पाहून मंडळी तशी चकीतच झाली होती. रेचेल-सिरीलनी घडलेला तो चमत्कार कसाबसा त्यांना ऐकवला. क्षणभर कुणाला उलगडाच होईना! पण हळूहळू त्या मुलांच्या दृढ सांगण्यावरून त्या भाविक वारकऱ्यांचा विश्वास बसला. टेकडीच्या पलीकडे असल्यामुळे आपणास माऊलीचे दर्शन होऊ शकले नाही; ही खंतावलेली हुरहूर त्यांच्या मनाला चुटपुट लावून राहिली होती. फादरांनी सरमनमध्ये सांगितलेल्या गोष्टीतील मुलांप्रमाणे फातीमा माऊली आपल्याकडील मुलांच्या असीम भक्तीवर प्रसन्न होऊन त्यांच्यापुढे क्षणभर प्रगट झाली असावी, ही भावना त्यांच्या मनावर ठसली. हा म्हणता फातिमा माऊलीने खारभाटच्या दोन मुलांना दर्शन दिल्याचे वृत्त सर्वत्र पसरले. निर्मळ गावच्या बाजारात भाजीपाला विकता-विकता चविष्टपणे गप्पा करायला एक सनसनाटी विषय शेतकरी बायकांच्या हाती आयताच मिळाला होता. तिखटमीठ लावून मग तो विषय चारी अंगांनी वाढविल्याने प्रचंड आकार लेवून बसला होता. काही भाविकजण तर रेचेल सिरीलना भेटून देखील गेले. कुटुंबात, शाळेत, गावात सगळीकडे त्या मुलांचा भलताच भाव वाढला होता.''*

दुसऱ्या दिवशी, 'माऊली पुन्हा दर्शन देणार!' ही अफवा पसरल्याने खारभाट व परिसरातील लोकांचा प्रचंड समुदाय पहाटे साडेचार वाजता नील डोंगरीच्या पायथ्याशी जमा झाला होता. गटागटाने चालू असलेल्या प्रार्थनेने व गीतांनी पहाटेची नीरव शांतता भंग पावली होती. मुले-मुली, स्त्री-पुरुष दाटीदाटीने उभे होती. काही जण हात जोडून व गुडघे टेकून आकाशात तुरुतुरु धावणाऱ्या ढगाकडे मोठ्या आशेने नि भक्तीने पहात होते.

सहज उत्सुकतेपोटी पहाटे उठून विजयदेखील ह्या गर्दीत सामील झाला होता. 'ती पहा, ती पहा!' कुठून तरी आवाज उमटायचा व सगळ्या नजरा सर्र्कन त्या दिशेने वर सरकायच्या. परंतु गोष्टीतल्या 'लांडगा आला' ही हाक ऐकणाऱ्या शेतकऱ्यागत सगळ्यांची फसगत व्हायची. वेगाने पळणाऱ्या चित्रविचित्र काळ्या-पांढऱ्या ढगाखेरीज आकाशात काहीच दिसत नव्हते. पण लोकांच्या उतू जाणाऱ्या भावूकतेला काही ओहोटी लागेना. उजाडल्यावर मात्र सगळे घरी परतले. नोव्हेंना संपेपर्यंत हाच प्रकार थोड्याबहुत फरकाने चालू राहिला...

लॅबमध्ये निवांतपणे बसल्या बसल्या विजय हा एकूण प्रकार आठवीत असता, लोकांच्या खुळेपणाबद्दल त्याच्या ओठावर हसू फुटले, त्याचवेळी त्याचे बॉस परळीकरांनी त्याचे ते हास्य अचानक पकडले. तेव्हा विजयने त्यांना संपूर्ण कहाणी ऐकवली. त्याची ती कहाणी ऐकता-ऐकता डॉ. परळीकर काहीसे गंभीर बनले. तत्काळ विजयला घेऊन ते संस्थेच्या लायब्ररीत घुसले. १० मे १९६०चा 'न्यूयॉर्क टाइम्स' काढून त्यांनी विजयच्या पुढ्यात ठेवला. पहिल्या पानावर एका चौकटीत एक ठळक बातमी छापली होती.

८ मे च्या रात्री आशिया खंडात विविध ठिकाणी गोलाकार व आकर्षक स्वरूपाचे अवकाशयान अनेकांच्या दृष्टीस पडल्याचे वृत्त त्या चौकटीत होते. काही लोकांनी तर त्या यानातून पायघोळ कपडे घातलेल्या मानवी आकृत्या बाहेर पडताना पाहिल्याच्या साक्षी दिल्या होत्या. अधिक तपासांती, 'हे अवकाश यान परग्रहावरून आलेली उडती तबकडी असावी' असा अंदाज तज्ञांच्या गोटांतून व्यक्त करण्यात आला होता. 'न्यूयॉर्क टाइम्सा'तील ती चौकट वाचून होताच विजय व डॉ. परळीकर परस्परांकडे नुसते पाहात राहिले.

(सौजन्य : शास्त्रज्ञ – विज्ञान कथासंग्रह-१९९२)

# याद राखा --- वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

यादी राखा.मुर्ख माणसांनो.

लुख्खा भगवानदासचा आवाज एकदम मस्त रंगात आलेला. पावशेर कामाला आलेली. अख्ख्या दिवसाचि रिश्रा बुक केलेली. रिक्षा गल्ली बोळातुन फिरत निघालेली.

पुन्हा तोच टीपेचा सुर कमावलेला.

आमचे नॉर्मस ठरलेले आहेत. हा केवायसीचा फॉर्म भरा. तुमचे सगळे नॉर्म भरा.तुमच्या खात्यात किती रक्कम जमा आहे ते जाहीर करा. तुमच्या फोन मधून कोणाला किती कॉल केले गेले ह्याची यादी द्या. आम्हाला पारदर्शकता आणायची आहे. दिवसभरात झालेल्या संभाषणाची लिखित स्वरुपतात माहिती द्या.

मधुनच कोणीतरी अडवुन विचारपुस करायचं. काय चाल्ल आहे हे लुख्खा भगवानदासला पाठ केलेले संवाद माहित होते. आपण काय बोलतोय कशाविषयी बोलतोय कुणाविषयी बोलतोय ह्याचं काहीही त्याला सोयरसुतक नव्हतं. आपला आवाज चांगला आहे. पहाडी कबाब खावुन, मस्त करारी झालेला आहे.

तळागाळातल्या माणसांपर्यतं आवाज पोहचला पाहिजे ह्याची सुपारी त्याला हायकमांडकडुन दिली गेलेली. काही मुठभर मुद्रा फेकल्या की असे लुख्खे भगवानदास पायलीला पन्नास हे अस्मादिकांना माहित होतं. खुप कुंथुन, कोठे काड्या टाकुन सोशल मिडियाचा बनावट व एक सध्याच्या भाषेत एका वर्च्युअल जगावर अधिराज्य गाजवुन ब—याच लोकांना बोलबच्चन करुन, गंडवुन, बनवुन त्यांच सरकार आलं होतं. एक मोकळा श्वास सोडला होता. झोपाळ्यावर मस्त रेलुन पुढची मांडणी काय करायची अशा स्वपनाच्या दुनियेत रमताना त्यांना खुप मजा येत चाललेली. दुनिया बनती है बनानेवाला चाहिये असा एक फिल्मी संवाद त्यांना आठवला.अब दुनिया की कोईभी ताकत हमे रोक नही सकती.

बहुमतात आल्याचा हा फायदा असतो. त्रिशंकु सरकार आलं की विरोधक साले टोचत राहतात. धम,क्या देतात. अरेरावी करतात. जगु व मरु देत नाही,.फोडाफोडिचं राजकारण करतात.नशिब लोकांनी भरघोस मतं दिली. आपण जी काही संडासात बसुन कुंथलेली भाषणं पाठ केली ती कामाला आली. लोकं पण सज्जन व भोळी आहेत. मतदान करुन त्यांनी मालामाल केलं. आपल्या आव्हानाला मान दिला. ह्यावेळेला सगळे योग एकदम मस्त जुळुन आलेले. आपल्या मास्टर माईंड मुलतान का सुलतान ह्याने मस्त सगळी ठिकाणी सेटिंग लावलेली. घरोघरी माल रातोरात पोचता झालेला. बॅनर व होर्डींग, टीव्ही व वृत्तपत्रातल्या माध्यमांतुन आपली रखरखीत छबी झकासपणे मांडुन आपलाच पक्ष कसा काय विकासाचा महामेरु आहे हे पटवण्यात यश मिळवलेलं.सगळी माणसं आता आपल्या हाताशी आहेत. आपला शब्द झेलणारी मोठी फौज आहे.जिथे नजर फिरवु ती जागा आता आपली आहे. ज्यावर जीभ फिरवु तो जिन्नस आता आपला आहे. आता कोण विरोधक नाहीत ह्या जाणिवेची लहर हिरव्या गार लॉनवरुन चालताना उमटुन गेली.

बायकोला बोलु मस्त चहा बनव. फस्टक्लास. लालदिव्याची गाडी गांडीखाली असली म्हणजे ॲम्बुलंस सारखीच तिला ट्रीटमेंन्ट.मागे पुढे आता आपल्या सगळा सरकारी लवाजमा. सरकार आल्यावर अशा गमतीजमती असतात व त्या आनंदाने अनुभवयाच्या ह्या जाणीवेची एक मस्त कलरफुल कारंजी बायकोच्या हातचा गरमागरम चहा घेताना हा चहा व ही वेळ पुढे सरकुच नये असं त्यांना वाटत राहिलेलं.

एकदा सरकार आल म्हणजे कस काय फ्री ऑफ कॉस्ट असत. कार्यालय घ्यायची झंझट नाही, निवासस्थानामागे पळण्याची गरज नाही. सबसिड्या झुकुन सलाम करत असतात.इतकी वर्षे साला खिषातुनच माल जात होता. आता सहजपणे दुस-याच्या खिषात हात टाकुन दिवाळी साजरी करण्याची संधी आपल्या गुरुजींनी दिलेली आहे. आपल्या गुरुवर्यांना आणून थोडं शुर्चिभुत करुन घ्या असा त्यांच्या कुंकवाने आदेश देताच तस फर्मानही निघालं.गोमुत्राने अख्खं कार्यालय धुवून काढलं व कुलदेवतेची मूर्ती ठेवुन पन्नास ब्राम्हणांच्या हस्ते पुजा करुन घेतल्यानंतर त्यांच्या मंगलसुत्राने श्वास सोडला.

अजब तुझे सरकार हे कुठेतरी वाचल होत त्याचा असा प्रत्ययही आला.

लुख्खा भगवानदासला मात्र कंत्राट  मिळालं होतं. त्याचा वारु जोरदार उधळलेला.नव्या सरकारचे नवे मनसुबे होते नवे आदेश होते. त्याची अंमलबजावणी होती. देशविदेशातुन माणसं बोलावुन येथल्या मळक्या कपड्याच्या लोकांतून, पडकी छप्पर दाखवुन, बंजर झालेल्या जमिनीची धूळ त्यांच्या नाकातोंडात घालुन हरी हरी वसुंधरा पे निला निला ये गगन असं गाणं ऐकवुन त्यांच्याकडुन ब-यापैकी फंड व लाल गाजर व टमाटर त्यांनी दाखवलेला. त्यांच्या तोंडातुन पण लाळेचा एक मस्त थेंब टपकलेला.

हे तुमचे बटाटवडे काढा येथून.

ही तुमची मिसळ शेपाटा हिला येथून

ही तुमची भेळ पळवा हिला येथून

हा तुमचा झुणका भाकर आग लावा त्याला

उद्यापासून आमचा पिझ्झा बर्गर येणार आहे

परवा पासून पोटॅटो चिप्स येणार आहे विथ कोक

आमच्या सीलबंद पॅकेटसाठी रेड कारपेट घालून ठेवा

ह्या तुमच्या चीज वस्तूचे जाहिरातीचे फलक फाडून टाका दोन दिवसात

उद्या आमच्या मालाची जाहीरात येणार आहे सगळ्या चॅनलमधून

ही तुमची लुगडीफुगडी धोतरबितर बुशर्ट फेटाबिटा पादुकाबिदुका चालणार नाहीत. असे घालून रस्त्यावर फिरलात तर शेंडा धरु तुमचा. दिसाल तेथे बुकलून काढू.

रोज नव्या फॅशनचे सेल लागणार आहेत तुमच्या गावगल्लीत

फुटपाथवर बसून मालाची ओरडाओरडी करुन माल विकणे बंद करा.

गाव गाव म्हणून तुणतुण वाजवू नका.

उद्यापासून भव्य सेल लागणार आहे आमच्या चीज वस्तूंचा तोही ऑनलाईन

काय असत हे ऑनलाईन मध्येच कुणीतरी विचारलं लुख्खा भगवानभायला ते काय माहित नव्हतं. त्याने संवाद काल आरशासमोर पाठ केलेले. सकाळी शौचाला बसुन मनातल्यामनात त्याची घोकमपट्टी केलेली. लाईन त्याला माहित होती. ऑन बद्दल त्यालाही संभ्रम होता. त्याचा मतलब काय ह्याच्याशी त्याला देणघेन नव्हतं. आपला आवाज मस्त टिपेला जावुन झोपलेले बाळ पण उठलं गेलं पाहिजे एवढच त्याला माहित होतं. पुन्हा समोरच्यानं विचारल. काय हे ऑनलाईन. स्वातंत्र्याला दहा शतके उलटुन गेली तरी गाव हे गाव होतं.

गावात अनेक सुविधा यायच्या बाकी होत्या. गाव गावासारखच राहायला पाहिजे. खेडुत खेडुतच असला पाहिजे. त्याला जास्त शिकवुन काही मतलब नव्हतं. त्याच्या अडाणीपणातच फायदा होता

ह्याआधी बरीच सरकार येवुन गेलेली.स्वातंत्र्य हा शब्द अगदि चावुन चोथा झालेला. जेजे गादीवर आले त्यांनी, त्यांच्या नातलग सगेसंबंधित,मित्रांनी मिळून मस्त चमचमीत जेवण, जमीनजुमला वर ताव मारलेला.सगळे रस्ते, शाळा, संस्था, अकादम्या ह्यांना आपापल्या बापाची नावे टाकुन मोकळी झालेली. झाडे कापुन नेलेली. डोंगर सपाट केलेला. नद्यांची कमर बारीक करुन नाल्यांचे पोट वाढवलेले.ज्याला ज्याला जसजस जमेल तसं त्याने घाईने ओरपाओरपी केलेली.

च्यामारी आपल्याला काय करायचय डोकं खाजवुन. मेंदुच्या तारा लाल करुन. आहे आहे बाबा सगळ. ऑनलाईन होणार आहे. लोकांच्या प्रश्नांना उत्तरे देवुन त्याचा जीव कातावुन जायचा. पण काय करणार गंदा है लेकिन धंदा है ये.

सगळ्यांनी घेतलं म्हणुन लुखखा भगवानदास ने पण जुजबी शिक्षण घेवुन जुजबी पोटापुरता पगार असलेली नोकरी मिळवलेली. नोकरीशिवाय गत्यंतरच नव्हतं. गावात शेतीशिवाय उत्पन्नाची साधनं नव्हती. मात्र शेतीचीही काही धडगत नव्हती. कामाला जायच म्हणजे शहर गाठावं लागायचं. शहर गाठायचं म्हणजे गांडीचे टाके ढिले व्हायचे. त्याशिवाय पर्याय नव्हता. कशाबशा लागलेल्या नोकरीत मालाला उठाव कमी झाल्यामुळे कंपनी काही वर्षानंतर बंद पडली. उपासमारीची वेळ सुरु झाली. अशातच त्याला त्याच्या आवाजाने साथ दिला. कुठेकुठे निवेदन कर, लग्नसराईत फिल्मी सितारेंचे आवाज काढ, मय्यतमातममध्ये भजनकीर्तन झोड अस करुन उदरनिर्वाह करताना. राजकीय लोकांच्या पत्रावळी उचलण्याच काम त्याला मिळालेलं. त्यातुन ब-यापैकी कमाई व्हायची.

पुन्हा त्याने भोँगा तोंडाला लावलेला.

रेशनची नो लाईन,

तिकिटासाठि नो लाईन,

पेन्शसाठी नो लाईन,

ॲडमिशनसाठी नो लाईन,

बसथांब्यावर नो लाईन,

देवळाच्या बाहेर, देवळाच्या आत नो लाईन,

लघवीसाठी नो लाईन

वीज बिल भरण्यासाठी नो लाईन

तहसिलदाराच्या कचेरीसमोर नो लाईन

सायबाच्या केबिन पुढ्यात नो लाईन

समजेल तुम्हाला डेबिट कार्ड, क्रेडिट काड इंटरनेट बॅकिंग,विजा कार्ड, रुपे कार्ड ,आयएमपीएस, कॅश कार्ड इ-वॉलेट

नवे युग अवतरणार  आहे.

पुन्हा कोणीतरी म्हणालं रेशन कार्ड हाय आमच्याकडे केसरी.

रेशनकार्डला कोन विचारते ते तर बंगाली लोकांकडे दोन दोन आहे. युपीवाल्याकडे चार चार आहेत.वोटींग कार्ड दोनदोन आहेत.

आता मेक इन इंडिया चालु आहे.सगळं मस्त मस्त होणार आहे. आधुनिक प्रणाली येणार आहे.

अच्छे दिन येणार आहेत.

आता बैलगाडी, औत, नांगर, जात, गावगाडा, चावड्या, चौक, गल्ल्या  मोहल्ले , कौलारु घरे, पडिक जमिन विसरायच. रिक्षा टमटम सगळ जुनाट विसरायचं.

गाव आता स्मार्ट सिटी होणार आहे.

लाल रंगाची बस, त्यामागुन उडणारा धुराळा, छप्पर नसलेलं स्टॉप, पानाच्या टप-या, खाडखुड रस्ते, दुतर्फा करुन असेलेली झाड. क्षितिजापर्यंत पसरलेली शेतीभाती, आता गावात तुमच्या बुलेट ट्रेन येणार आहे. बुलेट लाईट येणार आहे.आरामदायी बस येणार आहे. गावगल्लीतून मेट्रो ट्रेन धावणार आहे. आहात कुठे तुम्ही राव. आहात कुठे तुम्ही रंगीत रंगीत टीव्हीमधुन रंगीतरंगीत जाहिराती आता पाहायच्या. मिक्सर ग्राईंडर मधुन मस्त डोसा इडलीचं पीठ बनवायचं. पीठाच्या गिरण्या बंद. आता रेडीमेड आटा येणार आहे, पाईपातून गॅस व दूध मिळणार आहे,. प्लास्टीक बंदी होणार आहे. पुन्हा खादी युग येणार आहे. ओट्याबर बसायच व मस्त सुत कातायचं. खादीला जाम डिमांड आहे. बाहेरच्या देशात जाम मागणी आहे.

लुख्खा भगवान भायला जे आठवत होत तसं तो पोपटासारखा बोलत सुटलेला. बोलताना त्याला पण मस्त वाटत होतं. काही माणसांना पटवण्यात त्याला यश येत होतं. यश येवो कि न येवो आपल्याला आपली बिदागी मिळायला हवी. गावाचा काहीही सत्यानाश होवो आपल्या खिशात दिडक्या यायला हव्या ह्या मताचा तो आता बनला होता.कधीकाळी तोही संवेदनशील होता. कुठेकाही दुखलखुपल तर काळजात चर्र व्हायचं लेकिन हालातने उसे एकदम निगरगट्ट बना दिया. काळानेच त्याला ह्या वेशीवर आणुन ठेवलेल होतं. कोणी जीवजग्या म्हटलं किंवा अस्मादिकांचा लंगोटी म्हटलं तरि त्याला काही फरक पडणार नव्हता.

नवीन सरकार एकदम जोशात होतं. काय करु व  काय नको करु असं झालेलं. दहा वेळा एकाच विषयात आपटी खाल्ल्यावर पास झालेल्या विद्यार्थ्यासारखी नव्या सरकारची अवस्था झालेली.

पास होण्याचा आनंद गगनात मावेनासा झालेला.

ह्याच आनंदाच विरजण पडलं झालं काय त्यांचं मंगळसुत्र हलवाईच्या दुकानात कंदी पेडे घ्यायला गेलं तर हलवाई शभर रुपयाची नोट हवेत नाचवुन बोल्ला ताईसाहेब ही तर जाली आहे. बघा ह्यावर गांधीबाबाच्या चेह-यावर चष्माच नाही. खरं होतं मंगलसुत्रानं दहावेळा नोट पाहिली पन्नास वेळा गांधीबाबाचा फोटो पाहिला चष्मा नव्हता. दुस-या एका नोटावर चष्मा होता. तिच्या मेंदुच्या तारा तणतणतल्या एकदम तारक मेहता.तातडीने घरी येवुन त्यांनी अस्मादिकांना ही बाब लक्षात आणुन दिली. ये बात है. हमारे रामराज्य मे ऐसी बात.त्वरीत त्यांनी लुख्खा भगवानदासला बोलावुन घेतल व गावगल्लीत दवंडी पिटवायला सांगितली की उद्यापासुन शंभरची नोट ही व्यवहारातुन बाद होईल म्हणुन. एक सप्ताहाच्या मुदतीत नोट बॅन्केत जमा झाली पाहिजे नाहीतर सदर व्यक्तीवर कारवाई केली जाईल असे फर्मान निघाले. बायकोच्या डोळयात आलेली आसवे अस्मादिकांना पाहवत नव्हती. ही जाली नोट आली कुठुन.

लुख्खा भगवानदासला ह्यामुळे काही फरक पडणार नव्हता. त्याने खिसे, आईने डबे झाडुन पाहिले शंभरची काय तर दहाची नोट नव्हती. त्याने नसबंदी ऐकली होती. दारुबंदी ऐकली होती. नोटबंदी हे काय रामायण आहे समजायला मार्ग नव्हता.

सगळीकडे हाहाकार उडाला. बातमी गावाच्या कान्याकोप-यात गेली. दोन दिवसात नोटा बॅन्केत जमा झाल्या पाहिजेत नाहीतर संबंधित व्यक्तींवर कार्यवाही केली जाईल. अस्मादिकांच्या मंगलसुत्राला शंभरची जाली नोट पाहुन रात्री झोप आली नाही. कुणा टवळ्याने आपल्या हातात टेकवली ह्यावर विचार करुन मेंदुचा भुक्का व्हायचा बाकी होता.नोटा बॅन्केत जमा करण्यासाठी लोकांची बॅन्केसमोर मोठी लाईन लागलेली. एरवी कधी न दिसुन येणारी सामान्य माणसं नोटांची पुंडकी घेवुन उभी राहताना लुख्खा भगवानदासला मजा आली. बॅन्केत नोटाच नव्हत्या. नव्या नोटा छापण्यासाठी यंत्रणा नव्हती. कागद नव्हता, शाई नव्हती. अस्मादिकांनी घाईघाईने भावनेच्या भरात निर्णय घेतलेला.निर्णय माघारी घ्यावा तर घरात मंगलसुत्राच्या डोळयांच्या मोठ्या दहशतीचा सामना असायचा.

लुख्खाने अशा गोष्टी सिरियस घेण्याचं काहीच काम नव्हतं. अशा घटना घडल्या तरच त्याला काम मिळणार होतं. त्याच्या पोटाचं घोडं पुढे दामटणार होतं. त्याला नोटाबंदी प्रकार मस्त मस्त वाटला. आपल्या गावात एवढी माणसं राहतात पाहुन त्याला खरेच वाटेना.

खोटया नोटांचा साठा शोधणयासाठी मोठी कुमक लावली गेली. खोटया नोटा शोधताना ख-याच नोटा हातात येत होत्या. गादीखाली, पाण्याच्या टाकीत, भिंतीत, गोदड्या चादरीत, शौचालयात, विहीरीत, शेताच्या जमीनीत, नोटाच नोटा मिळाल्याच्या पाहुन लुक्काभाई एकदम घामाघुम होवुन गेलेला. दरिद्रि आटपाट नगरात मुद्रांचा इतका संचय पाहुन तो टरकुनच गेलेला.

खोटी नोट तर काही मिळालेली नव्हती मात्र ख-या नोटाचा पर्दाफाश झाला होता.

लुक्काने पुन्हा माइक तोडाला लावला.

# मै तेरी दुश्मन --- प्रा. नेहा सावंत, दहिसर

संध्याकाळ हळुहळु पसरत चाललेली. सोनकेशरी किरणं आसमंतात विहरू लागलेली. खुल्या माळरानावर गवताची पाती सळसळताहेत आणि वाटवरणात गूढता गडद करणारं संगीत अंगावर सरर्कन काटा आणतंय. इतक्यात त्या पात्यांतून झपकन एक फणा वर येतो. संगीत द्रुत होतानाच फणा इकडे तिकडे मान वळवून आपल्या देहाचा आकडा दाखवून सरसर सरसर पळू लागतो.

घामाघूम झालेला खलनायक घाबरा घुबरा होऊन, जीव घेऊन पळतोय, त्याच्यापुढे नायिका पिंजारलेल्या केसांनी जीवाच्या आकांताने धावतेय, तिचे केस आणि साडीचा पदर वाऱ्यावर लहरतोय. तिच्या मागे खलनायक आणि खलनायकामागे "ती" तकाकलेल्या अंगाने लचकाती बलखाती होत, अंगाची वळणंवळणं घेत लयदारपणे वळवळतेय. सोंकेशरी प्रकाश तिच्या अंगावर तकाकी आणतोय. एव्हाना संगीतातली बीन वाजू लागते आणि ती आपला फणा उभारून जिभेची लपलप हालचाल करीत भेदक नजरेने पाठलाग करतेय खलनायकाचा आणि मग गीत सुरू होतं. अनेक चित्रपटांतून दिसणारं 'तिचं' रूप पाहिलं की हमखास आठवतो एक प्रसंग 'तिच्या पहिल्या वहिल्या दर्शनाचा' मला झालेला.

दुपारची वेळ होती. शाळेत गलका सुरू झालेला. पाटील गुरुजी असेच घाबरे घुबरे होऊन आमच्या घरी आले होते. तोंडातून त्यांच्या शब्द फुटत नव्हता. तो.. तो... ती.. तिथे... असं काहीबाही बोलत होते. त्यांच्या मागोमाग काही शिक्षकमंडळी घरी येऊन पाटील गुरुजींची समजूत काढीत होते.

'मी जातो, मी जातो' पण 'ती येईल माझ्या मागे..!' असं काहीबाही म्हणत होते. शाळा सोडून दिली होती. मुलांची पांगापांग झाली पण शाळेबाहेर मुलांचा गलका वाढला होता. कुणीतरी फोनाफोणी केली होती आणि हाफकिन इन्स्टिट्यूटच्या माणसांना बोलावलं होतं. या साऱ्या प्रकारात दोन तास गेले होते.

घडलं असं होतं, एकदा पाटील गुरुजी मधल्या सुट्टीच्या वेळेत शाळेच्या मागच्या चौकात उभे होते. शाळेच्या समोरच एक मोठ्ठं तळं होतं. पावसाळयाचे दिवस होते बहुधा. नुकताच पाऊस थांबला होता. सहज पाय मोकळे करावेत म्हणून पाटील गुरुजी मागच्या पटांगणात उभे होते. तळयाकडे पाहत असताना त्यांच्या नजरेला एक दृश्य दिसलं. त्यांनी नागनागिणीचा प्रणय पाहिला होता. त्यांच्या प्रणायतला मुग्ध आवेग पाहून गुरुजी भारावले होते पण एकदोन क्षणातच ती नागनगिण नाहीशी झाली होती. त्यांनी तळयात बुडी मारली असेल असा विचार करून गुरुजी वर्गावर गेले.

दोनचार दिवस गेले असतील नसतील अन अचानक वर्गातला एक मुलगा किंचाळून उठला. त्याच्या अंगावर सापाची लखलखीत कात पडली होती. पाटील सर चकित झाले, सापाची कात वर्गात कशी..? कात वरुन पडली होती म्हणून त्यांनी सहजच वर पाहिलं तर शाळेच्या कौलाजवळच्या आढ्यावर दोन दिशेला दोन सापांची वळवळ होतेय. ती पाहिली आणि पाटील गुरुजीच्या मनातील भीतीने फणा वर काढला. मुलांच्या गलक्याने कदाचित सापांची वळी खाली पडतील या जाणीवेने त्यांची थरथर होऊ लागली. शेजारच्या वर्गातल्या हिरवे गुरुजींना हाक मारण्याच भान आणि त्राणही त्यांना राहिलं नाही, पण मुलाची किंकाळी ऐकून हिरवे गुरुजीच वर्गाबाहेर आले आणि पाटील गुरुजींना ताडुन म्हणाले, "पाटील..! काय झालं रे? ते पोरगं किंचाळलं का?'

हिरवे गुरुजींच्या आडनावतच फक्त  हिरवेपण होतं. बाकी वर्ण काळा कुळकुळीत होता. डोक्यावर केस पांढरे चंदेरी पण डोळ्यांत आणि आवाजात कमालीचं मार्दव. पाटील गुरुजी तसे पोरसवदा. बारीक शिडशिडीत. पंचवीस तिशीतल्या आतले. नुकताच लग्न झालेले. त्यांचा असा भेदरलेला तो अवतार पाहून त्याच्या पाठीवर हात ठेऊन त्यांनी विचारले 'काय रे? काय झाले? असा काय बघतोयस?' (पाटील सरांनी आढ्याकडे बोट दाखवलं. आढयावर काळी-पिवळसर वळवळ दिसली. तसे हिरवे गुरुजीही चपापले. काहीही न बोलता त्यांनी वर्गातल्या मुलांना एकेक रांगेने बाहेर जायला सांगितलं. मुलांना, असं अचानक बाहेर का पाठवताहेत हे कळत नव्हतं. पण सापाच्या कातीमुळे परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं होतं. दोन वर्गातली मुले पुढच्या बाजूने निघून बाहेर उभी राहिली.

हिरवे गुरुजींनी पाटील सरांना बोलतं केलं. पाटील सर त्यांना सापांचा प्रणय पाहिल्याचा प्रसंग घाबरत घाबरत सांगत होते. पाटील सरांच लक्ष अधूनमधून वर जात होते. दोन्ही साप दोन दिशेला फणा काढत होते. पाटील सरांना वाटत होतं की आपला आवाज ऐकून ते आपल्यावर डुख धरून फणा काढताहेत. पाटील गुरुजी वसई गावात राहणारे होते. त्यांचं घर अगदी गावात होतं शेजारी शेती भाती होती. काहीसे जुन्या मतांचे पारंपारिक विचारसरणीचे जुन्या भाकड कथांवर विश्वास ठेवणारे. इतक्यात 'मी आलोच' म्हणून हिरवे गुरुजी शाळेबाहेर पडले अन बाहेरून त्यांनी हाफकिन इंस्टिट्यूटला फोन केला. शाळेचे पुढचे आवार मोकळे झाले होते. मागच्या वर्गातल्या शिक्षकांना काही खबरबात नव्हती. सावधानतेचा इशारा म्हणून त्यांनी मागच्या बाजूने शाळा सोडून दिली अन शिक्षकांना एका बाजूला घेऊन घडल्या प्रकाराची कल्पना दिली. तोपर्यंत पाटील गुरुजी आमच्या घरी येऊन पोहोचले होते. धड बोलतही नव्हते.

चाळीतली शेजरीपाजारी मंडळी गोळा झालेली. म्हाताऱ्या बायांच्या गप्पांना उत आलेला. पाटील गुरुजींची भिती घालवायची सोडून त्यांच्या भीतीला खतपाणी दिलं होतं. एव्हाना सर्पाचा प्रणय बघितलेला कानोकानी झाला होता. त्यावरच्या उखाळया-पाखाळयांना उत आला होता.

"सर्पाचा लाग कधी बघू नये बाई, त्यांच्यात बाधा येते" – एक म्हणाली

'हो, बाधा आली की ती बघणाऱ्यावर डुख धरते, अन ती त्याचा माग काढते' दुसरीने त्यात खतपाणी घातलं.

"आमच्या कोकणात बी असंच घडलेलं. एकदा एका सापाच्या पाठीत एकानं काटीचा फटका मारला, तर तो साप निघून गेला अन दुसऱ्या दिवशी बरोब्बर त्याच टायमाला येवन मारणाऱ्याचो त्याने चावो घेतलो. मारणारो तोंडान विष टाकोन मेलो ना.." म्हणत गोसावीने तोंडसुख घेतले.

"ह्ये तर कायच नाय. एकदा सरपांची जोडी अशीच माळरानावर नादात आली असताना आमच्या मुंबयच्या पावण्यान दगड मारला तशी दोन बी सरप वायले झाले. मंगे मुंबयचो पावनो मुंबैक परतलो. चार दिवसांनी त्याच्या चाळीच्या दारात दोघय सरप फणा काढून उभे रायले. पावण्यान हात जोडून माफी मागितली, दूध ठेवलं. हळद कुंकू वाहयलं, तवा कुटे मान डोलवून गेले पण पावनो मात्र गळपाटलो. चार चार दिवस तापान फणफणलो." राऊळ मामा म्हणले.

"बरं झालं बाई तुमचं लक्ष गेलं ते गुरुजी. त्या सापांनी कात टाकून तुम्हाला साक्षात्कार दिला म्हणायचा. नाहीतर बाई, माग काढत घरापर्यंत पोचली असती हो ही जोडी. खेकाळे काकूंचे उद्गार ऐकून पाटील गुरुजी घाम पुसू लागले. बहुतेक ते दृश्य त्यांना कल्पनेत दिसू लागलं असावं बहुधा. 'मी घरी जातो' म्हणणारे गुरुजी आता

घरातून पाय बाहेर काढायचं नाव काढत नव्हते. भीती, त्यांच्या मनात सापांसारखीच दबा धरून बसली होती. न जाणो आपल्या मागोमाग ही वळवळ आपल्या घरात तर येणार नाही ना? म्हणून त्यांचा पाय हालत नव्हता.

हिरवे गुरुजी मात्र एकटे खिंड लढवत होते. जणू काही त्यांनीच त्या सापांवर डुख धरला होता. हा हा म्हणता आता शाळेच्या बाहेर गर्दी जमा झाली होती. माणसांचा गलका वाढला होता. त्या गलक्याने आतली सापाची जोडीही बिथरली होती. आढ्यावरून फिरत फिरत त्यांचा शाळेला वरचेवर फेरफटका चालला होता. त्यांना पकडायच्या वेगवेगळया युक्त्या बघ्यांकडून येत होत्या. कुणीतरी शक्कल लढवून मागच्या गल्लीतल्या झोपडपट्टीतल्या सपेऱ्याला बोलावून आणलं. तो एक पुंगी अन टोपली घेऊन आला होता. अगदी नागिण चित्रपटातल्या 'तन डोले मेरा मन डोले' च्या चाळीवर पुंगी वाजवू लागला. पुंगीच्या आवाजाने नाग डोलतात म्हणून तो अगदी कस लावून वाजवत होता. पण कसलं काय, डोलणं तर सोडाच पुढच्या वाश्यावर दोन्ही साप वेटोळे करून बसले होते. जणू काही हिरमुसले होते जगावर. या सगळया प्रकारात दोन तीन तास कसे गेले कळलच नाही. एकदम हिरवे गुरुजी ओरडले, 'अरे वाट सोडा, त्यांना येऊ द्या. सगळी गर्दी कमी करा बघू.'

कोण आलं म्हणून सगळे इथे तिथे बघू लागले. इतक्यात दोन गृहस्थ त्या गर्दीतून वाट काढत शाळेच्या वरांड्यातल्या वर्गात शिरले. एकच्या पाठीवर एक पोतडी होती अगदी एखाद्या गारुड्याकडे किंवा मदारीकडे असते तशी आणि दुसऱ्याच्या हातात पातळ लोखंडी काडीचा एक चिमटा. सोनाऱ्याकडे असतो तसा आणि एक पातळ वेतासारखी काठी. शाळेच्या वरांड्यापुढची गर्दी पांगली पण काही माणसं शाळेच्या जाळयांतून आत डोकावून पाहत होती. मी आईचा पदर घट्ट धरून आमच्या दारासमोरच्या जाळीतून पहात होते. आलेल्या, त्या दोन पाहुण्यांचा आटापिटा चालला होता. त्यांची पाठमोरी झटापट मला दिसत होती. पाटील सर मात्र घरातून बाहेर डोकवायलाही येत नव्हते.

बाहेर जमलेली माणसं आपापली कल्पनाशक्ती लढवत होते. कुणी म्हणत होतं – 'ते भूल घालताहेत सर्पांना.' कुणी म्हणत होतं, 'ते सापांवर विभूत टाकताहेत.' त्यांच्या हातात काहीतरी पावडर होती. हातातून सुळकण निसटून जाऊ नये म्हणून असेल कदाचित टाकलेली असेल ती पावडर. लोकांची कल्पनाशक्ती अगदी वळवळत होती. 'ते मंत्र म्हणताहेत, मंत्राने भूल टाकत असतील' असे काही बाही बोलत होते. काही जण आपले डोके लढवून सापांना पकडायच्या युक्त्या सांगत होते.' 'असं करा- तसं करा' आणि ते दोघे अजिबात त्रागा न करता शांतपणे आपली खेळी खेळत होते. मध्येच कुणीतरी काठी हाणा अन डोक्यावर फटका मारा, लगेच मरतील' असंही म्हणत होते. काय केलं कुणास ठाऊक पण एकदम सगळयांनी टाळया पिटलेल्याचा आवाज, आनंदाचे चित्कार ऐकू आले. दोन्ही सापांना त्या माणसांनी सपकण त्या पोटलीत बंद केलं होतं. 'पोटलीतही विभूत टाकलेली असते त्यामुळे ते आतमध्ये गुंगीत राहणार' असं विधान बेधडकपणे करीत होते. दोन्ही वेटोळी आतमध्ये वळवळत होती. पोटलीचं तोंड मात्र अगदी घट्ट बंद केलं होतं. सगळयांचे जीव जणू भांड्यातच नव्हे तर त्या पोटलीत बंद झाले होते. सगळया माणसांच्या कौतुकाच्या नजरा त्या दोघांवर खिळल्या होत्या. जणू काही ते हिरोच होते. शौर्याची कामगिरी त्यांनी फत्ते केली होती. शेजारच्या झोपडपट्टीतून आलेल्या गरुड्याचं तोंडही आता मोटली आवळल्यासारखं झालं होतं. कारण त्याने स्वतःची अशी स्वप्ने रंगविली होती. मोठ्या अपेक्षेने तो मोठ्या झकणाची टोपली घेऊन आला होता. एकाच वेळी एक सोडून दोन दोन नाग त्याला मिळाले असते अन सणासुदीच्या निमित्ताने किंवा दर सोमवारी त्यांच्या नावाने मिळकत झाली असती. शिवाय आपला रुबाबही वाढला असता. त्याची स्वप्नं त्या पोतडीत बंद झाली होती. निदान जाता जाता त्या दोन इसमांनी नाग पकडून पोतडीत टाकण्यापेक्षा आपल्या टोपलीत टाकले असते तर.... पण त्याच्या मनातले विचार मनातच विरून गेले. आलेले इसम पोतडी घेऊन शाळेच्या बाहेर पडले. तसा त्यांना घेराव घातला माणसांनी.

‘होय ते दोनी सरप पकडलात, काय करणार त्यांचा तुमी..?’ राऊळ मामांनी प्रश्न विचारला

‘काय ओ, दात काढलत काय त्यांचे..? की विष काढून घेणार..?’ पडवळीन आपली शंका विचारत होती.

‘जंगलात सोडलत का वो.. मगे पुना डुख धरून हयंसर आले तर, होय नायतर पाटलांच्या घरापतुर वसईक गेले तर...?’

एकेकाचे प्रश्न ऐकून त्या दोघांना हसू आले. ‘आम्ही असं काहीही करणार नाही... त्यांना आमच्या संग्रहालयात काही दिवस ठेवू. आमच्याकडे सर्पांच्या विषावर संशोधन केलं जातं. त्यापासून वेगवेगळया लासी तयार केल्या जातात. त्यासाठी काही दिवस ठेवू आणि मग जंगलात सोडून देऊ.’ त्यातला एकजण म्हणाला. इतक्यात गर्दीतून वाट काढीत दोन कप चहा घेऊन आली. “पावण्यानु यवढा जिवावर उदार होऊन ‘तेंका’ पकडलेत नायतर आमच्या जिवाक घोर लागलो असतो, आमची ल्हानगी ल्हानगी पोरं जातात शाळेत त्येच्या जीवांची काळजी वाटून रायली असती.”

गोसाविणीच्या त्या तत्पर पाहुणचाराचं सगळयांच कौतुक वाटलं. एवढी साधी गोष्ट आपल्याला का सुचली नाही म्हणून इतर बायका मनातल्या मनात चरफडत राहिल्या. चहाचा एक घोट घेऊन त्यातला एकजण म्हणाला, ‘हे बघा मनातले गैरसमज काढून टाका. साप किंवा नाग डुख धरून वगैरे पाठलाग करत नाही. तो माणसाचा आवाज देखील ओळखत नाही की दुरून पाहून त्याला लक्षातही ठेवू शकत नाही. तो आपली सुरक्षा शोधत असतो. तो काही बदल्याच्या भावनेने पाठलाग वगैरे करत नाही. पिक्चरमध्ये दाखवितात आणि आपण ते खरे मानतो.’

त्या इसमाचं बोलणं ऐकून पाटील गुरुजी खजील झाले होते, थरथरते हात जोडूनच ते उभे होते. मनातल्या मनात ते त्या सर्पांची क्षमा मागत असावेत बहुदा. पण त्यांच्या मनातली भीती पूर्ण गेलीच नव्हती. हापकीन्सचे आलेले इसम टॅक्सीत बसून निघून गेले. एव्हाना संध्याकाळ सरत आली होती. सगळेच शिक्षक थांबले होते. आपापल्या बॅगा घेण्यासाठी सगळे शाळेत गेले. शिपायाने नेहमीची आवराआवर करून शाळेची दारं बंद केली. पाटील गुरुजींना घेऊन हिरवे गुरुजीही गेले. दोनचार दिवस पाटील गुरुजी शाळेत आलेच नाहीत. ते तापाने आजारी असल्याचा निरोप मिळाला होता. नंतर ते त्या शाळेत कधीच आले नाहीत. त्यांनी स्वतःची दुसऱ्या शाळेत बदली करवून घेतल्याचं कळलं.

त्यावेळी माझ्या बालमनाने टिपलेला तो क्षण आजही जसाच्या तसा मनात फणा काढून उभा राहतो. फरक इतकाच की तेव्हा तो भीतीची आठवण म्हणून मनात बिंबला होता. आज वाढत्या वयात तो क्षणही अधिक सुजाण झाल्यासारखा वाटतो. किंबहुना आताच्या वाढत्या वयानुसार त्याचं परिशीलन आजच्या नजरेतून केल्यामुळे त्याला एक समंजसतेचं परिमाण लाभलं आहे. काहीही असलं तरी नागाविषयीचं कोणतंही गाणं किंवा चित्रपट पाहिला की आठवतं शाळेतल्या आढयावरचं सापाचं वाटोळं अगदी काल परवा पाहिल्यासारखं....

# येशू बाळाचे दर्शन --- फा. एलायस रॉड्रीग्ज

**शब्दबीज**

माझ्या प्रिय बंधुभगिनींनो, बाळ येशूच्या बेथलेहममधील जन्मानंतर पूर्वेकडून तीन ज्ञानी लोक एका ता-याच्या मार्गदर्शनाखाली जेरुस्लेममध्ये जन्माला आलेल्या राजाचा शोध घेत जेरुस्लेमकडे आले. तेथे त्यांनी विचारपूस केली की, जो राजा जन्माला आला ते स्थळ कुठे आहे? हे वर्तमान सबंध जेरुस्लेममध्ये पसरले आणि त्यावेळचा राजा हेरोद हयालादेखील ही बातमी कळली. हेरोद राजाने तत्काळ त्याच्या राज्यातील काही पुरोहित आणि शास्त्री हयांना बोलावून हयाविषयी चौकशी केली. तेव्हा हया लोकांनी हेरोद राजाला सांगितले की, हा राजा बेथलेहममध्ये जन्माला येणार आहे. तेव्हा हेरोद राजाने हया तीन ज्ञानी लोकांना गुपचूप आपल्याकडे बोलावून त्यांना सांगितले, तुम्ही जा आणि बारकाईने हया बाळाचा शोध घ्या आणि तुम्हाला शोध लागला म्हणजे परत येऊन मला कळवा म्हणजे मीदेखील येऊन त्याची आराधना करीन. भजनपूजन करीन.

आपल्याला ठाऊक आहे की, हेरोदच्या मनामध्ये डाव निराळा होता. कारण एक नवीन राजा जर उदयास येणार असेल तर त्याचे स्वत:चे स्थान, त्याची सत्ता, त्याचा अधिकार सर्व काही नष्ट होणार होते. म्हणून त्याने मनातल्या मनात कट रचून हया ज्ञानी लोकांच्यापुढे असा आव आणला की, मलासुद्धा हया बाळामध्ये, हा जो राजा जन्माला आलेला आहे त्याच्यामध्ये स्वारस्य आहे. तुम्हाला त्याचा शोध लागला म्हणजे मला येऊन तसे कळवा. आपल्याला त्यावेळच्या दुस–या एका घटनेमधून ठाऊक आहे की, हेरोद राजाने जेव्हा हे ज्ञानी लोक त्याच्याकडे परत आले नाहीत कारण त्यांना स्वप्नात प्रभूने संदेश दिला होता की, तुम्ही निराळया मार्गाने तुमच्या देशात परत जा. हेरोदकडे परत जाऊ नका, हेरोदला ही बातमी देऊ नका. तेव्हा हेरोदच्या लक्षात आले, आपल्या म्हणण्याप्रमाणे हया ज्ञानी लोकांनी केले नाही. त्यांनी आपल्याला अज्ञानात ठेवले आहे आणि ते निघून गेले आहेत. तेव्हा हेरोद राजाने दोन वर्षापर्यंतच्या सगळया मुलांची कत्तल केली, हे आपल्याला ठाऊक आहे.

म्हणजे हया गोष्टीवरून आपल्या लक्षात येते की, हेरोदने कसा दुष्ट कट रचला होता. ओठावर एक आणि पोटात दुसरे असे जे आपण म्हणतो तशाप्रकारे हेरोद हया ज्ञानी लोकांबरोबर वागला. हयाचे कारण जेरुस्लेममध्ये राजा जन्माला आलेला आहे, हया वृत्ताने त्याचे धाबे दणाणले होते. जे लोक सत्तेसाठी हपापले असतात आणि अशा अवस्थेत त्यांनासुद्धा कळते की, आपली सत्ता नष्ट होणार, डळमळीत होणार, आपल्या हातून ती निसटणार तेव्हा हे लोक सत्ता धरून ठेवण्याकरिता, सत्तेवरचे आपले नियंत्रण सुरक्षित राखण्याकरिता कोणत्याही थराला जाऊ शकतात, हेच हेरोदच्या वागण्यावरून आपल्या लक्षात येते.

हे ज्ञानी लोक जेव्हा हेरोदला भेटल्यानंतर पुढे जाऊ लागतात तेव्हा त्यांना सुरुवातीला जो तारा दिसू लागला होता तो पुन्हा दिसू लागला आणि त्या ता-याच्या मार्गदर्शनानुसार हे लोक जेथे बाळ येशू जन्माला आले होते त्या बेथलेहम नगरात गुरांच्या गोठयात पोहचल. तेथे त्यांनी मरिया मातेच्या पुढयात बाळाला पाहिले आणि

त्यांनी त्या बाळाला नमन केले, त्या बाळाची आराधना, उपासना केली, भजन केले. मग त्यांनी त्यांचा भक्तिभाव व्यक्त करीत तीन भेटवस्तू हया दिव्यबाळाला अर्पण केल्या.

सोने, उद आणि गंधरस हया भेटवस्तू अत्यंत अर्थपूर्ण आहेत. राजाला त्याच्या प्रतिष्ठेप्रमाणे, त्याच्या दर्जाप्रमाणे भेटवस्तू दिली गेली पाहिजे आणि आपल्याकडे जे सर्वात मौल्यवान आहे ते म्हणजे सोने. म्हणून राजाला ही अत्यंत मौल्यवान अशी भेटवस्तू देण्यात आली. उद म्हणजेच आपण ज्याला इन्सेंस किंवा धूप म्हणतो. उद वेदीपुढे उपासनेमध्ये, आराधनेमध्ये धूर करून परमेश्वराला अर्पण केले जाते. हे बाळ राजा आहे. हे जसे सोन्याच्या भेटीद्वारे ध्वनित करण्यात आले त्याचप्रमाणे हे बाळ म्हणजे देवाचा पुत्र आहे, प्रत्यक्ष परमेश्वर आहे, हे दाखवून देण्याकरिता उद अर्पण करण्यात आले आणि तिसरी भेटवस्तू देण्यात आली ती म्हणजे गंधरस. यहुदी लोक मरणाच्या वेळेला मयत व्यक्तीच्या शरीराला गंधरस लावत असत., आपण शुभवर्तमानात वाचतो, येशूच्या मृत्यूनंतर काही स्त्रिया त्याच्या कबरी जवळ जातात कारण त्यांना त्याच्या शरीराला गंधरस लावायचा होता. हे बाळ सगळया जगाचा तारणहार म्हणून त्याचे तारणकार्य पार पाडण्याकरिता मृत्यू स्वीकारण्यासाठी ते जन्माला आलेले आहे, हे दर्शविण्यासाठी ही तिसरी गंधरसाची भेट त्याला अर्पण करण्यात आली.

परमेश्वराच्या अतर्क्य, प्रेमपूर्ण आणि सुज्ञ अशा योजनेमध्ये हे तीन ज्ञानी लोक येशू बाळाचे दर्शन घेतात आणि त्या दर्शनामधून ते जगापुढे असे जाहीर करतात की, हे बाळ साधेसुधे बाळ नाही, सामान्य बाळ नाही, तर ते इतके असामान्य आहे की, ते एकाच वेळेला राजांचा राजा म्हणून जन्माला आलेले आहे, देवाचा पुत्र जो पित्याबरोबर एकात्म आहे, तो देवाचा पुत्र स्वत: परमेश्वर आपल्यामध्ये हजर आहे,व तो आपल्या उद्धारकार्यासाठी मृत्यू स्वीकारणार आहे, हेदेखील दाखविले आहे.

**स्पंदन**

हे प्रभो येशू, तू केवळ ख्रिस्ती लोकांसाठी वा कॅथलिक लोकांसाठी नव्हे तर सर्व राष्टांकरिता, सर्व लोकांकरिता राजांचा राजा व प्रत्यक्ष परमेश्वर म्हणून आणि सर्वांचा तारणहार म्हणून जन्माला आलेला आहेस. हे सत्य आम्ही आमच्या परिपूर्ण श्रद्धेमध्ये स्वीकारावे आणि हया सत्याची साक्ष जगात सर्वांना द्यावी, जे जे लोक आमच्या संपर्कात येतात, ज्यांच्याबरोबर आम्ही व्यवहार करतो, ज्यांच्याबरोबर आम्ही काम करतो अशा सर्व लोकांना तुझ्या सत्याचे दर्शन घडावे म्हणून तू आमच्याबरोबर राहा. आम्हाला तुझ्या पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन नित्य लाभत राहू दे. त्या मार्गदर्शनानुसार चालत राहण्याकरिता तुझी कृपा आम्हाला सतत मिळत राहू दे. ही प्रार्थना आम्ही एकमनाने व एकदिलाने आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन

---

## चारोळया – ख्रिस्तोफर रिबेलो

मोगऱ्याची कळी कोंब बनून
उदरी आमच्या अवचित उतरली
विहंग भरारीची स्वप्ने अधुरी
उमलण्याआधीच खुडली गेली.

माझी रिती ओंजळ
तुझ्या ओंजळीत सामावली
सुख-दु:खाच्या आपल्या संसारात
ती दुथडी भरून वाहताना पाहिली

# ख्रिसमस... एक असेही सल - जॉन कोलासो

नोव्हेंबर अखेरीपासून थंड हवेच्या झुळका आसमंतात फेर धरू लागतात आणि त्याचबरोबर ख्रिसमस म्हणजेच नाताळचे वातावरणही हळुहळू तयार होऊ लागते.

बाजारपेठांत ख्रिसमस सहित्य दिसू लागते. युरोपातील बाजारपेठांत तर सफेद मोठी दाढी आणि लाल अंगरखा घातलेल्या सांताक्लॉसची भ्रमंतीही नोव्हेंबर अखेरीपासून सुरू होते... आपणही ख्रिसमस गाणी गुणगुणायला लागतो... ओठातून हळूच शब्द बाहेर पडू लागतात व आपण ठेका धरू लागतो...

गाईच्या गोठ्यात ख्रिस्त जन्मला... पूर्वेच्या चांदण्यात तारा उगवला...

थोड्याच दिवसांत गावोगावी बालगोपाल गाईचे गोठे बांधण्यात गर्क होतात... ख्रिस्तजन्माचे देखावे तयार होऊ लागतात... घरात केक व इतर गोडधोड तयार होऊ लागते... त्याचा खमंग वास नाकात शिरू लागतो...

झाडांची पानगळ चालू असतानाही सर्वत्र ख्रिसमस आगमनाचे आनंदी वातावरण तयार होऊ लागते... मुलांना सुट्ट्या लागतात.... परदेशांत नोकरीसाठी गेलेले युवकयुवती परत आलेले असतात... घर आनंदाने तुडुंब भरून जाते.. आणि 24 डिसेंबर उजाडतो... रात्रीच्या प्रार्थनेला चर्चला जाण्याची तयारी होते. नवे कपडे... सूटबूट कपाटातून बाहेर काढले जातात.. चर्चही आतूनबाहेरून सजलेली असतात. चर्चमध्ये ख्रिस्तजन्माचा भव्यदेखावा साकारलेला असतो. पवित्र मारिया आणि संत जोसेफ यांच्या पुढ्यात ख्रिस्तबाळ पहुडलेले असते... ख्रिसमस गीतांचे. संगीताचे सूर कानी पडू लागतात... कान आणि मन तृप्त होते...

परंतु त्याचवेळी माझे मन एका विचाराने अस्वस्थ झालेले असते... मी बेचैन होतो... कारण ख्रिस्तबाळाच्या जन्माच्या वेळी रोमन सम्राट हेरोद, बेथलेम आणि आसपासच्या सर्व प्रदेशांत असलेल्या दोन वर्षे आणि त्याहून कमी वयाच्या बालकांची हत्या करण्याचा आदेश देतो आणि या आदेशानुसार हजारो बालकांना त्यांच्या मातापित्यांच्या हातातून खेचून त्यांची कत्तल करण्यात येते...

अखिल मानव जातीच्या तारणासाठी पृथ्वीवर आलेल्या देवपुत्राला, ख्रिस्तबाळाला वाचविण्यासाठी मात्र देवदूत जोसेफच्या स्वप्नात दर्शन देऊन सांगतो... जोसेफ ऊठ, बालक व त्याची आई यांना घेऊन (बेथलेमहून) मिसर देशास पळून जा आणि मी तुला सांगेपर्यंत तेथेच राहा, कारण बालकाचा घात करण्यासाठी हेरोद त्याचा शोध करणार आहे.... या संदेशानुसार जोसेफ, बालक आणि त्याची आई यांना घेऊन रातोरात मिसर देशास निघून गेला आणि हेरोदाच्या मरणापर्यंत निघून गेला.

माझ्या मनात प्रश्न येतो की ज्या देवाला ख्रिस्तबाळाची काळजी घेता आली त्याच देवाला इतर हजारो निरपराध, निष्पाप बाळांची काळजी घेता आली नसती का... या बालकांचा कोणताही गुन्हा नसताना त्यांची निर्घृण हत्या का करू देण्यात आली... स्वत:च्या बाळाच्या रक्षणासाठी देव इतका निर्दय होऊ शकतो का...?, हत्या करण्यात आलेली ही निष्पाप बालकंही देवाचीच नव्हती काय... ख्रिस्तबाळासाठी या इतर बालकांचा नाहक बळी जाणार आहे याची कल्पना देवपित्याला नसणार, असे कोणीही मानणार नाही... मग असे कां घडले...?

एखाद्या निरपराध माणसाची वा बालकाची हत्या करण्यात आल्याचे वृत्त वाचूनही आपल्या अंगाला शहारे येतात... मग हजारो बालकांना त्याच्या मातापित्यांच्या हातातून खेचून त्यांच्या पुढ्यात हत्या करण्यात आली... किती हे भयानक कृत्य होते... आणि देवाने ते कसे घडू दिले... ? पवित्रग्रंथातील हे वाचन ऐकून माझ्या डोळ्यासमोर हा प्रसंग उभा राहू लागतो आणि मग मी अस्वस्थ होतो!

यासंबधी काही धर्मगुरूंशी मी चर्चा करण्याचा प्रयत्न केला असता काहींचे मत असे की शास्त्रात जे लिहिले होते ते घडणारच होते... जे प्रभूने संदेष्ट्यांच्याद्वारे सांगितले ते पूर्ण व्हावे म्हणून असे झाले...

तर काहींचे म्हणणे असे की यामध्ये देवाचा काही दोष नव्हता... दोष होता तो हेरोद राजाचा... कारण तो दुष्ट होता... संदेष्टाने लिहून ठेवल्याप्रमाणे ‘इस्राएल लोकांचा प्रतिपाळ करील असा सरदार बेथलेममध्येच जन्म घेणार होता...’ व तो जन्मास आला आहे हे पूर्वेकडे उगवलेल्या ता-यामुळे उघडकीस आल्याने हेरोद राजा घाबरला आणि त्याने आपल्या ‘प्रतिस्पर्धे’ची हत्या करण्याचा घाट रचला... परंतु बेथलेममध्ये जन्मलेले कोणते बाळ आपला प्रतिस्पर्धी बनणार आहे, हे राजाला निश्चित कळू न शकल्याने त्याने सरसकट सर्व बालकांची हत्या करण्याचा आदेश दिला.

ही दुर्दैवी घटना आठवली की ख्रिस्तजन्माचा सोहळा साजरा करण्याची इच्छाच होत नाही... ‘रक्तरंजित ख्रिसमस’ अशी भावना मनात तयार होते... कारण या प्रकाशोत्सवामागे भयानक काळी सावली पडलेली आहे, असे भासत असते...

## कविता - कसले हे जिणे - जिम (फिलिप) रॉड्रिग्ज

कसले हे जिणे
अश्वत्थाम्या
मी प्रथम महाभारत वाचले तेव्हा...
हे अश्वत्थाम्या
तुझा अमर मृत्यू
मनाला विदीर्ण करून गेला
शापमय भळभळती जखम
मस्तकी घेऊन भिरभिरणं
नशिबी तुझ्या
खरंच, किती रे दुर्दैवी तू
निरंतर अमर मृत्युचं
ओझं वाहतो आहेस तू

पण खचू नकोस
कारण आम्हीही हतभागी
जिवंतपणी मृत्युचे ओझे वाहत
आहोत तुझ्या सोबतीला
फरक इतकाच आहे
तू अदृश्य आणि तुझी जखमही
आम्ही मात्र पार नागवे...
अगतिक... कफ्फल्लक...
साऱ्या जखमा लपवून अंतर्मनात
हसण्याचा बहाणा, सर्व काही आलबेलसाठी
जगण्याचा बहाणा, मृत्युच्या आठवणीसाठी

# “तारपा वहारं कहाली रडं” - फा. आशिष रॉड्रीग्ज (येशू संघीय)

तारपा व कहाली हि दोन्ही पारंपारिक वाद्ये आदिवासी वारली जमातीची आहेत. तारपा पुंगीसारखा तर कहाली बासरीसारखी असते. दोन्ही वाद्यांतून दोन भिन्न स्वरलहरी निघतात. एकातून श्रृंगार टर दुसऱ्यातून करुण रस प्रतिध्वनित होत असतो. निसर्गात होणाऱ्या बदलाप्रमाणे आदिवासी वारली समाजाची वाद्ये बदलतात वा वाजवली जातात.

पावसाची रिमझिम सुरु होते, तप्त व तृषित धरणीमाता शांत होते; मृत सृष्टी फुलू लागते; शेतकरी पेरणी करतात. हिरवे भाताचे रोप उगवते; सुप्त गवत अंकुरित होते; कोरडे पडलेले ओहळ नव्या उमेदीने खळखळू लागतात; सागासारखी असंख्य मृतावस्थेत असलेली झाडे बहरतात; भाताची लावणी होते; हिरवी शेतं, हिरवी कुरणं व हिरवे डोंगर नजरेस पडतात. मग हळूवारपणे एक चमत्कार होतो. भाताची कणसं बाहेर डोकावू लागतात. आनंदी आनंद गडे इकडे तिकडे चोहीकडे.... असंच वातावरण सर्वत्र पाहायला मिळतं. मग हा निसर्गात विराजमान झालेला आनंद वारली समाज साजरा करतो. आठ महिने विसावत पडलेला तारपा तारपकरी प्रथम हातात घेतो, तोंडाला लावतो, त्यात फुंकर मारतो. मग मात्र डोंगरदर्यातून तारपाच्या ध्वनिलहरी घुमतात. असं सांगतात की तारप्यातून निघणारे ते आदिस्वर निसर्ग फुलवण्यात, भाताची कणसं भरून परिपक्व करण्यास, निसर्गाचं विस्कटलेलं संतुलन पुन:स्थापित सहाय्यभूत ठरतात.

निसर्गाने नवीन रूप धारण केलं आहे, सृष्टीने हिरवा शालू पांघरला आहे. सगळीकडे सुजलाम, सुफलाम, होत आहे. अशावेळी निसर्गातील हे संतुलन आदिवासी साजरं करतात. “तारपा वाजं ना आख्खीला वहार”. तारपा सगळ्यांना निमंत्रण देतोय ते पर्यावरणातील संतुलन, तसेच मानव व सृष्टी यातील सामुहिक जीवन साजरे करायला.

गोकुळात कृष्ण बासरी वाजवतो, बासरीच्या सुराने मंत्रमुग्ध होऊन गोपी धावतात, राधा आपलं भान विसरते आणि कृष्णाच्या संगे नाचता नाचता कृष्णमय होते. तारपकरी तारपा वाजवतो तेव्हा अगदी तसंच होतं. सारं आदिवासी जग जागं होतं. आबालववृद्धांच्या रोमारोमात भावना उचंबळून येतात. तरुणतरुणी नटूनथटून तारपाच्या नाचासाठी धाव घेतात. काळया कुट्ट रात्रीची भीती नाही; पावूस वाऱ्याची फिकीर नाही. तारपानृत्य गावात असो, शेजारच्यागावात असो वा पंचवीस तीस कि.मी. च्या नाक्यावर असो. अंतराची पर्वा नाही; चालण्याची हिम्मत आहे. हे सर्व कशासाठी? निसर्गाच्या शृंगारात सहभागी होण्यासाठी, निसर्गाच्या हिंदोळ्यात दोलायमान होण्यासाठी, पर्यावरणातील हे संतुलन साजरं करण्यासाठी.

तारपा वाजतो. तारपकारी केंद्रभागी; एक तरुण मग एक तरुणी अशा क्रमांत अर्धवर्तुळात आदिवासी उभे राहतात. आपले हात एकमेकांच्या हातात पाठीशी घट्ट धरून ठेवतात. एकमेकांना चिकटून तारपा नाच नाचतात. निसर्गासंगे मानवाचं असलेलं जिवंत सहजीवन तारपा नाचाने सांकेतीकपणे दर्शवितात.

तारपा नाचातील अर्धवर्तुळाची दोन टोके उघडी असतात. नाचासाठी सर्वांचं स्वागत आहे. कुणीही कधीही यावं व या सृष्टीच्या नृत्यात रंगून जावं; परंतु एका अटीवर. त्यांना तारपा नाच नाचता आला पाहिजे. नाचात सर्व

धरती लेकरांची शेकडो पाऊले एका लयबद्ध ठेक्यात भूमीवर पडतात, जणूकाही एकच पाऊल पडत आहे. नाचता येत नसेल तर हा नाचातील एकसुत्रीपणा विस्कळीत होतो. निसर्गासंगे मानवाचं असलेलं सहजीवन ज्यांना समजलं नाही व ज्यांनी ते स्वीकारलं नाही ते निसर्गासंगे नाचू शकत नाहीत, निसर्गाचा आदर राखू शकत नाहीत, पर्यावरणात असंतुलन निर्माण करतात व मानवी जीवन विस्कळीत करतात. अनादिकालापासून निसर्गाच्या सानिध्यात आदिवासी जगात आले आहेत. निसर्गासंगे आपला असलेला एकजीवपणा ( symbiosis) साध्याभोळ्या वारली समाजाला समजाला आहे. म्हणूनच ते आतापर्यंत निसर्गाचं संरक्षण करीत आहेत.

तारपा समृद्धीच्या हंगामात वाजतो जेव्हा आदिवासीचे कणगे भरलेले असतात; पण एकदा वनातील झाडांची पान झडायला लागली, गवत सुकलं, धरतीला भेगा गेल्या, ओहोळ आटले, कडकीच्या दिवसाचं आगमन झालं, निसर्ग मृतप्राय झाला कि कहाली वाजवली जाते. कहाली रडते, निसर्गात झालेल्या या पडझडीबद्दल, उत्पाताबद्दल शोक व्यक्त करते. सर्वत्र दुःखाची अवकळा पसरते. खरे पाहता हा शेतकामाचा हंगाम नसल्या कारणाने ह्या काळात/ हंगामात लग्नसोहळे होतात. कहालीवर लोक नाचतात, पण एकएकटे. तारपा नाचातील तो एकोपा व लयबद्ध ठेका त्यात दिसत नाही. जणूकाही आता निसर्गातील सहजीवन संपले आहे. तोल ढासळला आहे. लोक सामुहिक जीवनातून वैयक्तिक जीवनाकडे झुकलेले दिसतात. विनाशाची वेळ येऊन ठेपली आहे. हे सर्व कहाली सूचित करून मानवाला जागं करत आहे.

आजही कहाली "वसुंधरा वाचवा" चे विलाप गीत गात आहे. माणसांनी आपल्या गरजेपुरताच धरतीचा वापर करण्याऐवजी ते आपला हावरटपणा तृप्त करण्यासाठी आज धडपडत आहेत. निसर्गाची, ऋतुचक्राची घडी विस्कटली गेली आहे. मानवाच्या विनाशाचा काळ समीप आला आहे. असं कहाली ओरडून सांगत आहे. कहालीचे पडसाद प्रत्येक देशात, राज्यात, जिल्ह्यात व गावात उमटत आहेत. जी कहाली आदिवासींना जंगलतोडी पासून सावध राहायला सांगते तीच कहाली आज वनीकरण करण्यास, पाणी अडवून मुरवण्यास आव्हान करत आहे. पाण्याचा व्यापार थांबवायला सांगत आहे.

कहाली रडत आहे. विलाप करत आहे. पर्यावरणाची विस्कटलेली घडी पुनः बसविण्यास सांगत आहे. तारपा वाजत आहे. पर्यावरणातील नष्ट झालेल्या वैभवपूर्ण संतुलनाचं स्मरण करून देत आहे. आणि कहाली विलाप करतच राहील; तारपा वाजतच राहील; जोपर्यंत पर्यावरण विस्कटीत राहील तोपर्यंत कहाली विलाप गीत गातच राहील; तारपा वाजतच राहील, विश्वाला, मानवाला, जनाजनाला नि मनामनाला पाचारण करीतच राहील.

## चारोळया - मेल्सीना तुस्कानो

अभिमान
दुःखात राहूनही हसरा चेहरा
असतो कायम स्त्रीयांचा,
म्हणून अभिमान वाटतो
की मी एक स्त्री असल्याचा.

अपुरी इच्छा
एका मातेची एक अपुरी इच्छा
कायमच अपुरी राहिली,
दारी पणती का नको म्हणूनी
ती घरच्यांशी भांडतच राहिली.

# "सोशल मिडीयावरून चालणारी समांतर न्यायव्यवस्था"

## - इग्नेशियस डायस

‘ज्याने कोणी एकही अपराध केलेला नाही त्याने प्रथम दगड उचलावा’ येशूने जवळपास दोन हजार वर्षांपूर्वी काढलेले हे उद्गार आजच्या सोशल मीडियाच्या काळातदेखील तंतोतंत लागू होतात. येशूचे हे उद्गार न्याय या संकल्पनेची नैतिक पातळीवर चर्चा घडवून आणणारे उद्गार आहेत. न्याय ही संकल्पना मुळात अस्तीत्वात आली ती समाजातील नीतीमत्ता जोपासली जावी म्हणून.

या जगात दुरित आहे. ते जसे निसर्गनिर्मित आहे त्याचप्रमाणे मानवनिर्मित आहे. भूकंप, अवर्षण, वादळे, रोगराई इत्यादि भौतिक कारणांमुळे निर्माण होणारी दू:खे ही निसर्गनिर्मित दुरिताची उदाहरणे आहेत. या दुरितापासून निर्माण होणाऱ्या दू:खाचे निवारण करण्यासाठी किंवा या नैसर्गिक दुरितावर मात करण्यासाठी मानव विज्ञानाच्या सहाय्याने सातत्याने प्रयत्नशील असतो. परंतु या जगातील युद्धे, भांडणतंटे, द्वेष, असूया इत्यादि कारणांमुळे निर्माण झालेली प्रचंड विषण्णता कशी दूर करायची हा मानावापुढचा सर्वात महत्वाचा प्रश्न होता. ह्या प्रश्नाच्या सोडवणुकीचा एक प्रयत्न म्हणून ‘न्यायव्यवस्था’ निर्माण झालेली आहे. अर्थात आजची प्रगत न्यायव्यवस्था ही थेट निर्माण झाली नसून तिच्यातही मानवी विकासक्रमाच्या अनुषंगाने बदल होत-होत ती आजच्या अवस्थेपर्यन्त विकसित झालेली आहे.

सध्याची न्यायव्यवस्था ही प्रत्येक राष्ट्राच्या आपापल्या राज्यघटनेच्या चौकटीत तयार केली गेलेली आणि त्या त्या राष्ट्राच्या नागरिकांस बंधनकारक अशा स्वरूपाची व्यवस्था आहे. या न्यायव्यवस्थेनुसार त्या त्या अपराधाच्या कमीअधिक तीव्रतेनुसार अपराध्यास शिक्षेच्या तरतुदी केल्या गेल्या आहेत. ही न्यायव्यवस्था सर्वांनाच मान्य असते कारण ह्या व्यवस्थेतून एकूण समाजाचे सामूहिक आणि जास्तीत जास्त हित जोपासले जावे हा उद्देश साधण्याचा प्रयत्न असतो. मात्र या सर्वमान्य न्यायव्यवस्थेबरोबरच सातत्याने समांतर न्यायव्यवस्था देखील समाजात कार्यरत असते. ही समांतर न्यायव्यवस्था अगदी सर्व काळात सर्व समाजात अस्तीत्वात असून येशूचे वरील उद्गार हे ह्या प्रकारच्या समांतर न्यायव्यवस्थेसाठी होते.

समांतर न्यायव्यवस्थेचे आजचे स्वरूप

ही न्यायव्यवस्था आपल्या आसपास आणि आपल्या आत अस्तीत्वात असते. आपण कळत-नकळतपणे, जाणते-अजाणतेपणी ह्या व्यवस्थेचे स्टेकहोल्डर म्हणून क्रियाशील असतो. बायबलमधील त्या पापी स्त्रीच्या मागे दगड घेवून धावणारे त्या काळातले ‘न्यायाधीश’ आणि सोशल मीडियामध्ये किबोर्डच्या सहाय्याने शाब्दिक दगडफेक करून आपल्याला ‘पापी’ वाटणाऱ्या व्यक्तीस शिक्षा, दंड देणारे आपण आजच्या काळातले ‘न्यायाधीश’ ह्या दोहोंमध्ये गुणात्मक आणि मूल्यात्मक काहीच फरक नाहीये.

आपण ज्या राष्ट्राचे नागरिक आहोत त्या राष्ट्राची स्वत:ची कायदेव्यवस्था असूनही आणि ती आपण मान्य केलेली असूनही एखाद्या ‘अपराध्याची’ ट्रायल घेण्याची उबळ आपल्यात का निर्माण होते हा आपल्यापुढचा गंभीर प्रश्न आहे. ह्या प्रश्नाचा शोध घेत गेल्यास आपल्या हाती काय लागते हे पाहणे उद्बोधक असेल.

आपल्याला ‘अपराधी’ वाटणाऱ्या व्यक्तीस शिक्षा मिळाली पाहिजे अशी एक भावना प्रत्येकाच्या मनात नैसर्गिकरित्या निर्माण होते. मात्र आपल्या ह्या भावनेला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी आवश्यक ते अधिकार आधुनिक व्यवस्थेने आपल्या हातून काढून घेतले आहेत. अशा वेळी आपल्या मनात निर्माण झालेल्या ‘अपराध्याला शिक्षा देण्या’च्या उर्जेचं विरेचण कसं करायचं हा एक महत्वाचा प्रश्न आपल्यापुढे निर्माण होतो. सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात त्यासाठी आपल्यापुढे एक नवीन आणि सहजसोपा मार्ग उपलब्ध झालेला आहे. ह्या नवीन मार्गाचा वापर आपण अगदी सर्रासपणे आणि सढळ हस्ते करीत आहोत. ह्या मार्गाला आपण ‘अभिव्यक्त होणे’ असं एक अत्यंत गोंडस आणि अनचॅलेंजेबल नाव दिलेले आहे.

समाजात एखादी आक्षेपार्ह घटना घडली की लगेच त्या आक्षेपार्ह घटनेस जो व्यक्ति कारणीभूत आहे असे आपल्याला वाटते, त्या व्यक्तीस आपण आपल्या मनातल्या आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून कथा, कविता, चित्र, नाटक, ललित लेख इत्यादि सर्जनशील लिखाणाच्या माध्यमातून त्याच्यावर ताशेरे ओढतो. हे ताशेरे ओढताना आपल्याला कसं सगळं लख्ख दिसतय आणि आपल्याला जे दिसतय तेच कसं लख्खय याबाबत आपला आत्मविश्वास सात मजली उंचीवर पोहचलेला असतो. आपल्याला जे दिसतय त्याच्यापालीकडेही काही असू शकते ही शक्यतादेखील आपल्या मनाला स्पर्शत नाही. सध्याच्या सोशल मीडियाच्या उथळ खळखळाटात कोणती बाजू घेतल्यास आपल्याला आधिल लाइक मिळू शकतात ह्याचा हिशोब करून त्याप्रमाणे लिहिणारे (न्याय करणारे) महाभागसुद्धा असतात. तर अशाप्रकारे समांतर न्यायव्यवस्थेचा आजचा आविष्कार हा सोशल मीडियाच्या कृपेने पूर्वीच्या ‘कानाफुसी’ वरून पदोन्नती मिळवून ‘लिहिणे, अभिव्यक्त होणे’ अशा सोफेस्टीकेटेड अवतारात अवतीर्ण झाला आहे.

The Map is Not the Territory

हे जग जसे असावे असे आपल्याला वाटते, तसे ते असू शकत नाही कारण हे जग कसे असावे हयाविषयी जशा आपल्या आदर्श कल्पना असतात तशाच त्या ह्या जगातील उरलेल्या सातशे-साडेसातशे कोटी लोकांच्या मनातदेखील असतात. शिवाय कालक्रमानुसार, अनुभवानुसार प्रत्येकाच्या मनातील ह्या आदर्श कल्पनेत बदल घडून येतात. त्यामुळे ह्या जगाची एकच एक अशी आदर्श कल्पना संभवणीय नाही. मेंदूविज्ञानाच्या अभ्यासात एक तत्व पायाभूत तत्व म्हणून वापरले जाते. ‘the Map is not the Territory’ हे ते तत्व होय. जगाविषयीच्या आपल्या ‘धारणा’ आणि ‘वास्तवा’तील जग यात खूप अंतर असतं. आपल्या धारणा ह्या मेंदूने (neural pattern) निर्माण केलेल्या असतात. आणि ह्या धारणा तयार होणे, मजबूत होणे, धारणा तुटणे ही क्रिया सातत्याने आपल्या मेंदूत होतच असते. त्याला अनेक बाह्य आणि आंतरिक बाबी करणीभूत असतात. मात्र आपल्या धारणा (neural pattern) जरी मजबूत झाल्या किंवा त्यांत बदल झाले तरी त्याचा परिणाम वास्तवातील जगावर होत नसतो. वास्तवतील जग हे नेहमीच जसे आहे तसे राहते. (इथे वास्तवातील जग म्हणजे काळाच्या आणि अवकाशाच्या एका विशिष्ट तुकड्यात बंदिस्त जग अशी कल्पना करणे सोयिस्कर राहील.)

वरील वस्तुस्थितीचं नीट आकलन करून घेतल्यास हे जग जसं आहे असं आपल्याला वाटतं तसं ते प्रत्यक्षात नाहीये हा साक्षात्कार आपल्याला होतो. आणि हा साक्षात्कार आपल्याला दुसऱ्यावर दगड फेकण्यापासून परावृत्त करू शकतो. आपल्याला जो व्यक्ति अपराधी आहे असे वाटते तो व्यक्ति अपराधी असेलच असे नाही ह्या एका शक्यतेची एकदा का जाणीव झाली की मग आपण आपल्या हातातला दगड फेकून देवू शकतो आणि आपली सर्जनशील ऊर्जा अधिक चांगल्या सर्जनासाठी वापरू शकतो.

# आणि जुळता जुळता तुटलं - सुहास बिऱ्हाडे

लग्न ही प्रत्येकाच्या आयुष्यातली महत्वाची आणि आनंदाची (सुरवातीला तरी वाटते) बाब. हल्ली लव्ह मॅरेज हा प्रकार कॉमन असला तरी अरेंज्ड मॅरेजची प्रथा अद्यापही टिकून आहे. पण वधू वर पाहण्याचा कार्यक्रमाची पध्दत बदलली आहे. मुलं मुली आधी बाहेर भेटतात. ओळखी वाढवतात. मग पटलं की नंतर घरी कळवतात असा प्रकार होत असतो. लग्नासाठी वधू वर संशोधन करण म्हणावं तेवढं सोप्पं नसतं. वागण्या बोलण्यातल्या लहान सहान गोष्टी खूप महत्वपूर्ण ठरत असतात. कुणाला कुठली गोष्ट कधी खटकेल ते सांगता येत नाही. आलेलं स्थळ नाकारण्याची अनेक कारणं असतात. अनेकदा दोन्ही पक्षांकडून चित्रविचित्र अटी घातल्या जातात. त्यामुळे देखील लग्न जुळत नाही. पण मुलं मुली जेव्हा भेटतात तेव्हा मात्र स्थळ नाकारताना त्यांच्या

लहरी स्वभावाचे दर्शन याच वेळी घडत असते. मुलीला किंवा मुलाला नाकारण्यासाठी क्षुल्लक कारणही पुरेसं ठरते. ते पाहून हसावं की रडावं अशी परिस्थिती असते. पण काही कारणं अतिशय गमतीशीर  असतात..फर्स्ट इंप्रेशन इज लास्ट इंप्रेशन असं म्हटलं जातं. ते अनेकदा खरं देखील असतं. पण पहिल्याच भेटीतील वागण्याबोलण्याची पध्दत भावी नात्याचे भवितव्य ठरवत असते.

कॉफी विथ आईसक्रीम

माझ्या परिचयाच्या एका मुलीने एका मुलाचं स्थळ नाकारलं. मुळात ही मुलगी खूप चोखंदळ होती. अनेक मुले तिने यापूर्वी नाकारली होती. तुझ्या मनासारखा मुलगा तुला मिळणारच नाही असं आम्ही तिला नेहमी म्हणायचो. पण ती ठाम होती. माझ्या सर्व आवडीचा मिळाला तरच मी करेन असं ती सांगायची. अखेर तिला एक मुलगा पसंत आला. तिच्या अपेक्षा पुर्ण करणारा तिच्या दृष्टीने तो लाखात एक होता. मॅट्रीमोनिअल साईटवर भेटला. मग फोनवरून गप्पा गोष्टी सुरू झाल्या. मुलगा स्थिरस्थावर होता. मुंबईचाच होता. दिसायलाही चांगला होता. आपल्या मुलीने चांगला मुलगा शोधला याचं आई बापालाही समाधान वाटत होतं. फोना फोनी बऱ्याच रंगल्यानंतर मग प्रत्यक्ष भेटीचा योग निश्चित करण्यात आला. मुंबईच्या दक्षिण उपनगरातील एक छानसं हॉटेल ठरलं. ही पहिली औपचारिक भेट होती आम्ही त्याला डेट म्हणत होतो. मुलीने कॉफी ऑर्डर केली. आणि त्या मुलाने आईसक्रीम. गप्पा गोष्टी झाल्या आणि ते निघाले. मी तिला अभिनंदनासाठी फोन केला तेव्हा ती म्हणाली स्थळ रिजेक्टेड. मी धक्कायुक्त आश्चर्ययाने विचारलं. सर्व काही तर ठिक होतं. मग का नाकारलं. ती म्हणाली त्याला काही मॅनर्स आहेत की नाही. मी कॉफी पित असताना तो आईसक्रीम कसं काय खात होता. एरवी आईसक्रीम खाणं ठिक होतं. पण पहिल्या भेटीत समोरची मुलगी कॉफी पित असताना तो आईसक्रीम कसं खातं होता. काही मॅनर्स आहेत की नाही. तिचं उत्तर ऐकून मी आईसक्रीम प्रमाणे गार झालो.

काळूबाईच्या नावाने.

माझ्या बायकोचा एक मित्र मुलगी बघायला गेला होता. मुलगी पुण्याची होती. सगळं काही जुळून येत होतं. मुलगी दिसायला सुंदर होती. चांगली नोकरी करणारी होती. दोन्ही बाजूच्या मंडळींनी  पसंती दर्शवली होती.

सगळा योग तसा जूळून आलेला होता. हे स्थळ जवळपास नक्कीच झालं होतं. मुलीच्या पालकांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होतं. कार्यक्रम आटोपला निघताना मुलाने तिला सहजच एक प्रश्न विचारला. प्रश्न अगदी साधा आणि सहज सुचलेला होता. काहीतरी बोलायचं म्हणून त्याने हा प्रश्न केला होता. पण त्या प्रश्नांचे जे उत्तर त्या मुलीने दिले ते ऐकून एका होऊ घातलेल्या नात्याला कलाटणी मिळाली.

त्याने प्रश्न विचारला होता. तुला चित्रपट बघण्याची आवड आहे का? सध्या कुठला चित्रपट पहिला आहेस?

ती म्हणाली, तसे फार बघत नाही. फक्त सिलेक्टेड बघते.

मी नुकताच पाहिलेला चित्रपट म्हणजे...

"काळुबाईच्या नावाने चांगभलं"

मुलगा तडक उठला. आपल्या भावी पत्नीची सिलेक्टड सिनेमे पाहण्याचे सिलेक्शनमुळे त्याने स्थळ रिजेक्शनचा मार्ग पत्करला

शूज खटकले

मुली मॅचिंगबद्दल मिस परफेक्टनिस्ट असतात असं म्हणायला हरकत नाही. मुलं मात्र बेफिकिर असतात. नटणं मुरडणं हे त्यांच्या स्वभावात नसतं. पण मुली बघायला जाताना किमान याचं भान ठेवायलाच हवं. नाहीतर चांगल स्थळ हातातून जाण्याची शक्यता असते. एका मुलीने चांगल्या मुलास नकार दिला. तिच्या घरी अगदी पारंपारिक पध्दतीने ठरवून मुलगी बघण्याचा कार्यक्रम झाला होता. मुलाकडे पाहुण नटून थटून आले होते. कारण प्राथमिक बोलणी झाली होती. नाते, गोते सगळं जुळत होतं. त्यामुळे हे लग्न देखील जुळल्यातच जमा होतें. मुलाकडचे पाहुण गेल्या गेल्या तिने नकार दिल्याने तिच्या आई वडिलांना कळेच ना. सगळं काही ठिक होतं मग मुलगी का नकार देते. तिने जे कारण सांगितलं ते ऐकून तिच्या आई वडिलांनी कपाळावर हात मारून घेतला. तिला बघायला मुलगा आला तेव्हा त्याने मॅचिंगचे शूज घातले नव्हते. ज्याला मॅचिंग समजत नाही तो संसारातल्या गोष्टी काय समजणार असा तिचा तार्किक दावा होता.

गमतीचा भाग सोडला तर इतक्या क्षुल्लक कारणामुळे स्थळ नाकारणे हे उथळ मनोवृत्ती वाटते. पण सगळं काही मनासारखं हवं असं या तरूण पिढीला वाटत असतं हेच खरं.

---

## चारोळया – ख्रिस्तोफर रिबेलो

खरं जगणं तेव्हाच कळतं
जेव्हा सुखाबरोबर दु:खही पचवलं जातं
स्वत: सरळ चालत राहावं
तिरक्या वाटेवरचं घोडंही चालीत येतं

मेणबत्ती जळत राहते
वातीचं झिजणं गरजेचं होत असतं
मन बऱ्या वाईटाची ओळख घेत
खूप काही शिकून जात असतं

# नकुशा - बेर्नादेत रूमाव

' जेबा मेली गणा.'

' कूनला जेबा?'

' तू नाय ओळख्याशी. तू अडे याश्या आधी ती लगीन होवोन गेलती. तू तिला कते बगीलास नाय ते का ओळख्याशी.'

' आला ती कोनशा घरशी. शिमाई बेन. जरा लगडीस होती बग.'

' हा हा. आते ओळखिली बग. कते मेली ?'

' दोन दी झाले. ती बेन मरी देवळात भेटली ती हांगतोती.'

' आपल्याला का माइती पड्यासा ती तडे ओड्या पक्क्या लांब दिलती. आपल्याला कहा समज्यासा.'

' भावलानी आयके नाय ना. ओड्या लांब म्हणजे कडे?'

' तडे कोर्लयलायला.'

' पक्की बरी पोरीला.'

'तास गणा. गरिबीत रेली. आन हालाहालात गेली ला. आते मेली ते एकदाशी हुटली.'

' का करता. नशीब. सल म्यें नींगाते. हुर झालो गणा.'

बस त्यानंतर हा संवाद तेथेच संपला. शेजारणी आपापल्या कामाला निघून गेल्या. पुढे जेबाची ना कुणी आठवण काढली की ना कुणी तिच्या मुलाबाळांची चौकशी केली. ईच्छा असूनही तिच्या घरी कुणी प्रार्थनेला जावू शकले नाही. तिच्या मुलाबाळांसाठी जेवण खाण्याची सोयही कुणी करू शकले. तिची मुले काळी की गोरी आहेत. हेही कुणी कधी पाहिले नाही. कसे पाहणार? इतक्या लांब दूरचा प्रवास. तितकाच गाडी घोड्याचा खर्च. दुसऱ्याच्या शेतात मजुरीवर खपणारी, दारुड्या नवऱ्याच्या, कजाग सासूच्या हाताखाली आला दिवस ढकलणारी ती. माहेरी यायला पैसा तरी कुठून आणणार? त्यात सासू दिवसभर दारू गाळणारी... जेबाला असल्या गोष्टीची तर सवयच नव्हती. कुणाकडे दोन पैसे उधारीने मागून काही करता आलं असतं. तर गावात ना कुणाची ओळख ना पाळख. त्यात पुन्हा भाषेची ही अडचण. भाषा अशी वेगळी आणि कठीण.

जेबा तशी थोडी मिश्किल आणि विनोदी स्वभावाची होती. आयुष्याबद्दल कुरकुर करण्याचा तिचा स्वभाव नव्हता. पदरी पडलं पवित्र झालं, असे मानण्याची तिची वृत्ती पण लग्नानंतर तिच्यात आमूलाग्र बदल झाला. भावाच्या लग्नासाठी जेबा माहेरी पहिल्यांदाच आली. तेव्हा जेबाला मी पहिल्यांदा आणि बहुदा शेवटची भेटली. पण इथल्या दोन दिवसात जेबाच्या मूळवृत्ती फुलू लागल्या. ती पुन्हा पूर्वीसारखी आनंदी दिसु लागली. तर तांदूळ निवडताना जेबाने सांगितलेला हा किस्सा अजूनही आठवतो आणि हसायला येते.

जेबाच्या सासूने मागच्या दारात नेहमीप्रमाणे हातभट्टी लावली होती. भट्टी मस्त जमली होती. त्याचा मादक वास सर्वत्र पसरला होता. थेंब थेंबाने मद्य बाटलीत पडत होते. डोंगरावर जावून लाकडे घेऊन जेबा आली होती. तिच्या घशाला कोरड पडली होती. पायात गोळे आले होते. सारे शरीर घामाने निथळत होते. इतक्यात सासूची कर्कशवाणी जेबाच्या कानी पडली. "जेबेन, फोक मार. फोक..."

जेबाला कळेना. ती बावचळली सरळ उठली आणि दारामागे ठेवलेला बांबूचा मोठा फोक घेऊन सासुसमोर आली. तर सासू अधिकच करदावली आणि मोठ्याने किंचाळत म्हणाली," फोक मार...फोक." आल्यापावली ती मागे वळली. जेबाने बांबूचा फोक दारामागे होता तेथे ठेवून दिला. तिला वाटले, बहुदा सासूला आपली दया आली असावी. ती आपल्याला, "जेबन...घोट मार...घोट मार." असे सांगत असावी. कारण श्रमपरिहार म्हणून तिथल्या बायका बऱ्यापैकी पिणाऱ्या होत्या. तर जेबा सासुसमोर मानखाली उभी राहिली, म्हणाली,"मोठे माय, मी पीत नाय." सासूने कपाळावर हात आपटला. आणि जेबच्या माहेरच्या माणसांचा उद्धार करण्याच्या आलेल्या संधीचे तिने सोने केले. हा किस्सा जेबाच्या तोंडून ऐकल्यावर आम्ही साऱ्या पोट धरून हसत होतो.आमच्यात जेबाचे हसू विरघळून गेले. पण त्यामागील कारुण्य अधोरेखीत झाले. जेबा त्यानंतर निघून गेली ती परत कधी आली नाही. आली ती तिच्या जाण्याची बातमी.

एका जेबाची ही प्रातिनिधिक कहाणी. त्याकाळी अशा अनेक गरीब, हुंडा न देवू शकणाऱ्या, काळया, कुरूप, दिव्यांग, नको असलेल्या, आईबाबांना भार झालेल्या असंख्य जेबा त्यांच्या इच्छेविरुद्ध, कोवळया वयात फेकल्या गेल्या. त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांचं काय झालं. त्या कशा जगल्या. कशा मेल्या यांची दखल घ्याला ना कुणाला उसंत मिळाली ना कुणाला वेळ मिळाला. या 'नकुशा'नी तरुणपणी बाबाची घरे सांभाळली. मोठेपणी बाबाच्या इभ्रतीला धक्का लागू दिला नाही. जे वाट्याला आले ते निमूट भोगलं.

ख्रिस्तजन्माचा आनंद साजरा करत असताना या नकुशाप्रमाणे जोसेफला तरी बाळ कुठे हवं होते ? मरियेचे गर्भारपण त्याला तरी कुठे मान्य होते.? त्याचा तरी या सगळयांवर कुठे विश्वास होता ? मरियेला असेच सोडून देण्याच्या विचारात जोसेफ नव्हता का? त्याकाळी तेव्हाच्या कर्मठ समाजात कोवळया वयातील अल्लड निरागस मरियेच्या वाटेला कोणते भोग आले असतील? त्या कोवळया मुलीने हा प्रचंड ताण आणि तणाव कसा सहन केला असेल ?

पण या सर्व संकटात ती तावून सुलाखून निघाली . मारिया जिवंत श्रद्धेच प्रतीक बनली. समाजाची पर्वा न करता अत्यंत ताकदीने ती समाजाला सामोरी गेली. समाजाने अबला ठरवलेल्या स्त्रियांना मारियेने धैयाचा जो एक वस्तुपाठ घालून दिला. त्या वाटेवरून जाताना या नकुशांनाचे मार्ग हळूहळू सुखकर बनत गेले.

जगभरातील नकुशाचे स्मरण करून हा ख्रिस्तजन्माचा आनंद साजरा करू या.

# पिरेल काकाची बखर - सॅबी परेरा

पिरेल काकाकृत कुपारीस्तानाची बखर

(अर्थात ख-याखु-या राज्यांचा खोटानाटा इतिहास)

शके १८९५ - शार्वरीनाम संवतसरे फसली सन १०१० पासून फुडे

[रुमाल १ पहिला]

==========================

सुकुर मावली प्रसन्न

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपती स्वामीचे शेवेसी शेवक बस्त्याव शिमा पिरेल समस्त राजमंडळ कृतानेक विज्ञापना. जे साहेब कृपाळू होऊन शेवकास विचारिले, जे अखंड वसई इलाख्यातील कुपारी राजे पराक्रम करून राज्य करिते झाले आणिक त्या राज्याचे तुकडे कैसेजी जाहले हा वृत्तांत काय, कोठील पासून सांगणे म्हणोन आज्ञा केली त्याजवरून वर्तमान आसे आहे हे राज्यबरहुकूम सांगणे करिते जाले.

**नंदाखाल**

या राज्यावर सूर्य कधीच मावलत नशे. उगवतीला बोळींजपासून मावलतला राजोडी, दक्सिनेला नाळे-नानभाट आणिक उत्तरेला उमरगोठण येथवरचे परगणे नंदाखाल राज्याने बलकावले होते. हळुहळू एकेक परगणी आपुला सवत्यासुभाचा दावा मांडू लागली आणिक स्वसत्तेने वागू लागली. गिरिजाघरे, विद्यापीठ, पेढी आशा सकल सुविधा आपल्याकडे ठेवून ह्या राज्याने आजूबाजूच्या परगण्यांस परावलंबी करून ठेवियले होते. ह्या समन परगण्यांनी आप-आपला सवतासुभा खडा केल्यानंतर नंदाखालच्या गादीस अवकळा येवो लागली. या राज्यातले लोक अगासी सिवाय करोन आजूबाजूच्या गरीब आणिक मागास राज्यांशी रोटीबेटी व्यवहार ठेवित नसत. कारण की तेंचे म्हणणे आसे की, आमची मुलगी नंदाखाल-अगासी बायेर द्यावयाची सोय नाही. त्यांची व आमची बरोबरी नाही सबब रोटीबेटी व्येवार होणे नाही.

नंदाखालचे किनारपट्टीकडील काइक सुभ्यांना सोन्याच्या इटा मिळोन धनलाभ जाल्याचे कर्नोपकरनी आसले तरी त्यांस काही सबोत नाही. तसे आसते तर विराट नगरीच्या सम्राटाने सोन्याच्या इटा मिळोन्यापाइ किनारपट्टीवर धावा बोलोन तीस लुटन्यास कमी केले नसते. (उत्तरेस वडरायी नामक परगण्यात लोकांसी जालेल्या धनलाभावर विराट नगरीच्या सम्राटाने आपुला दावा करून केलेल्या तंगडतोडीस आणिक संहारास इतिहासात तोड नाही).

शके १९०५ आसपास नंदाखाल राज्यात राजाला कुणी जुमानी नासे जाहले, गुंडापुंडाचा परभाव वाढला. राज्याची बहुत छी-थू झाली. फुडे एक-दीड तपाअंती आंगभूत हुशारी आणिक विद्याभ्यासाच्या बळे नंदाखाल राज्य आपुले गतवैभव परत मिळविते जाहले.

**अगासी**

हे राज्य सतत आपल्या अैतिहासिक वारश्यात व आपल्याच तो-यात मश्गूल असे. सोलाव्या लुईच्या पावलावर पाऊल ठेवून, 'कणेरी नशेल तर बियर प्या आणिक चपाती नशेल तर भुजिंग खा' असा उद्दाम सल्ला इथल्याच राजाने रयतेला दिला होता.

अगासीचा सेतकरी फुलसेतीचे कामावर फार निपुण होता त्यांचे हातुन लागण फार चांगली होत असे. उत्पन्नही भरगोस येत असे. येथिल फुलांचे व्यापारी सवताच्या फुलांबरोबरच शेजारील राज्यातील अल्पभूधारक सेतक-यांकडून अतिशय कमी भावात कागडा, मोगरा, टगर अशी नामी फुले पडेल भावाने विकत घेऊन ती मुंबईच्या बाजारात चढ्या भावाने विकायचे. ही आर्थिक पिलवणूक शके १९२० पर्यंत सुरू होती.

अलम वसई इलाख्यात सकाळी दुस-या प्रहरी नित्यनेमाने सोमरस प्राशन करोन मस्त होण्याचा पराक्रम अगासी राज्याच्या खात्यावर नोंदलेला आहे. शके १९०० खाली अगासीतील जवानांनी मुदपाकखान्याच्या धंद्यात, आरमारात आणि सागरी मोहीमांत बहुत नाव केले.

**बोलींज**

बोलीजची रयत अतीअंत श्रध्दालू आशी होती. डोंगरमाऊलीचे ठायी परमनिष्ठा आनन्यभावे करून सदोदित आसावे, जैशी आपली भक्ती वाढेल तैशी आपली संतती वाढेल ऐशी त्यांची श्रध्दा होती

लष्करी दृष्ट्या अतीअंत मोक्याच्या ठिकाणी हे राज्य वसलेले होते. इतर कुठल्याच राज्यात जाहले नाहीत इतुके पराक्रमी धुरंदर सरदार या राज्यात जाहले. आपले अंत:करणी मनात आणिले तर ते ब्रह्मदेवालाही भिनार नाही. पण या राज्याने स्वसत्ता होण्यापेक्षा दर वखत कोना ना कोना सम्राटाचे मांडलिक बनोन राहणेच पसंदीले.

**नानभाट**

नंदाखाल राज्याची जुलमी राजवट, पारतंत्र्य, गरीबी, विद्याभ्यास आणिक वैद्य-आवषद खेरीजचा अभाव यामुले या राज्याचा विकास खुटला होता. एकेकाली नानभाटातून सोन्याचा धूर निघायचा असी दन्तकथा आहे (खरी बाब असी की ४ कोस पायी चालोन शालेत जाताना सोन्या-सोन्या म्हणजे सानुल्या विद्यार्थ्यास आपल्या पार्श्वभागातून धूर निघत असलेचा भास होत आसे, असो). स्वातंत्र्यानंतर मात्र या राज्याच्या विकासाला चालना मिळोन राहिली. वेलंकनी मावली ठाई नानभाटच्या समस्त सभासीत लोकांची नीष्ठा फार अत्यंत होती. म्हणोन त्यांनी एक मोक्याची जागा हेरोन तेथे मावलीचा भलाथोरला पुतला खडा केला.

शके १९३७ संवतसरे नानभाटच्या गादीवरील राजाने विराट नगरीच्या सम्राटाशी संधान बांधियले आणिक त्यांच्याच मदतीने नानभाट तळ्याची ताल चिरेबंदी बांधोन, भला दिंडी दरवाजा बांधोन उद्यापन केले.

**अुमराले**

व्यापार-उदीम आणिक आरमार बाबत अतिअंत मोक्याच्या ठिकाणी हे राज्य वसलेले होते. या राज्यातील काळी रवयची वांगी जगाच्या बाजारात मशहूर पावली होती असा बोलावा असला तरी या बखरकाराचे अशे म्हणणे आहे की रवयची वांगी कधी मुंबई परगण्यापार गेलीच नाहीत. सबब, सोपाराचे बाजारात बाजारहाट कर वसूल करणा-या 'जगा' ठेकेदारामुले ही वदंता जाली असावी.

अुमराले राज्यात घरोघरी मास्तरलोक असले कारण करोन, कुणी कुणाचं ऐकून घेत नसे. मुबलक ताडी, दारू आणिक (अर्ध्या दिवसाची शाळा संपल्यानंतर मिळणारा) फावला वेळ या योगे अुमराले राज्याच्या वैभवाला उतरती कळा लागली.

**गास**

या राज्याने जैसे खूप जोगी आणिक जोगीनी जन्मा घातले तैसेच मुंबइ महापालिका आणिक रेल्वेलाही बक्कळ कर्मचारी-अधिकारी पुरविले. गास देवलाच्या सणाच्या दुस-या दिवशी मुंबई महापालिका आणि रेल्वेचा कारभार जवळजवळ ठप्प होत असे.

गास राज्यात घरोघरी चाणक्य आणिक नाना फडणवीस आढलत. परंतु आपसी दुही, बंडाळी आणिक घरभेदी वृत्ती यांनी या राज्याचा घात केला. गास राज्याची सूत्रे, विस्थापित म्हणून शरण आलेल्या यवनांकडे गेली त्यांनी या राज्याचं नाव मोडून टाकीपाडा असे केले आणि विद्याभ्यास केलेल्या सीक्षाधारी समासित लोकांस अडाणी यवनाकडे दिल दिलासा करोन राहण्याची नामुष्की ओढवती जाली.

**निर्मल**

निर्मलचे देवालय पुर्तुगीज घुमटी नमुनाचे मात्र होते. ते देऊळ पर्वतावर आरण्यात झाडीत होते. तेथे दर्शनास लोक सडे येत होते. सुरूवातीचे काळात तीर्थक्षेत्र म्हणोन ख्याती जालेले हे राज्य नंतर तेथिल रयतेने एका बाहुबली सम्राटाला दिलेल्या तीर्थप्रसादाबद्दल प्रसिध्द पावले त्याचे असे जाले की, मोठी लढाई तुंबळ जाहली. फार रणखुंदल जाले. तिकडील लोक फार पडून पाडाव जाहला. बाहुबली आणि त्याचे स्वार यानी धास्त खाऊन सर्वांचे औसान खता जाहले. जे हे परमयोध्दे झुंजार व सामर्थ्यवान प्रतापी धन्य यांची मातापीता ज्याचे उदरी आशी रत्ने निर्माण जाहली अशी स्तुती परंपरा करू लागले किर्ती चहूकडे प्रकट जाहली

निर्मल प्रांती, दक्सिणेनेकडे मवालमारगी जमात तर उत्तरेकडे जहालमारगी जमात, एक परगणा फुडारलेला तर दुस-या परगण्याचा पाऊस मोसमात जगाशी संपर्क तुटणारा. अशा बहुपेडी रयतेची नाडी वलखता न आल्याने सोवियत रशियाप्रमाणे या राज्याची शकले शकले जाली.

**भइगाव**

भइगावची सारी रयत पुण्यपरायण आणिक धार्मिक. याची देवाचे ठिकाणी नीष्ठा फार. अती कष्टाळू आणिक बुध्दीमान रयतेच्या या राज्याला भौगोलिक स्थानामुले आणिक बोलीभाषेतील काहीशा वेगलेपणामुळे आजूबाजूच्या राज्यांकडून चेष्टा आणिक हेटालणीचा धनी व्हावे लागले. शके १९०० खाली येथे झालेल्या

धार्मिक स्थित्यंतरामुळे आणि स्वयंघोषित देवाच्या अवताराने केलेल्या चमत्कारामुळे हे राज्य सतत चर्चेत राहिले

शके १८९५ - शार्वरीनाम संवतसरे फसली सन १०१० नंतरच्या कालातील वसई इलाख्यातील कुपारीस्तानाची आणि येथिल रयतेची परमूख वयशिष्ठे येणेप्रमाणे :

किइत्येक सुबे-परगणे आपण स्वसत्ताप्रमाणे वागावे असे मनात येवोन मूळ राजगादीपासून काडीमोड घेवोन स्वसत्तेने वागू लागले

अंगरख्या बायेर काढीलेल्या सोन्याच्या चेनवरून आणिक गिरिजाघरातही डोळयावर घातलेल्या काळया चष्म्यावरून नोकरीसाठी अरब प्रांती जाऊन आलेला इसम वोळखू येवू लागला.

चाकरीतून संन्यास घेऊन येणा-या इसमास आश्चीर्य मानून करून समाधान होवून, बँड लावून, बरव्या प्रकारे सम्मान करायाची चाल सुरू जाली.

पुंडावे करून मुलखाचा खराबा करणा-यांचा रयत-समाज रोटी-बेटी व्यवारात मान राखू नाही जाला.

सरदारकीच्या अन मनसबदारीच्या निवडणूकीचा मौसम वगलता, कुपारीस्तानाची तमाम रयत गुणागोविंदाने राहात अशे.

कुपारीस्तानाची जनता कुटे लगीन-कारीयाला जाण्याआधी, व-हाडी मंडलीची सोय काय आहे याची खातरजमा करीत अशे.

करंजीच्या आकारावरून व्याही मंडलीची औकात जोखली जात अशे.

या घटीकेला कुपारीस्तानातला मास्तर नशलेली मुंबइत एकही शाला नाही, कुपारीस्तानातला आचारी-वाढपी नशलेले मुंबइत एकही उतारगृह नाही आणि कुपारीस्तानातला आचारी-वाढपी-खलाशी नसलेले समुंदरात एकही जहाज नाही.

आपली भाषा, आपला वेश आणिक आपल्या संस्कृतीवर होणा-या आक्रमनाचे पारपत्य कसे करावे म्हणोन समन कुपा-यांनी एक येवून कचेरी केली आणि सगळे मिळून मसलत केली आणि बाकी काइ न सुचल्यामुले वर्षागणिक कुपारी मोहोत्सव सुरू जाहला

=======================

ता.क. : व्यवहारातून मोडीत निघालेल्या मोडी लिपीची अमिट गोडी वाचकांसमोर पोहोचविण्यासाठी काही घडामोडी मोडी लिपीत लिहिल्या आहेत. (त्याबदल्यात अमिट शहाच्या मोडी सरकारकडून काही मिळवायचा उद्देश नाही). वाचक हे लिखाण खेळीमेळीतच घेतील व माझ्यावर हाडमोडीचा प्रसंग येणार नाही हीच अपेक्षा.

========================

# लेखक - सिरील मिनेझीस

अधुन मधून  एक तथाकथित लेखक महाशय भेटतात. तस पाहिलं तर ह्या महाशयाच लेखन मीच काय कुणीच वाचल नसेल ,तरी ही ते स्वताहाला लेखक म्हणूनच संभोतात. हातात वळकटी केलेले दोन तीन स्थानिक एक मात्र रूपया किंमत असलेली सुमार दर्जाचा कागद वापरलेली व राजकारणी लोकांच्या शुभेच्छानी भरलेली वर्तमानपत्र .मी त्याला एकदा विचारलं ,

" बाबारे , तू वाचन करतोस का ?"

" छे , वाचनाला माझ्याकडे वेळच नाहीये. "

" बर ,मग तू वर्तमान पत्र तरी वाचतो का ?"

" एवढं कोण वाचत बसणार ? मी फक्त टायटल वाचतो ,आत काय बातमी आहे ते मला आपोआप कळते."

" मग तू लेखन कसं करतोस ? "

" ते माझ्या आतून येते."

मी कोपर्या पासून हात जोडला .आन मनात म्हटलं ,

'असला लेखक परत होणे नाही.'

प्रत्यक्षात या लेखकाचे लेखन साहित्य म्हणजे , विनंती अर्ज ,तक्रार अर्ज व कर्जाचे फॉर्म भरणे या पूर्ताच मर्यादित होते हे चाणाष्य वाचकांच्या ध्यानात आलंच असेल.

" एवढं चांगल लिहायला तुम्हाला कसं काय सुचतं बुवा ?"

असा कोणी प्रश्न विचारला की मी त्याला उत्तर देतो,

" नेमंक याच प्रश्नाचं उत्तर मला सुचत नाही बुवा ."

लेखन ही एक कला आहे मात्र वाचनाच रतीब घातल्या शिवाय लेखन काही केल्या फुलत नाही. एक काळ असा होता की पुस्ताकांना अन वाचनालयाला एक आगळ वेगळ महत्व प्राप्त झालं होत. मात्र आज आपण पाहीलं तर ह्याच पुस्तकांना आणी वाचनालयाला शेवटची घर घर लागली आहे. घरोघरी येणारं वर्तमानपत्र सुध्दा आता पोरकं झालयं. जिथं पाहावं तिथं मोबाईल मध्ये डोक खुपसलेली टाळकीच पाहायला मिळतात . आपल्या आजुबाजूला काय चाललय याचं भान सुध्दा त्याना उरलेलं नाहीये. वाटसप ,फेसबुक याचे ते गुलाम झाले आहेत. आता वाटसप - फेसबुक वाईट आहेत असाही प्रश्न नाही मात्र त्यांच्याकडे पाहण्याचा द्रुष्टीकोन आपल्याला बदलायला हवा. फिरुन फिरुन आलेले संदेश आपण फॉर्वड करण्यात धन्यता मानत असतो. त्याच

त्या क्लिपा पाहण्यात आपण वेळेचा दुरुपयोग करत असतो. एका क्लिकवर मीळणारी माहिती ,दर्जेदार साहित्याकडे आपण ढुंकून ही पाहत नाही .

पालक सुध्दा आपला मुलगा काय करतोय या गैष्टीचा कधी विचार करत नाही . हजारो रूपयाचा मोबाईल देताना एक पन्नास रुपयाच पुस्तक तो कधी आपल्या लेकराला घेत नाही. मला वाचायला वेळ नाही म्हणून रोजचं वर्तमानपत्र तो बंदकरतो.

मोबाईल मध्ये डोकं खुपसुन बसलेल्या एखाद्याला तुम्ही एक सोपा प्रश्न विचारला ,तो आपल्या डोक्याला ताप देण्याच्या भानगडीत अजिबात पडणार नाही ,सरळ गुगल ओपन करून तुमच्या सोप्या प्रश्नाचं उत्तर शोधत बसेल.

गेल्या वर्षी मेळाव्यात एक लहान चुणचुणीत लहान मुलगा मम्मी सोबत पुस्तक स्टॉलवर आला आणी माझं एक पुस्तक उचलून ,

" मम्मी ,हे बुक मला हवय "

असा म्हणाला , त्या मम्मीने काय कराव ? त्याच्या हातून ते पुस्तक उचकटून टेबलावर आपटलं ,आणी मुलावर खेकसली ,

" तुला नाही वाचता येणार ते."

आणी आपल्या बाळाला ओढतच ती घेऊन ती जाऊ लागली . मी ते पुस्तक त्या बाळाकडे दिलं ,

" जा ,माझ्या तर्फे भेट तुला ."

त्या मुलाच्या चेहर्यावरचा आनंद पाहुन मी मनात समाधान पावलो. निदान एक तरी भावी वाचक / लेखक येतोय. आपल्या मुलाचे सर्व हट्ट पुरवणारी माता त्याला नकळत वाचना पासून का बरे दुर नेत होती.

पूर्वीच्या काळी मनोरंजनाची हमखास गॅरेंटी ही पुस्तकातच सापडायची . मला आठवत मी पहिलं पुस्तक इ दुसरीत असताना वाचल. तेव्हा आम्हाला नंदाखालचे एक शिक्षक होते. आलेक्स डिकुन्हा . खुप ऊत्तम शिक्षक होते ते . शाळेत कुणा मुलांचा वाढदिवस असला की प्रत्येक विध्यार्थाकडून दहा नये पैसे वर्गणी काढून त्याचा वाढदिवस साजरा केला जायचा. लिंबाच्या गोळ्या आणी भेळ असा मेनू असायचा. आणि या सर्वांचा कळस म्हणजे ते बर्थडे बॉयला चार पाच गोष्टीची पुस्तकं भेट द्यायचे. एका गोष्टीच्या पुस्तकाचे मुल्य मात्र पंधरा नये पैसे असायचे. इतर मुलांना भेट मिळालेली पुस्तक पाहून मी माझ्या वाढदिवसाची वाट पाहत असे . माझा वाढदिवस शेवटी म्हणजे फेब्रुवारीत असल्यामुळे मला खुप वाट पहावी लागली .आणि एकदाची मला पुस्तकं भेट मिळाली ,आणि मग चालू झाला वाचनाचा प्रवास . मासिके , दिवाळी अंक , आणि बरच काही वाचण्यास सुरवात झाली. रोजच वर्तमानपत्र तर माझ्या घरी माझ्या जन्मा अगोदरच पासुन यायचं.

सांगायचा मुध्दा म्हणजे वाचना शिवाय लेखन येऊच शकत नाही शिवाय लिखाण करण्यासाठी लेखकाला आजूबाजूला डोळे ऊघडे ठेऊन वावरणे गरजेचे आहेत. माझ्या मता प्रमाणे तोच खरा लेखक की सांगितला बरोबर तिथल्या तिथे लेखन करू शकणारा .

# प्रौढ अविवाहीत - सायमन रॉड्रिग्ज

परवा अचानक ओखी वादळ आला आन त्या परिणाम मनून आपल्या वसई ला अचानक दोन दि भर डिसेम्बर मीने पाऊस पडलो.. त्या दुहऱ्या दिहा हाकोटे वॉक करीत असताना पयल्या मिस्सा ये लोक येताना दिखली ... जानुबाय भेटली गा रोजशी खबारबात होयाशी..

"जानुबाय .. आज पानी नाय कय नाय तरी हत्री घेटले ती ला?"

"संजू पान्याने साफसूफ वाट लाविली रे ... म्ये शार दि आदीस वाल मारलोतो आन साफ पन केलतो.. पाश्शे रुपय खर्च केलतो.. साफसूफ गेलो रे... " जानुबाय रडपती आलती.. ती करता ५०० रुपय खूप भोटी रक्कम होती .. वाला हिंगा खुड्योर तिला दोन पैशे कमाई होनार होती..

जानू बाय .. साठी आत बायारशी प्रौढा.. अविवाहीत प्रौढा..

....

"संजू .. बरो हा गा?" वड्यावाळ्या दुकानातने म्ये वडे घ्या लागलॉतॉ तडे जाकू भेटलो

"जाकु वडो खाया रे ?"

"वडो आन शा मिळते ते ... " जाकु नजरेत भूक होती ... कामोरने नाते देवळा जाता येता जाकु आपला लक्ष नहला तरी हाक द्यासो .. अपेक्षा .. पास दा रुपय शा पान्याला मिळयाशी ...

जाकु .. साठी आत बायारसॉ .. अविवाहीत प्रौढ...

....

"कोसू बाय .. ओडे दि जाले दिखली ना ती?"

"संजू तब्बेत बरी नोती रे .. ताप आलो आन नंतर रगात चेक केला ते डेंगू हान्गीलो.. शार दि इस्पीतळात काडले .. आते बरी हाय .. "

"मंग अजून आराम करोतो.. कामाला कदो साल्लीला... "

"नाय जायने ते खायने का? शार दि बेनीने केला , पन ती तरी कोडा बगीदे?"

कोसू बाय .. साठी आत बायारशी प्रौढा.. अविवाहीत प्रौढा..

.....

. आपल्या समाजा मीने ५०/६० वहरा पुडने बरेस माहने अविवाहीत रेले. बऱ्यास जना बाबतीत ते अविवाहीत रेन्या मांगसा कारण मंजे एक ते त्यायी आय किंवा आय आन बाबा दोगे पन त्या लांन पनातूस देवाघारा

गेल्यामुळे हवतार आयशा हाताखाला नाते काका काकी शा हाताखाला त्यांना दी काड्या लागले..आयते नोकर घारा मिळाले.. शाळा नाय त्यामुळे शिक्षान नाय .. आन बायारशा जगाहरी कुहनोस संपर्क नाय.. घर ,भाट, गायी , भयी आन ओलात यिस दुनिया ... आन समाजापुडे कत्तेस आले नात आणि घरनेस लानपानापासून त्यांना वेडा ठरविला गेलेला आन त्यानंतर गेले कित्तेक वहरे त्यास दुनियेमीने रेल्यामुळे त्यायि बौद्धिक वाढूस जाली नाय ...

त्या टायमाला पोर वेडो शानो, दारुडो , बिनकामाव कोहो पन अहलो तरी वराडलो जासो, पन गरीब दुबळ्या घरशी .. दिख्यादो जरा सावळी , शिक्षण कमी अह्यो चांगल्यो पोऱ्यो पन त्या टायमाला अठ्वऱ्यो रेल्यो ..

आज आपल्या गावागावात अहे बरेस प्रौढ अविवाहीत जाकु , जानुबाय , कोसुबाय हात ... घारामीने हिस्सॉ ओहोन सुद्धा जुन्या घारा ओहरीत आश्रिता हारके जगणारे... आते उतारवयाला आलेले... केवळ परिस्थिती मुळे आहा जगना नशिबी आलेले...

यंदाशा नाताळशा हनाला त्यांना भेटोन आन भेटवस्तू देवोन आपुन त्याव आन आपलो नाताळ सुखी करो या ...

# कविता - विषाची शेती - एमेल आल्मेडा

आपल्या आवडत्या व्यक्तीस टाळून न बोलता तो पुढे गेला तेव्हा
त्याचं हे असं वागणं बघून मन भ्यालं
कधीकाळी माझ्याकडून पेरलेलं विखारी बीज रुजलं होतं कि काय?
त्यांच्या घरी जाऊ नकोस असे म्हणत गचान्डीला धरून खेचत घरी आणलं
कधी ओरडलो,कधी रागे भरलो,कधी मारलं देखील
निष्पाप मन त्याचं,वाऱ्यासारखं ते त्यांच्या घरी जायचं
माझ्या नकळत त्यांच्यासोबत खायचं,प्यायचं, अंगाखांदयावर खेळायचं
माझ्या मनात शेजाऱ्यांविषयी असूया निर्माण व्हायची
आमच्यात वैर होतं आणि लेकारापायी मला कमीपणा येत होता.
शेवटी निर्वाणीचा दम दिला.
त्यांच्या घरी पाउल ठेवलस तर मी मरून जाईन
चिमणं पाखरू भेदरलं,नाही जाणार, नाही बोलणार त्यांच्याशी, कळवळून म्हणालं.
काळ सरला सगळं आलबेल झालं.
पण लेकरू आजही त्यांच्याशी बोलत नव्हतं.
मी विकारांची शेती केली होती.
एका निष्पाप मनात रागाच्या भरात द्वेष,वैर,मत्सर पेरू पाहत होतो.
मनामनात पेरलेलं हे विषारी तण उपटायला शेतमजूर बनून परत एकदा तू येशील का?
गवताच्या गंजीतून गव्हाच्या कोठारात आम्हा पाप्यांस नेशील का?

# रावजी - आयवन क्रास्टो

"शिटीमधून शिव्या देता......मी रावजी हाय! तुमचे कधीच भले होणार नाही" रावजीकाका दारू पिऊन आला आणि त्याला कोणी चिडवले तर शीळ वाजवणेही त्याच्या विरुद्ध कट केल्यासारखे असते. रावजीकाका साऱ्या पंचक्रोशीत 'रावजी' या एकेरी नावानेच पुकारला जातो. लहान थोर त्याच्याविषयी बोलताना रावजी म्हणूनंच त्याला संबोधतात.

मला आठवत नाही त्याहीअगोदर रावजी काका आमच्या गावात राहायला आलाय. गावाच्या बाजूला असलेल्या शिवाराच्या कडेला त्याचे खोपटे आहे आणि गेले चाळीस , किंबहुना त्याही अगोदर तो तिथे राहतोय. त्याला एक मुलगी आहे जिचे लग्न होऊन ती सासरी कुठेतरी मुंबईबाजूला राहते. हा आणि याची बायको या खोपटात आपला उंचापुरा संसार चालवतात. गंमत म्हणजे हा बायकोशी गेली कित्येक दशके बोलत नाही. कधी त्याविषयी त्याला डाफरले तर तो मूग गिळून बसतो. असे असूनही त्याच्या संसाराचा गाडा चाललाय.

रावजी वारली आहे. पोटासाठी गावात मिळणाऱ्या कामावर अवलंबून असतो पण वारलीपनाचा एक वेगळाच अभिमान त्याच्या नसानसात भिनलाय. निहं म्हंजे निहं (नाही म्हणजे नाही ) हा त्याचा बाणा आहे. तो सरसकट सगळ्याकडे कामाला जात नाही. त्याच्या वारली बुद्धीला पटणाऱ्या आणि त्याचे सूत ज्याच्याशी जमलेय अश्या गावकऱ्याकडेच तो मोलमजुरी करतो. मग काम नसेल तर दारू पिऊन नशेत तर्र राहील. त्याची बायको मात्र चार घरी धुणी भांडी करते आणि संसाराचा गाडा रेटायला मदत करते.

रावजी कधीहि भेटला आणि त्याला विचारले की कोणाच्या कामावर आहेस तर हमखास उत्तर मिळणार 'गोंड्याच्या'. 'गोंड्या' म्हणजे बीजाकाकाचा मोठा मुलगा ज्याची बरीच गुंठे बागायती शेती आहे व त्यात वर्षाकाठी बरीच उत्पन्ने काढली जातात. मग ती जवळच असलेल्या घाऊक बाजारात विकली जातात. दररोज काही ना काही बाजार असतोच असतो. मग, सकाळी पाचच्या सुमारास आपल्याला रावजी खांदयावर कावड घेऊन बाजाराला जाताना दिसेल. त्यानंतरही तो गोंड्याची काही बाही कामे करत राहतो. कधी कधी सकाळी शिवारात भंडाऱ्यानी काढलेल्या ताडीचे ड्रम वाहून नेण्याचे कामही तो करतो. थोडक्यात या कामातून मिळणाऱ्या मजुरीतून त्याचे भागात असावे. आणि मग दुसया कामासाठी तो कायम नकारघंटा वाजवत राहतो. सुगीच्या दिवसातही तो पेरणी, कापणी, झोडणी, वारा देणे ही कामेही करतो. पण गोंड्यासाठीच !

मात्र, एका हमखास कामासाठी रावजीशिवाय पर्याय नसतो व तोही त्यावेळेला अधेवेढे घेत नाही, ते काम म्हणजे लग्नाच्या वरातीत नवरानवरीच्या डोक्यावर हत्तीर (कलाकुसर केलेली छत्री) पकडण्याचे काम. अशावेळी तो झाकपाक कपडे घालून दारू न पिता वरात इप्सित स्थळी पोहचेपर्यंत सोबत असतो. आणि मग ती एकदाची पोहोचली कि कामाचा मोबदला आणि वर पोस्त घेऊन दारूच्या गुत्याची वाट धरतो.

या अश्याच एका लग्नात घडलेली घटना, रावजी हत्तीर पकडून जोडप्याच्या मागे निमूटपणे चालत होता. पण गावच्या पोरांना काय लहर आली आणि रावजींची चेष्टा चालू झाली. ती या थरापर्यंत पोहोचली कि वैतागून तो हत्तीर तसेच टाकून निघून गेला. वरात तशीच खोळंबली आणि बऱ्याच विनवण्या करूनही रावजी काही परत आला नाही. निह म्हंजे निह ! त्यानंतर लग्नाच्या वरातीत कधीच रावजीची चेष्टा झाली नाही !

आम्ही लहान असतानाचा रावजी आठवतो तो शिवारात इकडे तिकडे करणारा आणि गावाच्या क्रुसापुढे अबालवृद्धाबरोबर चकाट्या पिटत बसलेला. एक न विसरता येणारी आठवण येथे नमूद करता येईल. आम्ही लहान असताना शिवाराकडेला असलेल्या बावडीत पोहायला जायचो. पोहायला जायचो म्हणजे आमचा दिवसातला बराच वेळ शिवारात नाहीतर या बावडीत पोहण्या मध्येच निघून जायचा. हे चक्र किमान आम्ही कॉलेज संपेपर्यंत तरी कायम होते. रावजीही कधी तरी या बावडीवर संध्याकाळच्या वेळेस टपकायचा. आम्ही पोहत असताना तो अचानक कठड्यावरून पाण्यात उडी मारायचा. तो प्यालेला असायचा. मग तो घश्यातुन असे काही आवाज काढायचा कि विचारू नका. त्या आवाजाबरोबर बराच मालमसाला तोंडातून बाहेर यायचा. आम्हा मुलांना शिसारी येऊन आम्ही पाण्याबाहेर उतरायचो. रावजी एकटाच पाण्यात राजासारखा पोहत राहायचा. आणि मग त्याचे पोहण्याचे कसाब दाखवणे सुरु व्हायचे. एक हात उंचावून, दोन पाय पाण्यावर स्थिर ठेऊन तो पोहून दाखवायचा. थोडक्यात आम्हाला वाकुल्या करून दाखवायचा.

रावजी आता वयाच्या आठव्या दशकांत असेल. या वयात सामान्यपणे निवृत्त होऊन गोवऱ्या स्मशानात जाण्याची वाट पहिली जाते. क्षितिजापल्याड नजर लावली जाते. रावजी मात्र बरीच अंगमेहनतीची कामे अजूनही करतो. किंबहुना त्याला बघितल्यावर त्याच्या वयाचा अंदाज येत नाही. त्याचे केस अजूनही पिकले नाहीत. त्यांना नीट तेलपाणी न केल्यामुळे ते बिथरल्यासारखे दिसतात इतकेच. रावजींची अंगकाठीही अशी लोथाळलेली, कातडी सुरकुतलेली दिसत नाही. असे एखाद्याच्या शरीराबाबत का व्हावे हे गूढ आहे.

तसे बघितले तर वारली हि जात, अश्याच अंगकाठीने अन अंगकांतीने आयुष्यभर जगते व मरण पावते. निसर्गाचे या जंगलच्या राजाला हे वरदान असावे. निसर्गाच्या सानिध्यात आपल्या आयुष्यातले कमाल क्षण घालवणारी आणि झाडापानांशी संगत करून त्याच्या अंगाखांद्यावर खेळणारी ही जात. पण रावजी जंगल सोडून माणसांच्या जंगलात आला तरी आयुष्यभर वारलीच राहिला.

रावजीला आमची कादो (वसईची सामवेदी बोली) बोलता येते व तो त्या भाषेची नक्कलही करतो.मला तो नेहमी 'हायवन' म्हणून हाक मारतो.मला उगीचच मी हैवान असल्यासारखे वाटते.

रावजींचा बराच वेळ शिवारात जातो; कधी चक्कर मारावी तर तो बांधाच्या कडेला उकिडवा बसलेला दिसतो. शिवारात छोटी मुले संध्याकाळी क्रिकेट खेळतात, भंडारी ताडावर वारी काढत असतात, गावकरी वाडीतले काम आटपून घरी परतत असतात, मग येणाऱ्या जाणाऱ्याशी होणाऱ्या गप्पामध्ये त्याचा वेळ निघून जातो. मावळतीला सूर्य गेला कि तो खोपटात परत येतो. अंघोळ करून पावशेर नवटाक ढोसन्यासाठी बाजारात जातो. मी ऑफिसमधून येताना कित्येक वेळा मला तो दिसतो, आपल्याच धुंदीत, नशेच्या अधीन असलेला.

खूप वेळेला मनामध्ये विचार येतो अशीही माणसे जगाच्या पाठीवर जन्माला येतात आणि आयष्य आपल्या हिशेबाने जगतात. ते सुखी आहेत की नाहीत हे जाणणे आपल्या कह्यात नसते पण आपण चांगल्या खात्यापित्या घरात जन्माला येतो. शिक्षण करून कामधंदा करतो. कमी जास्त उत्पन्न कमावतो. एवढा आटापिटा करूनही स्वतःच्या हिशेबात आपल्याला कधीच जगता येत नाही. अश्यावेळी रावजीच्या आयुष्य जगण्याचे एक अप्रूप वाटत राहते.

# साखळी - सिमसन रॉड्रिग्ज

प्रसंग पहिला ! एकदा एक उमेदवार मुलाखतीसाठी गेला होता. नोकरीसाठी असणारी शैक्षणिक अहर्ता त्याने प्राप्त केलेली होती. त्याच्या  कामाचा अनुभव मिळताजुळता होता. मुलाखतीत विचारलेल्या सर्व प्रश्नांची त्याने समाधानकारक ऊत्तरे दिलेली होती. त्याच्या पगाराची अपेक्षा कंपनीच्या कक्षेत फिट बसणारी होती. पण कुठेतरी माशी शिंकली आणि घोडा खिदळला. ठामपणे मिळू शकणारी नोकरी त्याच्या हातातून निसटली होती.

प्रसंग दुसरा ! एका मुलाला एक मुलगी पाहता क्षणीच पसंत पडली होती. ऑफिसला जात असताना ती त्याच्या नजरेस पडली होती. तिच्या सुंदर रूपावर तो भाळला होता. त्याला तिच्यात आपली भावी वधू दिसू लागली होती. मनाचा हुर्ये करून त्याने तिच्या घरापर्यंत पाठलाग केला. तिच्या आईने तिच्यासाठी दरवाजा ऊघडल्यावर ती आतमध्ये जाणार तो पर्यंत हा दरवाज्यात पोहचला. मला तुमची मुलगी आवडली आहे व तुम्हच्याशी काही बोलायचे आहे, असे त्याने दरवाज्यातच तिच्या आईला सांगितले. आईला त्याच्या धैर्याचे आश्चर्य वाटले पण त्याचबरोबर तो विनयशील व प्रामाणिकही वाटला. तो उंच होता, खानदानी होता व तिने विचारलेल्या सर्व प्रश्नांना त्याने व्यवस्थित ऊत्तरंही दिलेली होती. पण कुठेतरी माशीच्या पायात काटा रूतला नी घोडा लंगडू लागला. तिच्या मुलीला त्याने घातलेली मागणी अखेर तीने धुडकावून लावली .

आता पुढे ! तो निघून गेल्यानंतर काही वेळाने त्या घरची बेल पुन्हा वाजली. आईने दरवाजा ऊघडला. "अरे पोरा, तू आलास ? इंटरव्ह्यूचे काय झाले ? " तीने दार बंद करता करता मुलाला प्रश्न विचारला. "आई, मुलाखत छान गेली होती गं, पण का कुणास ठाऊक, त्यांनी माझ्या नावावर शेवटी फुल्ली मारली." बहिणीने त्याच्यासाठी लिंबाचा सरबत आणला होता. सरबत संपल्यावर त्याची बहिण तो ग्लास धुण्यासाठी  किचनमध्ये गेली. "आई, हिला पाहायला एक मुलगा आला होता नं थोड्या वेळापूर्वी ? काय झालं त्याचं ? " टायची गाठ सोडत सोफ्यात बसताना त्याने बहिणीविषयी विचारले. " काही नाही रे, मुलगा सर्वगुणसंपन्न होता. आम्हाला पसंदही आला होता. पण जेव्हा आम्ही त्याला त्याच्या भूतकाळाविषयी विचारलं, तेव्हा तो त्याच्या मैत्रिणीविषयी ऊलटसुलट बोलू लागला. आज आपल्या समोर लोकांच्या विरोधात बोलणारा, उद्या लोकांसमोर आपल्या विरोधात बोलणारच' हा जगाचा नियम आहे. त्यामुळे आम्ही त्यास नकार दिला." आईचे हे बोलणे ऐकून त्याच्या डोळ्यासमोर भर दिवसा काजवे चमकले. त्याला त्याची मुलाखत आठवली. शेवटची नोकरी सोडण्याचे कारण सांगताना त्याने त्याच्या कंपनीवर काही आरोप केले होते. त्यामुळे मुलाखतकर्त्याने त्याला सर्व काही ठिक असूनही डावललेले होते, हे त्याच्या लक्षात आले. तो सोफ्यावर डोके गच्च धरून बसला.

ते पाहून आई बोलली, "अरे पोरा, कशाला काळजी करतोयेस तू ? याही पेक्षा चांगली नोकरी तुला नक्कीच मिळेल." आईचे बोलणे ऐकून त्याने नुसतेच 'हू' केले. "कुठल्या कंपनीत गेला होतास ? नाव काय त्या कंपनीचे ?" आईने सहज विचारले. त्यावर त्याने ठाण्यातल्या एका कंस्ट्रक्शन कंपनीचे नाव  सांगितले. मुलाच्या तोंडून त्या कंपनीचे नाव ऐकले व तीला शरीराचा पाया खचल्यासारखे वाटले. तीने पुन्हा मुलाला त्या कंपनीचे नाव विचारले. तेच नाव पुन्हा ऐकून तिची खात्री झाली. तिने आपल्या कपाळाला हात  मारला. मघाशी आपल्या मुलीला मागणी घालण्यासाठी आलेला मुलगा हा दुसरातिसरा कोणी नसून ठाण्याच्या त्याच कंस्ट्रक्शन

कंपनीचा पार्टनर  असल्याचे त्याने सांगितल्याचे तिला आठवले. पण आता पश्च:ताप करून काहीही फायदा नव्हता .

त्या मुलीने दिलेला नकार तो पचवू शकला नाही. खिन्न मनाने कार चालवत तो ऑफिसकडे रवाना झाला होता. डोळ्यात साचलेले अश्रूंचे स्पीडब्रेकर मनातील विचारांच्या गतीवर लगाम घालण्यात अपयशी ठरले होते. ईतक्यात त्याला भावाचा फोन आला. "अबे मजनू दिवानें, कैसी थी आपकी लैला ? काम फत्ते काय ?" ती दिसल्यानंतर पुढे काय करावे असे भावाला विचारल्यावर 'बन मजनू, जा घरनू' असा बिनधास्त सल्ला भावाने त्याला दिला होता. "सॉरी यार, तीने व तिच्या आईने माझा पत्ता कट केला. समजत नाही का केलं असावं त्यांनी असं !" एक लांबलचक ऊसासा टाकत तो बोलला. " बरं ते सोड, आज तू इंटरव्ह्यू घेतलीस, काय निष्पन्न झाले ?" त्याने विषय बदलून ऑफिसमध्ये बसलेल्या भावाला प्रतिप्रश्न केला. "अरे, एक ऊमेदवार मला खूप आवडला होता, पण मागची नोकरी का सोडली असे विचारले असता त्याने त्या कंपनीवर आरोप केले. ते मला रूचले नाही व दुर्दैवाने मी त्याला आत घेउ शकलो नाही." भावाचे हे ऊत्तर ऐकून तो सीटवर उडालाच. भावाचे शब्द त्याच्या कानातून आरपार मेंदूला भेदून गेले होते. त्याला ती मायलेकींशी झालेली भेट आठवली. आपण आपल्या गत मैत्रिणीविषयी वाईट मत मांडल्याने त्यांनी आपला लग्नप्रस्ताव नाकारला होता, हे त्याला एव्हाना कळून चुकले होते.

भाऊ फोनवर तिथून 'हॅलो हॅलो' करत होता पण तो ऊत्तर द्यायच्या मन:स्थितित नव्हता. डोळ्यासमोरून ती मुलगी जात नव्हती. "बोल. मी ऐकतोय." त्याच्या बोलण्यातील खिन्नता भावाला जाणवली. "अरे, काय ईतके मनाला लावून घ्यायचे त्यात ? तिच्याहून सुंदर व गुणी मुलगी तुला नक्कीच मिळेल." भावाने त्याला सावरायचा प्रयत्न केला." राहते कुठे ती मुलगी ? आणि नाव काय सांगितले त्या मुलीचे ?" भावाने विचारलेल्या या प्रश्नाला ऊत्तर देताना त्या मुलीचे नाव व पत्ता त्याने सांगितला. त्या मुलीचे आडनाव जरा हटके वेगळे होते. ते नाव ऐकले व त्याचा भाऊ खुर्चीवरून ऊठून ऊभा राहिला. त्याने तात्काळ टेबलावरील फाईल चाळली व 'तो' बायोडाटा बाहेर काढला. त्या बायोडाटावरील 'त्या' ऊमेदवाराचे आडनाव व त्या मुलीचे आडनाव एकच होते. दोघांचा पत्ताही सारखाच होता. त्याने ती फाईल टेबलावर फेकून दिली. त्याला स्वत:चाच राग आला होता. क्षुल्लक कारणावरून आपण आज नाकारलेला ऊमेदवार हा दुसरा तिसरा कोणी नसून 'त्या मुलीचा' भाऊ असल्याचे त्याच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. पण तो पर्यंत खूप उशीर झाला होता.

होय, माशी शिंकणे किंवा माशीच्या पायात काटा रूतणे या सारख्याच  क्षुल्लक बाबी होत्या त्या, एकवेळ त्यावर काणाडोळा करण्यास काहीच हरकत नव्हती, परंतु त्याने मोठ्या गोष्टींना प्रभावित केलेले होते. या  कथेत कोण चूक व कोण बरोबर हे ठरवणे सोपे नाही पण हे मात्र अंतिम सत्य आहे की, कोणी तरी एकाने हरहुन्नरी ऊमेदवार गमावला होता, कोणी तरी एकाने स्वप्नातील राजकुमारी गमावली होती, कोणी तरी एकीने सर्वगुणसंपन्न जावई गमावला होता तर कोणी तरी एकाने चांगली नोकरी गमावली होती. वरीलपैकी एकाने जरी तडजोड केलेली असती तरी कहाणीचा शेवट गोड झालेला असता कारण ते सर्वजण पुन्हा एकमेकांना जोडले गेलेले असते.

# झाड आणि माणूस - सबिना फोस

एकदा एक झाड माणसाला म्हणालं, "अरे माणसा, मी बघ कसा सुंदर आहे. माझ्यावर नेहेमी सुंदर फळं-फुलं लागलेली असतात. माझी पानं बघ कशी हिरवीगार आहेत. वारा आला की ती सळसळतात अन् डोलतात तेव्हा किती छान दिसतात. तो आवाजही किती मंजुळ वाटतो ऐकायला. आणि माझा आकार कसा रोज नवनवीन असतो. नाही तर तू! तुझा नेहेमीचा आपला तोच आकार. दोन पाय, दोन हात, दोन डोळे, दोन कान, एक नाक अन् एक तोंड. काही नवीन नाही; काही वेगळं नाही."

ह्यावर माणूस म्हणाला, "देवाने सारी सृष्टी निर्माण केली.तुलाही त्यानेच केले आहे. आणि माणसाला तर त्याने स्वत:सारखे घडविले आहे." झाड म्हणाले, मग? त्यात काय एवढं? ही फुलपाखरं अणि पक्षी बघ. माझ्या आजुबाजूला सतत घिरट्या घालत असतात. तुझ्याकडे ढुंकून तरी पाहतात का ते? उलट, तुला पाहिलं की दूरच पळतात." माणूस शांतपणे म्हणाला, "हो. हे सगळं खरच आहे. पण देवाने माणसाला हे जे अवयव दिले आहेत, ते माणसाला किती उपयोगी आहेत हे तुला माहित आहे का? त्यांच्यामुळेच माणूस हे सुंदर जग पाहू शकतो, हवे तिथे जाऊ शकतो, त्याला तुझ्या फुलांचा सुगंध घेता येतो, मधूर फळांची चव चाखता येते, तो पक्ष्यांची किलबिल ऐकू शकतो, आपल्याला जे हवे ते घेऊ शकतो. हे सगळं तू करू शकतोस का? नाहीच मुळी! तू तर नेहेमी एकाच जागी उभा असतोस. तुला कुठे जाता येत नाही. जीवनाचा खरा आनंद तू लुटूच शकत नाहीस."

झाड म्हणालं, "मग काय झालं? तुला माहीत आहे का, माझ्याकडे किती मोठी संजीवन शक्ती आहे ती? माझ्याकडे माझ्यासारखं दुसरं झाड तयार करण्याची शक्ती आहे. माझ्या प्रत्येक भागांत संजीवनी आहे. माझी कुठलीही फांदी काप आणि जमिनीत लाव. ती रुजेल; आणि त्यापासून नविन झाड तयार होईल. माणसा, तुझ्यात आहे का एवढी ताकद? तू करू शकतोस का ही किमया? तुझा पाय कापून जमीनीत लावला तर तो रुजेल का? त्याला धुमारे फुटतील का? येतील का त्याला अवयव? त्यापासून नवा माणूस तयार होईल का?" माणूस पुन्हा शांतपणे म्हणाला, "नाही, ते मला करता येणार नाही, आपल्यासारखा नवा माणूस जन्माला घालण्याची संजीवन शक्ती जरी देवाने मला दिली असली तरी तू म्हणतो तसा माझा पाय मला जमिनीत रुजवता येणार नाही; पण मी माझ्या पाऊलखुणा मातीत रुजवू शकतो. पृथ्वीच्या पाठीवर माणूस आपल्या अस्तित्वाच्या, आपल्या कर्तृत्वाच्या पाऊलखुणा उमटवू शकतो. त्या पाऊलखुणा नवा माणूसच काय पण नवा समाज घडविण्याची किमया करू शकतात. हेच देवाने माणसाला दिलेलं सर्वात मोठं संजीवनाचं वरदान आहे.

# ती - पेट्रेशिया गोन्सालवीस

"अगं नीट पकड बाळाला, मान सांभाळ त्यांची? बाळाला नीट सांभाळता येत नाही तुला, कसं वाढवणार देव जाणे? आईच्या या लाडीक दमाचा तिला राग आला नाही. पण ती मनातल्या मनात पुटपुटली, अग आई पहिल्यांदाच छोट्या बाळाला असं छातिशी घेतलं आहे मला ग कसं माहित असेल? सगळयांच्या वेगवेगळ्या सल्ल्यांचे-सुचनांचे पालन करीत ती आपल्या तान्ह्याला वाढवत होती. १ ला वाढदिवस - खुप पाहुणे पाहुन सोहेलने घर डोक्यावर घेतले होतं, खुप रडत होता. प्रत्येक जण तिलाच ओरडत असे, त्याला शांत कर, आई आहेस ना तु? ती त्याला शांत करीत होती परंतु बाळ काही केल्या रडायचे थांबत नव्हते अखेर त्याला छातीशी घेत त्याने बाळाला शांत गेले पण ..... "आई झाली आहे सांभाळणं कुठे जमते?--- सासुचा शालजोडीतला टोमणा ऐकावा लागलाच असे अनेक वाढदिवस झाले सोहेलची आबाळ नको म्हणुन चांगल्या नोकरीवर तिने पाणी सोडले. त्याचे संगोपन घरादारातल्या लहान थोरांचे मान-पान. रुसवे-फुगवे, आवडी निवडी सांभाळत जगत होती. कधी लाईट बिल भरायचे राहुन गेले तरी घरातल्यांचा ओरडा ऐकावा लागे, "घरीच तर असते, साध्या गोष्टी कशी विसरते? अकलेचा भाग कमी. ती सहज ह्या ओरड्याकडे कानाडोळा करायची. वाद न घालता निमुट ऐकायची. जणू या सगळ्याची तिला सवयच झाली होती. "माझ्या पांढऱ्या शर्टला रंग लागला, मम्मी तुला कळत नाही का? रंगीत कपडे वेगळे धुत जा नं., किती सपक ती भाजी," "अरे, मला बरे वाटत नव्हते पण तुला बाहेरचे जेवण जमत नाही, म्हणून कशीबशी शिजवली रे. पुन्हा असे होणार नाही." बरं नाही, तर डॉक्टरांकडे जायचे, दवाखान्यात जायचे पण मीच सांगायचे का? स्वतःची काळजी घ्यायला नको? पुन्हा एकदा तिच्या अकलेचे धिंडवडे निघाले.

"सोहेल यावर्षी दहावीला आहे. फोनवरचं बोलणं, बहिणींबरोबर शॉपींग हे जरा कमी कर. त्याच्या अभ्यासाकडे लक्ष दे. माझ्या बँकेतल्या नोकरीमुळे मला वरचेवर रजा घेणे शक्य नाही." उद्या शाळेत Open house ला जा. बघ काय दिवे लावले आहेत सोहेलने." पालक सभेला जाणे, फी भरणे, बिलं भरणे, बाजारहाट करणे, घरातील कामे, नातीगोती सांभाळणे ही सर्व खाती तिच्याकडेच होती.

"काय हो, सोहेलच्या अभ्यासाकडे लक्ष द्या. त्यांची प्रगती तितकीशी समाधानकारक नाही. जरा लक्ष घाला. तुम्ही तर जॉब नाही करत? घरीच असता नं., टिचरचं रागाचं परंतु हिनावह बोल हसत हसत स्विकारले. आपल्या परीने सोहेलला समजावले. त्याने मनावर घेतले. अभ्यासाचा वेग वाढवला. त्यांचे खाणे-पिणे ह्याकडे ती लक्ष देत होती त्यापेक्षा अधिक लक्ष देऊ लागली. दिवसा घरात वर्दळ, सासु-सासऱ्यांना त्यांच्या आवडत्या मालिका पाहायच्या असतात म्हणून T.V. सुरू. हे सगळे टाळण्यासाठी ती रात्री-रात्री सोहेल बरोबर जागू लागली. परीक्षेचे दिवस आले. मार्च year ending मुळे नवऱ्याला रजा मिळणे अशक्य. सोहेलला परीक्षा केंद्रावर सोडुन शाळेच्या गेट बाहेर कुठेतरी सावली शोधत पेपर संपेपर्यंत उभी असायची. दिवस सरले आणि जून महिन्यात सोहेलचा दहावीचा निकाल आला. ९० % गुण मिळवून तो उत्तीर्ण झाला होता. दिवसभर घरात आनंदाला भरते आले होते. नातेवाईक, मित्रपरीवार, सर्वांचे अभिनंदनाचे फोन येत होते. सर्वांचा एकच

सूर  सोहेलने कमाल केली. अगदी पप्पांसारखा हुशार आहे. पण आनंदाच्या डोहात ती तिचं "अस्तित्वच" विसरली होती. तिने घेतलेल्या श्रमाचं ना कोड, ना कौतुक. का.... तर ती Housewife होती. त्यात तिने ते काय केले? आपले घर, संसार ,मुलगा, नवरा, नातेवाईक या सगळयांच्या सुखापुढे तिला तिचं वेगळं असं जगच नव्हतं.

आज तिच्या इंजिनिअर झालेल्या सोहेलचे अँगेंजमेंटचा कार्यक्रम आहे. पाहुणे-रावळे नवीन व्याही मंडळी घरी येणार आहे. सगळीकडे घाई-गडबड सुरू आहे. तिच्या सासुबाई तिला सारख्या कसल्यानं कसल्या सूचना देत आहेत. "अहों" च्या सूचना चालू आहेत. व्याह्यांचे मानपान ,अंगठी सगळे नीट बघितले नां, वेंधळेपणा करू नको, एक ना अनेक.........

तीही छान सजली आहे. नजरेनेच सोहेलची नजर काढत आहे. पण आजही तिची कशानं कशा कारणावरून अक्कल निघत आहे. "तुला कळत नाही, अक्कल नाही "या वाक्यांची तिला खूप सवय झाली आहे. मुलगी, आई, पत्नी, सून या अशा अनेक वळणांवर यशस्वी होत सासु व भविष्यात आजीचे पद ती भूषविणार आहे. ती आता टेक्नोसॅव्ही झाली आहे. Online shopping करते. इलेक्टॉनीक्स गॅजेट्स् लिलया वापरते. घरातल्या कामाचे उत्तम नियोजन करते. परंतु तरीही ती अक्कल नसलेली वेंधळीच राहणार आहे. कारण ती "ती" आहे. प्रेमळ मुलगी, समंजस पत्नी, वात्सल्यमय आई, सालस सून अन् होऊ घातलेली "सासु" खूप हुशार असून खूपच वेडी. कारण तिची मायाच वेडी आहे. वात्सल्याची प्रेमळ मुर्ती, Unconditional Love करणार "ती."

---

## कविता - ती मावली - फ्रँक मिरांडा

खाटेवर बसून
हसत होती ती मावली,
तिच्या सदैव पाठीशी होती
तिचीच गडद सावली.

झिजलेले शरीर
सुकलेले गाल,
त्या मावलीचे
होत होते हाल.

शिकलेली मुलं
घरात तीन सुना,
पण कोणालाही नव्हती
थोडी करुणा.

घरात पाळीव प्राणी
त्यांनाही खोली,
ती मावली मात्र
जिन्याखाली अबोली.

घरातील जणावरं
कायम तुपाशी,
खाटेला खिळलेली ती
मावली मात्र उपाशी.

पाण्याच्या घोटासाठी
तिचा प्राण सुकायचा,
डोळ्यातुन वाहणारे पाणीच
मग तिची तहाण तृप्त करायचा.

# एक स्वप्न ! - सुनिल बावतीस डिमेलो

हे टेड! वेन आर यू प्लानिंग युवर नेक्स्ट वसई ट्रीप ?

फ्रेडीने टेडला विसरलेल्या या प्रश्नान टेडश्या उत्तराअगोदर जेसने प्रतिप्रश्न केलो,

'हाव डू यु गाईज् नो वसई?'

आज २५ मे २०७० जेसश्या नवीन ऑफिससो पयलो दी. जरी तो आन त्याये सहकारी आपापल्या घरने काम करते अहले तरी व्हर्चुअल ऑफिस प्रनालीमुळे ते एकास ठिकानी एक-मेकामेरे बेहोन काम करतोते. त्यात ऑ फ्रेडी वर्क मोडवरने हॉलिडे मोडवर कोहो गेलो त्यापेक्षा वसयसा नाव आयकोन तो स्वता वर्क मोडवरने होम मोडवर कोहो गेलो या त्याला प्रश्न पडलो पण त्या उत्तर शोद्याश्या आदी तो डायरेक होम मोडवरने पास्ट आन पास्टवरने पास्ट - इमोशनल मोडवर पोसलोतो. त्याव बोठो बाबा जॉ २-४ मयन्याअगोदरुस मेलतो त्याव चेहरो त्या डोळ्यापुडे आलो. त्या बोठया बाबाने त्या नेटिव प्लेस मंजे वसयला जा करता जेसशी जाम पाठ काडलोती पन त्या वेळेला जेस कामामीने ओडो गुतल्यालो होतो कि बोठ्ठ्या बाबाई ती इच्छा अपुरीस रेलती, आन जेसला या गोष्टीआ खूब वाइट वाट्यासा. अर्थात नव-नवीन उपकरने वापरोन त्याने बाबाला मंबय, दिल्ली हांगड्या शहरायी व्हर्चुअल सैर खूब वेळा करोन हाड्लोती.

त्या ठिकानी प्रत्यक्ष का घडता हाय, रस्त्योर सलनारा लोक,गाड्यो याइ मज्जा त्याव बोठो बाबा घेऊ शक्यासो पन यात वसयला मात्री जेस कय दावडू शक्यासो नाय. २०४९ ला जा भारत-पाकिस्तान युद्ध जालता त्यात चिनी पानबुड्यो वापरोन पाकिस्तानी सैन्य समुद्री मार्गान वसईतने भारतात घुसलोता आन त्यामुळे भारतीय लष्कराला काश्मीर सिमेबरोबरुस या वसय भागोर जाम लक्ष द्या लागलोता. या युद्धात भारताव जरी विजय जालो तरी प्रत्यक्ष युद्ध खप्यादो अपेक्षेपेक्षा जास्ती वेळ आन पैसो लागलो. तीगाळपासून राष्ट्रीय सुरक्षेदृष्टीन वसय एक अतिसंवेदनशील भाग जालतो आन तडे एक नाविक तळ उभारलो गेलतो, भगुनुस बाबाला या भागाई व्हर्चुअल सैर घडवोन आढना जेसला कय जमला नोता.

मंबय, दिल्ली बगोन बाबा पोट कय भरे नाय आन त्याला प्रत्यक्ष वसयलास जासा हाय इ जेसला कळ्यासा आन त्या दृष्टीन त्याने कय प्रयत्न केल नाय आहा नाय. पन चीनने पाकिस्तान आन नेपाळ काबीज केल्याला ओडे वहरे ओहोन सुध्दा भारताव अमेरीकेवरसो राग कय गेलो नोतो. चीनश्या या कृतीमुळे आमश्या अस्तित्वालास दोखो निर्मान जाले आन त्यामुळे युनोने यात अस्थक्षेप केलो पाय इ मागनी ते फेटाळली गेलतीस पन अमेरीकेने यावर तटस्थतेयि भूमिका घेतलोती आन त्यामुळेस चीनसा हादला आन कय वहरान त्याने मॉरिशस पन काबीज केला. भारत शारी बाजून वेढलो गेलो आन त्यामुळे सिमाभागोर सदैव युद्धजन्य परिस्थिती निर्मान जाली. भारताव सुरक्षेवरसो खर्च खूब वाडलो आन आर्थिक वाढ कमी जाली, याव राग ते सामान्य अमेरिकन नागरीकांना वीजा देताना किंवा अमेरिकेतने आयात हॉनाऱ्या ठरावीक मालोर जास्ती कर लावोन काडतोते.

जेससो जन्म अमेरिकेत जाल्यालो होतो त्यामुळे त्या वीजा रीजेक्ट होना तो समजू शक्यासो पन त्या बोठ्या बाबाव जन्म भारतात जाल्यालो अहोनसुद्धा त्याला भारतायी वीजा मिळयाशी नाय. वीजा प्रोसेस ओडी माग अहोनसुद्धा जेसने लागोपाठ ३ वहरे वीजा अर्ज केलतो पन तिन्नि वेळा त्यांना वीजा मिळाल नोतो. त्यानंतर बोठ्या बाबाइ तब्ब्यात पन मीने मीने नाह्या लागली आन भारतीय वीजा मिळवोन दाखडनेस इ मित्रा हरी मारलेली पैज पन तो बाहोन गेलो.आपुन कतेतरि वसयला प्रत्यक्ष बेठ द्याशीस इ मात्री त्या मनात होता.

आन फ्रेडीने टेडला विसरलेल्या त्या प्रश्नान जेसश्या मनात परत भारतीय वीजा आन पर्यायाने वसयसा बूथ खिरला. म्ये वीजा करता ओडो मर मर मेलो आन ए लोक 'नेक्स्ट ट्रीप' बद्दल बोलात्यात मंजे यांना वीजा मिळाते तरी कोहो? कोहो मिळे तो मिळूंदे पन यापाळी मे पन याहरी वसयला जानार मंजे जानारूस इ मात्री जेसने ठरविला आन तो माकून पास्ट - इमोशनल मोडवरने वर्क मोडवर आलो, जरी जी.एम. अहलो तरी का जाला आज त्या कामाव पयलो दी होतो. जेससो जन्म जरी अमेरिकेत जाल्यालो अहलो तरी तो शेवटी कुपारीस ना, एकदा एखादा काम कऱ्यासा मनोर गेथला गा त्याइ पाठ कय होडनार नाय.

ऑफिस टाईम खपता खोटी जेस घरातूस अह्लेल्या ऑफिसरूम मिन्ने बायार आलो आन ५-६ वहराअगोदर रीजेक्ट जालेले वीजा डॉक्युमेंटश्यो चिप्स काढल्यो आन व्यवस्थीत बगील्यो, उद्या टेड आन फ्रेडी हरी बोल्या बरा पडदे भगुन नेओन ते ऑफिसरूम मीने ठोयले. कॉफी मशीन मिनशी कॉफी घेओन जरा आराम कऱ्याकरता सोप्याला पाठ टेकीते गा नाय ओड्यात त्या मनात का

आला कुना गायी तो टमकान उठलो आन सेफ मीनशी एक चीप घेओन आलो. आन ती चीप सोपासमोर ठोयलेल्या एका टी. वी. गथिन दिखनाऱ्या मशीन मीने घायली आन ती चीप लोड ओह्याशी वाट बगीता बगीता बोठो बाबा मऱ्याश्या ५-६ दिहा अगोदरशी हांचापार आठवाली.

"जेस, मे तुला खात्री देते बाबाला कइस होयासा नाय फक्त ४-५ मिनटेस लागेद्यात या प्रोसेसला" जेससो शास्त्रज्ञ मित्र रसल त्याला विनवनिआ सुरात बोयलो.

"पन तोड्या वेळ तू बाबाला बेशुद्ध करणार, आन त्यात त्या कय बरा-वाइट जाला ते?" जेस बाबा काळजीन बोलातोतो "आन तू त्याला विजेऑ दख्खोपन देनार? नाय नाय इ कय जम्यासा नाय, म्ये तुला परवानगी देऊ शके नाय."

"कम ऑन जेस, तू स्वत एक शास्त्रज्ञ अहोनसुद्धा ओडो कदो घाबराता? आन विजेऑ दख्खो-बिख्खो कय नाय रे, मेंदुतशे सगळे चेतातंतू कार्यरत कऱ्याकरता फक्त कय मिलीसेकंदूस ऑ नियंत्रित वीजप्रवाह होडलो जायदे आन बाबाला कय समज्यासा पन नाय". रसल जेसश्या पाया पड्यासोस बाकी होतो.

"अरे रसल, माहनु कोडो पन बोठो डॉक्टर अहलो तरी स्वत माहनोर अप्रीशान करताना घाबरातेस न? तोहोस म्ये जरी शास्त्रज्ञ अहलो तरी मा स्वता बोठ्या बाबोर प्रयोग कऱ्यासो बोयल्योर घाबरॉ वाटनारुस ना?" जेसने कडेतरी वाशिलेल्या तत्वज्ञानाला आपला उदाहरन जोडोन हांगीला.

"जेसss जेसss जरा अडे येऊ" जेसश्या बोठ्या बाबाने खोलीतने आख मारली.

"अरे बाप रे. बाबा उठलो वाटाते" सोप्योरने उठता उठता जेस बोयलो आन खोलीत धाव टेकिली, त्या मांगो-मांग रसल पन धावलो.

"बाबो, तू उठलोआ? तुला साव्या जमेदे ते सपारशिंग देव गा कनेरी पेता, मस्त जाड जाड केले".

"माला एक पेलो कनेरीऑ दे, पन त्या अगोदर तुमसा बोलना क्याबद्दल सल्लोता ता माला हांगा."

बाबाने आपला बोलना आयकीले आहा दिखाते. जेसून रसलने विसार केलो. आते लपविण्यात कय अर्थ नाय इ जेसने ओळखीला करान तो त्या बाबाव स्वभाव जानोन होतो. "कय नाय बाबो, ओ रसल हांगाते की त्याने माहना मेंदुमिनसो सगळो डेटा कॉपी करनारी एक मशीन तयार केले" जेस आहात आहात बोयलो.

"का? आहा पान ओहू शकाते रसल?" बाबा आश्चर्यचकित ओहॊन बोयलो.

"हा बाबो, मेंदुमिनसो सगळो डेटा कॉपी करनारी एक मशीन म्ये तयार केले. सगळो डेटा मंजे तुमश्यो आठवनी, तुमश्या हरी गढलेल्यो गठना सगळा सगळा यातसा कय कय तुमाला आठवे पन नायदे पन ता तुमश्या मेंदूत साठवोन ठोयल्याला आहाते. इ सगळा आपुन मा मशीनश्या माध्यमातने कॉपी करू शकात्याव. आन याकरता माला तुमशी मदत पाय. या पेटंट मिळव्याकरता त्या समितीसमोर एक चाचणी अहवाल सादर कऱ्या लागते आन त्याई अही अट घायले की इ चाचणी फक्त मरणासन्न व्यक्तीवरूस केली जावी जेनेकरून या मशीनद्वारे जे रिझल्ट मिलद्यात त्याव त्यां व्यक्तीआ भविश्योर कय परिनाम होनार नाय." रसलने एका दमात सगळा हांगोन टाकीला.

"अच्छा, मंजे तुला माला गिनिपिग बनव्यासा हाय तर?" बाबा आहात बोयलो.

"हा! मंजे नाय … अ ब ब मंजे बाबो तुई परवानगी हायदे तरुस" रसल घाबरात-घाबरात बोयलो.

"अरे ओडो घाबराता कदो. मायी संमती हाय. जाता जाता कुना कुपाऱ्या बरा जाला ते माला खाशेत बरी निज तरी लागेदे. हा, पान तो विजेओ दख्खो जरा हळू दे हा" " बाबा परत एकदा आहात-आहात बोयलो.

क्रमशः

---

## चारोळया – ख्रिस्तोफर रिबेलो

खुषमस्करी करण्यात आयुष्य जातं
कधी परखड बोलही कानी पडायला हवे
जीवनाच्या वास्तवाचं दर्शन अनुभवताना
नागडे सत्यही पचवायला हवे

पाऊस आला, भिजवून गेला
ओलेत्या देहातील तुझ्या स्पर्शाचा दाह
दुथडी भरून वाहू लागला
साठवलेला आठवणींचा डोह

# नास्तिक आस्तिक आणि धार्मिक राजकारण - सचिन सिल्वेस्टर रॉड्रिग्ज

"मला ख्रिस्ती धर्म आवडतो परंतु ख्रिस्ती लोक नाही" इती मोहनदास करमचंद गांधी म्हणजेच आपले राष्टपिता महात्मा गांधी. मित्रांनो का बोलले असतील गांधीजी असे? कदाचीत त्या वेळेला भारतावर आपले अधिराज्य गाजवणाऱ्या गोऱ्या इंग्रज शासन कर्त्यांना उद्देशुन ते बोलले असतील का? गांधीजी ख्रिस्ती नव्हते तरी सुद्धा त्यांचे आचरण त्यांच्या अंतापर्यंत ख्रिस्ताच्या शिकवनुकी प्रमाणे होते. परंतु आपण आहोत का खरे ख्रिस्ती? आज हा प्रश्न स्व:ताला विचारायची वेळ आपणा प्रत्येकावर आली आहे. आजकाल आपण सुद्धा धार्मिक कट्टरता अंगीकारत येशु ख्रिस्ताने दिलेल्या शिकवणुकीचा चुकीचा अर्थ काढत आहोत तर काही मंडळी नास्तिकता अंगीकारुन ते किती टक्के ख्रिस्ती आहेत ह्यांचे खुलेआम प्रदर्शन करीत आहेत मुळात माणसाने एखादी गोष्ट अंगीकारली तर मग ती १००% आत्मसात करायला हवी एखादी गोष्ट अर्धवट अंगीकारणारा माणुस परीपुर्ण होऊच शकत नाही मग त्याचं शिक्षण काहीही असो! खरंतर माणसाने कोणत्या तरी धर्माला चिपकुन राहायला हवे कारण कोणत्याही धर्माची शिकवन मुळात वाईट नाही आणि मागील बरीच वर्षे धर्मापायीच ह्या जगाचा समतोल राखला गेला आहे. नाहीतर ह्या संपुर्ण पृथ्वीतलावर अराजक माजले असते. मुळात धर्म ही संकल्पनाच माणसाला विधायक कार्याला प्रर्वुत्त करते! परंतु धार्मिक कट्टरता आणि भोंदुगीरीच्या माध्यमातुन धर्मग्रंथाच्या शिकवनुकीचा वाईट अर्थ काढणारे काही अपवाद सुद्धा ह्या भुतलावर आहेतच आणि थोड्याफार प्रमाणात अराजक माजविण्याचे कार्य ही लोकं करीत आहे, ह्याला कारणीभुत आहे जागतिक राजकारण जे आजकाल फक्त धर्माच्या नावाने संपुर्ण जगात चालु आहे जेथे आपला धर्मनिरपेक्ष भारत सुद्धा मागे नाही आणि असे नसते तर मग एकाच धरती वर जन्मलेल्या माणसाने दुसऱ्या माणसात तरी भेदभाव का केला असता ?

मुळात धर्मग्रंथ हा ज्या त्या धर्माचा पाया असतो आणि आपला धर्मग्रंथ असलेल्या बायबल विषयी बोलायचं तर त्यांची शिकवण एवढी चांगली आहे की हिंदु असणाऱ्या मोहनदास करमचंद गांधीनी ती अवलंबविली आणि खऱ्या खुऱ्या ख्रिस्ती असणाऱ्या इंग्रज राजकर्त्या विरोधात आजमावली व आपल्या ह्या देशाला त्यांच्या गुलामगीरीतुन सोडवुन स्वांतत्र्य मिळवुन दिले आणि देशाचे ते राष्ट्रपिता बनले! तर मग आपण सर्व ख्रिस्ताचे खरे अनुयायी ख्रिस्ताच्या शिकवनुकी प्रमाणे वागुन १००% माणुस बनायचा प्रयत्न का करु नये परंतु आजकाल काही उच्च शिक्षित लोक धर्मगुरू कोणत्या वास्तुला आशिर्वाद देतात किंवा त्यांनी नक्की काय करायला हवे ह्या गोष्टीचा बाऊ करुन आपण किती उच्च शिक्षीत आहोत हे समाजाला दाखवुन देण्याचा व त्यांपासुन वायफळ प्रसिद्धी मिळवायचा प्रयत्न करतात! आजकाल अशी बांडगुळे आपल्या ह्या समाजात सुद्धा वाढत आहेत. त्यांना सुद्धा वेळीच आवरले पाहीजे! सोबत आजकाल काही ईतर कट्टर पंथीय ख्रिस्ती बांधव सुद्धा त्यांच्या मुळ पंथावर (ख्रिस्ती चर्चवर) टीका करतात त्यांना मला विचारायचे आहे की तुम्ही जर ख्रिस्ताचे खरे अणुयाई असाल आणि आमच्या पेक्षा जास्त धार्मीक असाल तर मग प्रभुच्या सद्सद् विवेक बुद्धीचे दान आपणास नक्कीच लाभले असेल तर मग असे वायफळ बडबड का करता ?

ह्या व्यतरीक्त आपल्या धर्मातील धार्मिक कट्टरते विषयी बोलायचं तर आपलाच धर्म ह्या सुष्टीचा निर्माता आहे व जगात एकमेव श्रेष्ठ धर्म आहे असा काहीसा समज करुन सर्वधर्म समभाव ही संकल्पना काही कट्टर लोकांनी मागे टाकुन सर्वधर्म स्नेहभाव ह्या नविन संकल्पनेची निर्मीती केली आहे. आणि जर अशी संकल्पना आपण मांडत असु तर मग आपल्यात आणि युपी चे कट्टर हिंदु मुख्यमंत्री योगी आतित्यनाथ ह्यांच्यात काय फरक जे म्हणतात "धर्मनिपेक्षता हा धादांत खोटेपणा आहे" मग आपण सुद्धा कसले खरे ख्रिस्ती अनुयायी? आणि मग त्यांच्यावर टीका करायचा अधिकार आपणासही बिलकुल नाही! चमत्कारा विषयी बोलायचं तर ह्या २१ व्या शतकात आपले परमाचार्य जेथे वैज्ञानिक द्रुष्टीकोण मान्य करीत असतील तेथे आपण सुद्धा काही भुलथापाना बळी पडतो ही सुद्धा लाजिरवानी गोष्ट आहे आणि अशा क्रुतीतुन आपण आपल्याचं धर्माची नाच्चकी करीत आहोत. अगदी काल परवा मुंबईत एका ख्रिस्ती पंथीय चर्चमध्ये एका मृत व्यक्तीला जिवंत करायचा प्रयत्न झाला अगदी लाजिरवानी गोष्ट आहे ही! असे चमत्कारा करने फक्त साक्षात परमेश्वला शक्य आहे अशी आपली ख्रिस्ती धार्मीक श्रद्धा आपल्याला सांगते!आणि मुख्य गोष्ट म्हणजे साक्षात प्रभु येशु ख्रिस्ताने सुद्धा असले चमत्कार खुलेआम केले नाहीत किंवा त्यांना प्रसिद्धी सुद्धा मिळवुन दिली नाही परंतु आपण मानव ही असली भोंदुगीरी करुन नक्की काय मिळवायचा प्रयत्न करीत आहोत? संत मदर तेरेजाना प्रत्येक भारतीयांनी आपल्या मनातुन संत मानले होते आणि त्यांनी केलेले कार्य एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नव्हते परंतु आपल्या धर्मातील चमत्काराच्या निकषावर दिले गेलेल्या संतपदामुळे मदर तेरेजावर सुद्धा टीका केली गेली! फक्त चमत्काराच्या निकषावर संतपद देणे हे सुद्धा कोठेतरी बंद व्हायला हवे! २१ व्या शतकात अशी चमत्काराला माननारी अती धार्मिकता ही सुद्धा एक प्रकारची अंधश्रद्धाच नव्हे काय? ह्या सर्वाच्या विपरीत आपल्या वसईतील चर्चेस आणि त्यांचा स्वच्छ कारभार ही सुद्धा एक मिसाल आहे आणि त्यांसाठीच एवढा मोठा जनसमुदाय ह्या चर्चशी जुळून आहे ही आंनदाची गोष्ट आहे. तरी सुद्धा काही हाताच्या बोंटावप मोजण्या इतके लोक चर्चवर नाहक टीका करत असतात त्यामुळे ते फक्त २ ×६ एवढ्या जागेसाठी धर्मात आहेत असेच वाटते! परंतु फक्त एवढ्या कारणासाठी त्यांना आत्ता धर्मात राहायची गरज नाही

माननीय हायकोर्टाने सरकारला स्पष्ट निर्देष दिले आहेत की ज्या मृत्यूला तुम्ही रोखुन धरु शकत नाहीत त्या मृत्यूत तरी भेदभाव नको म्हणजे सर्वाची विल्हेवाट लावयची सोय नक्कीच होणार म्हणुन नास्तिक माणसाने फक्त २x६ एवढ्या जागेसाठी फक्त २०किंवा ३० % धर्मात राहणे योग्य नव्हे! जर धर्मात राहायचे असेल तर सपुर्ण ख्रिस्ती म्हणुन रहा त्यासाठी आपले आचरण आपल्या धर्मग्रंथा प्रमाणे असणे ह्यांपेक्षा वेगळे काही करायची नक्कीच गरज नाही!

नास्तिकते पेक्षा प्रेमाचा संदेश देणारा धर्म अंगीकारुन आस्तिक होणे कधिही चांगले , सोबत इतकेही धर्माच्या आहारी जाऊ नका की कोणी भोंदु वा राजकारणी त्यांचा फायदा उचलेल!

# ऊधळपट्टी - सुनील सायमन डिमेलो

पप्पा ,आपण सॅम अंकलच्या लग्नाला चाललोय का ?" छोटा शेरलॉक त्याच्या पप्पांना विचारू लागला. मुलाच्या प्रश्नाने रॉकी हडबडले...जरा पॉझ घेत बोलले,"अरे बेटा सॅम अंकलचं लग्न नाही तर engagement आहे."  "OK..मग पप्पा लग्नाला करतात तसं त्यांनी invitation केलं.. स्टेज बांधलय रात्री बुफे आहे अन् आपले फादर थॉमसपण येणार म्हणे ring ceremony ."

हुश्श्.."अरे शेरूबेटा किती प्रश्न ?? तू काय."वागळे" किंवा "सरदेसाई" आहेस का ??"..

रॉकी डिसोजा थोडेसे वैतागले.. पप्पांचा I.C. गरम झालेला पाहून शेरलॉकने मोर्चा  रीनाकडे आपल्या मम्मीकडे वळवला..आपला मुलगा आता आपली interview घेणार हे पाहूनच रीनाने त्याला जवळ घेऊन. म्हटले ",अरे शेरू आपल्याकडे ही "पध्दत" आलीय. Copy paste हे फक्त कंप्युटरमध्येच नाही आपल्या कुपारी संस्कृतीतदेखील आलयं"

शेरलॉक ७ वीत होता.आजूबाजूला कायं घडतयं हे तो observe करत होताच. २ महीन्यापूर्वी त्याचा वर्गमित्र  क्लीटसच्या अंकलचा ring ceremony होऊन लग्न ठरलं होतं पण काही "virus" मुळे त्यांच engagement breajy झालं हे आठवून त्याने मम्मीला कोंडीत पकडून विचारलचं..'ममा क्लीटसच्या अंकलचं पण ring ceremony होऊन...." त्याला मध्येच तोडत रॉकीला ऐकू जाईल अश्या बेताने रीना ने मशीनगन सुरू केली. "आपण कुपारी सण ऊत्सवाचे हौशी. १०० रू कमावू अन् ९० रूपये खर्च करू. पण लग्न बारसे कोमसार सोयरीक मग वाढदिवस लग्नवर्धापन (लग्नाचा वाढदिवस हा शब्द बहुतेक मंगळ ग्रहावरून आलेला दिसतोय!!) असे "महाग" कार्यक्रम आहेतच.."

खरचं गरज आहे का ईतक्या वारेमाप ऊधळपट्टीची ?? मुलाचे मुलीचे लग्न पाहू की नाही माहीत नाही म्हणून कोमसार "जोरात" करतो..इतकं जोरात की मग मुलाच्या शाळेतून फी न भरल्याचे "reminder" येतं !!! सुनियोजीत आटोपशीर व मद्य न ठेवता कार्यक्रम  यशस्वी होत नाहीत ?? ज्याचं लग्न होणारच आहे तेव्हा celebration करणार आहेतच मग वेगळ्या engagement program करायलाच हवा ?? अये ring ceremony केलेल्या सोयरीक मोडतात (की मोडल्या जातात?) तेव्हा ???

आज जीवनावश्यक वस्तंची खरेदी ,मुलांचे शिक्षण ,आजारपण ,दानधर्म, वार्षिक कौटुंबिक सहली,भविष्यासाठी तरतूद अश्या आवश्यक गरजासांठी पैसा जरूरी असताना penny wise pound foolish व्हायचं का ते आपणच ठरवा . सर्व सुशिक्षित व सुसंस्कृत आहातच.

# यात मा का सुकला - सचिन रॉड्रीग्ज अठवरे डॉट कॉम

हांच्यापारा ऑफिसण्या निघालॉ, लिगरी ऊहुर जालतॉ भुगून  रॉजशी नेहमीशी ट्रेन सुकली आन मिंगे अंधेरीला नंतरशी शरशीगेट वरन्या येणारी ट्रेन काहीबाही पकडली... ट्रेनमीन्या सडल्योर पृथ्वी गोल हाय ता माला व्यवस्तीत समजला ; कारन जहॉं जडण्या माला धक्कॉ लागतॉतॉ तहॉ म्या गोल गोल फिरातॉतॉ... म्ये अजून नाळाहॉपारा पॉसॉन फोन केलॉ नाय भुगून माआ वरमायसॉ (एकदा लग्नाला पास वहरे जालॅ गा.. नवरी या शब्दा जागी वरमाय यो शब्द बरॉ वाटात्या)

माला फोन आलॉ, पान माला कै फोन टुकीता आलॉ  नाय; मिंगे जेमतेम गाडी वसय पोसल्योर म्ये  फोन बगीलॉ आन फोन केलॉ... तर मायी वरमाय माआ हरी गुलुगुलु बॉलात्या... तीव तॉ आवाज आयकॉन जनु कय म्ये शरशीगेटवरने कॉर्नर शीटला बेहॉन आल्या हारकॉ आनंद माला जालॉ आन मिंगे हिम्मत करोन म्ये जीव्यादो का केल्या यो प्रश्न विसारलॉ. त्या माला तीन्या  'आज जीव्यादो डाळ केले' अहा हान्गीला. मंग म्या माव लग्ना नंतरसॉ ओड्या वहरा अनुभव वापरॉन तिला आस्तेस प्रश्न विसारलॉ कि, "हॉपारश्या टेशन  वरन्या कै हाड्यासा हाय गा ?"

तीन्या तीआव लग्ना नंतरसॉ ओड्या वहराव अनुभव वापरॉन माला आस्तेस उत्तर दिला कि, "पोरीला आज लॉलीपॉप खा वाटात्या." आन पोरीआ  नाव हान्गीला भुगून म्या पण पोरी करतीन एक बस सुकवॉन लॉलीपॉप घेवॉन घारा गेलॉ. घारा पोसलो, त्या दरवाज्यातूस पोरी उबी होती. तिआ हाता लॉलीपॉप दिलॅ आन म्ये आंग धोव्या गेलॉ.. आंग धॉवॉन  बाहेर येत्या तव मायी  वरमाय लॉलीपॉपशा ऑडें  बॉठ्या  डोळ्या करॉन माओर रागाय बगीतोती... म्या घाबरात घाबरात ऑड्या वहराव  अनुभव लक्षात घेवॉन तिला हळूस प्रश्न विसारलॉ ,"का जाला?" तर ती हांगात्या कि, "लॉलीपॉप कडे हात ?" म्या हान्गीला पोरीला दिल्यात आन ती का पोरी तोंडात लॉलीपॉप घवॉन सुम्बॉन सुम्बॉन खा लागलॅ,"

ता बोलता खोटी ती माला रागाय बोयली ," अरे, म्या लॉलीपॉप शाकलेट नाय हंगिलते ना तर डाळ केले.. भुगून जीव्यादो शीकन लॉलीपॉप हंगिलते" अरे माज्या देवा, अहा लफडा जालॅ गा, अरे पण तू हान्गीला पोरीला लॉलीपॉप खा वाटात्या म्हणून म्या ये लॉलीपॉप शाकलेटे हाडलें. आत्या तू जर हंगिलोस्ता कि, तूआ हाऊश्या पोरीला लॉलीपॉप खा वाटात्या तर म्या शीकन लॉलीपॉप हाडलोस्ते"
म्या ऑडा बोयलो पण बिचारी माई वरमाय माला कयूस बोयली नाय, नंतर माआ  मालास जाम वाईट वाटला पण तूमाला का हांगो, म्या ता बोल्या नॉतॉ त्या बरा हव्योता, कारण आज शारदी जलॅ म्या रोज जकामोर डब्योर डाळ नेत्या.

लोक हंगत्यात "काळ सोकावत चालला आहे .." पान  माआ आयुष्यात डाळ फॉफावत साललॅ...
का बॉल्यासा ?... आत्या तुम्हेस , " हांगा यात माआ  का सुकला ? "

# मुस्लिम कुटुंबानुभव..! - फ्रँक मिरांडा

हाऊसबोटमध्ये जाण्याचे मी मुद्दाम टाळले आणि झेलम नदीच्या काठावर स्तब्ध उभा राहिलो. घड्याळाचे काटे ११ वर पोहचले होते. सर्वत्र गडद कळोख. श्रीनगर शहर गाढ झोपेत होते. सर्वत्र दाट धुके. नदीकाठी असलेल्या  खांबावरील  दिवे नदीच्या पाण्यात दिमाखात परावर्तित होत होते. थकलेल्या अवस्थेत मी गवतावर अंग टाकले आणि त्यावर झालेल्या दववर्षावाने माझ्या सर्वांगावर शहारे आले.

"फ्रैंन्की, कैसे हो?" सिराजभाईनीं (बोटमालक) जवळ येत मला विचारले.

"फर्स्ट क्लास सिराजभाई और आप?" माझा प्रतिप्रश्न.

"एकदम फिट. तो फिलाल क्या हाल है बंबईका?" सिराजभाईंनी प्रतिप्रश्न केला.

"खास कुछ नहीं," मी उत्तरलो आणि तोंडातून निघणाऱ्या वाफेवर कुतुहलाने पाहू लागलो. "थोडी मुसीबत में हु! मदद करोगे?" सिराजभाईनी विचारले.

"बोलो तो सही,  क्या कर सकते है हम आपके लिए?" मी तयारी दर्शविली.

अडचण अशी होती की त्यांच्या बोटीमध्ये दिल्लीहून आलेले पर्यटक होते आणि ते दुसऱ्या दिवशी पहाटे जाणार होते. आमच्यासाठी  हाऊसबोटमधे रूम खाली नव्हती. त्याच्याकडे उपलब्ध पर्याय असा होता की आम्हाला सिराजभाईंच्या घरी त्या रात्री मुक्काम करायचा होता. परिस्थिती समजून घेत आम्ही होकार दिला.

कुत्र्यांचे भुंकणे कानावर पडताच मला  जाग आली. मोबाईलवर वेळ पाहिली. सकाळचे सात वाजले होते. थंडीमुळे पूर्ण घरंच जसे गारठले होते. अंगाला गारवा बोचत होता. बाजूला पडलेली सर्व चादर अंगावर ओढून मी डोळे पुन्हा मिटले. खोलीत पंखाही नसल्याने त्या भयाण शांततेत पापण्या एकमेकांवर विलीन होणे अशक्य होते. मी उठलो अंगात स्वेटर चढवला आणि घराचे अवलोकन करण्यासाठी खोलीबाहेर आलो. घराला ५ खोल्या होत्या आणि एक प्रार्थना खोली. त्यात कुराण आणि सर्व पवित्र पुस्तके होती. त्यातील एक प्रत हातात घेऊन मी त्यावर नजर फिरवली परंतु उर्दू भाषेचे मला जराही आकलन झाले नाही. त्यानंतर मी ओटीवर आलो आणि घराभोवती १० फुटी उंच सिमेंटचे कुंपण पाहून विचारात पडलो. घरापुढे केलेली बाग न्याहाळताना अचानक मागून आवाज आला.."भाईजान आप नहा लिजीए " मी मागे वळलो. एक तरूण मुलगी उभी होती ती.

कदाचित सिराजभाईची मुलगी असावी. मी फक्त तिला मान हलवली.

"हमारा घर बंबईवालो से अच्छा तो नही रहेगा?" तिने प्रश्न केला. "बंबई से बेहेतर है!" मी उत्तरलो. "अकेले बाहर मत जाया करो!" मला घरात येण्याचा इशारा करून ती म्हणाली. काही विशेष कारण असावे ह्या भीतीने मी घरात गेलो. "आपके यहाँ कंम्पाउंड इतने ऊँचे क्यू है?" मनात केव्हापासून  खळबळ माजवणारा प्रश्न

तिला मी विचारला. परंतु सिराजभाईंच्या अर्धांगिनींच्या एंट्रीमुळे तो विषय थांबला."बाथरूम वहा है!" डाव्या हातावर बोट करून तिने विषयांतर केले आणि ती जाऊ लागली. तिची अम्मा आमच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागली.

"ठंडे पाणी से नहाना है क्या?" काकुळतीला येत मी विचारले.

"भाईजान  ठंडे पानीसे आपका 'आइस' हो जाएगा. मै आपको गर्म पाणी देती हु!"  ती म्हणाली आणि हसत हसत निघून गेली. मी खोलीत आलो, माझे सहकारी अजुनही गाढ झोपेत होते हे त्यांच्या घोरण्याच्या आवाजाने मला स्पष्ट जाणवले.

मी त्यांना हलवून जागे केले आणि काही वेळेत आम्हा सर्वांच्या अंघोळी आटोपल्या. मग लगबग सुरु झाली ती हाऊसबोटवर जाण्याची.

"बैठो सब," आम्ही निघणार तोच सिराजभाईची पत्नी चहाचे कप आणि चपातीची प्लेट खाली ठेवत म्हणाली.

आम्ही आदेशपालन करत लगेच खाली बसलो. कपातील चहा बघून हा मी संपवू शकतो का ह्यावर मला शंका वाटू लागली. " कश्मीरी रोटी है, जरुर पसंद आएगी." सिराजभाईच्या पत्नी म्हणाल्या.

एक चपाती संपते तोवर त्यांनी अजुन ५-६ चपात्या पुढ्यात ठेवल्या. "हम ज्यादा नही खाते." मी निमित्त शोधले.

"बंबईवाले खाली भागते ही रहते है क्या? त्यांनी विचारले. मी फक्त डोळे मिचकावले.

"शरमाओ मत, खाते जाओ!" त्यांनी आग्रह धरला. परंतु आम्ही मात्र डाव अर्ध्यात जाहीर केला आणि चहा पिण्यास सुरवात केली.

त्या कडक थंडीत तो गरम वाफाळलेला नमकीन चहा फार हवा-हवासा वाटत होता.

"पापा कहा है?" चहाचा शेवटचा  मोठा घोट घेत मी विचारले. "अभी आएंगे." मुलगी उत्तरली. चहा-नाश्ता संपवून आम्ही सर्व बाहेर बसलो. आमच्या सर्वांचे हात थंडीने कापू लागले. काही मिनिटांतच सिराजभाई आम्हाला घेण्यासाठी तेथे हजर झाले. "रात कैसी रही, नींद आई ?" घराचा गेट उघडत भाईनी विचारले.

"बिलकुल अच्छी," मी उत्तरलो. त्यानंतर सिराजभाई काही वेळ पत्नी आणि मुलीसोबत कश्मीरी भाषेत काहीतरी बोलत आणि हसत राहिले.

"फुरसत मिले तो जरुर वापस आना," त्या म्हणाल्या. "पक्का,"  मी सांगितले आणि शेवटी आम्ही सिराजभाईच्या कुटुंबीयांचे आभार मानून त्यांचा निरोप घेतला.

एका मुस्लिम कुटुंबासोबत आणि तेही काश्मीरमध्ये राहण्याचा अनुभव फारच रोमांचक होता. त्यांनी केलेले आदरातिथ्यही फारच निराळे होते.एक प्रेमळ कुटुंब म्हणून सिराजभाईची फॅमिली कायम स्मरणात राहिल.

# इलेक्शन ड्यूटी - मिल्टन रिबेलो

मी भायंदर येथे शाळेत शिक्षक म्हणुन काम करत होतो. फेब्रुवारी २०१४ मध्ये एक दिवस नोटीस आली, आम्हा काही टीचर ना इलेक्शन ड्यूटी लागली होती. मला नको होती ती पण पहिल्यांदा आली होती तर बघू एकदा करुन म्हणून तयार झालो. लोकसभा २०१४ खासदारकीचे इलेक्शन त्याअगोदर ट्रेनिंगसाठी ठाणे येथे जाणे होते. दोनदा ट्रेनिंगला गेलो आणि शेवटची ट्रेनिंग रविवारी होती आणि त्या दिवशी ईस्टर सण होता, मी विचार केला आणि गेलो नाही. सकाळपासून फ़ोन येणे चालू झाले. माझी तब्बेत बरी नाही असे कारण देऊन फ़ोन ठेवला. दोन दिवसांनी मीरा भायंदरच्या निवडणूक कार्यालयात गेलो व माझे ओळखपत्र व ड्यूटीचा पत्ता घेतला नि घरी आलो.

इलेक्शनच्या एक दिवस अगोदर आम्हाला ठाणे येथे एका मोठ्या हॉलवर सकाळी बोलावले होते. तिकडे नाश्ता झाला आणि कोणाला कोणती ड्यूटी दिली आहे ते सांगण्यास सुरुवात झाली. मला मतदान केंद्राध्यक्ष आणि माझ्या हाताखाली चार जण, त्यांना PO1, PO2, PO3 आणि एक शिपाई. आम्हाला इलेक्शनचे मशीन व पेपर दिले ज्यावर मतदार लिस्ट आणि इलेक्शन संबधित पेपर होते. हे होईपर्यत दुपारचे तीन वाजले. माझी ड्यूटी लोकमान्य नगर ४ येथे लागली होती. मला हे नगर कुठे आहे हे माहित नव्हते. आम्हाला बसमध्ये बसायला सांगितले गेले. माझ्याबरोबर चार पोलीस देखील दिले गेले होते. आणि बस निघाली मतदान केंद्राकड़े, आम्ही लोकमान्य नगर ४ मध्ये पोहचलो. तेथे बघतो तर काय मी जणू नालासोपारा ईस्टला आलो आहे. चारी बाजूला झोपड्या, बस पुढे जात नव्हती पुढचा प्रवास चालत करायचा होता. आम्ही ५ जण व चार पोलीस चालत निघालो. दोन पोलिस पुढे आणि दोन पोलिस मागे आणि मध्ये आम्ही चालत होतो.

आम्ही मतदारकेंद्रात पोहचलो, केंद्र बघुन मी चकित झालो. ती एक शाळा होती, चाळी सारखी होती. खाली भाड़ोत्री राहत आणि वरती शाळा, ज्याला खिड़क्या नव्हत्या, दरवाजे तुटलेले तसेच पंखा जो फिरताना किती वेळा फिरला ते पटकन मोज़ू शकतो असा. आम्ही साफसफाई करुन सामान ठेवले व शाळेची पाहणी करण्यास निघालो कारण रात्री तिकडेच राहायचे होते. कोणी कुठे ही जाओ, वस्तीला राहायची वेळ आली की जो तो टॉयलेट बाथरूमची व्यवस्था पाहतो. मी ही तेच केले, त्यालाही पुर आला होता समजून जावे काय ते... संध्याकाळचे सहा वाजले होते. मी शिपायाला घेऊन शाळेपासून शंभर मीटरवर चुन्याने लाइन मारून परत केंद्रात आलो. आता चिंता रात्रीच्या जेवणाची, मी आमच्या झोनल ऑफिसरला कॉल करून आमच्या जेवणाबदल बोलुन घेतले व आमचे मतदान दिवसाचे पेपरवर्क पूर्ण करुन ठेवले. रात्र होत आली तशी मी माझ्यासोबत असणाऱ्या महिलांना दुसऱ्या दिवशी लवकर येण्यास सांगून घरी जाण्यास सांगितले. त्यानंतर माझ्यासोबत असणारे पोलीस यांची विचारणा केली. त्यांनी सांगितले की इलेक्शन असले की महीनोमहीने आम्हाला घरची वाट सापडत नाही. त्यांची कथा ऐकून मी स्तब्ध झालो. इतक्यात झोनल ऑफिसर आले त्यांना, आम्ही आणि आमच्या सोबत असणाऱ्या पोलीसांच्या रात्रीच्या जेवणाचे काय याची विचारणा केली. पाठवतो सांगून ते निघून गेले. त्यानंतर आम्ही मतदान मशीन व्यवस्थित ठेवून त्यासोबत मिळालेले पोस्टर्स पूर्ण शाळेच्या भिंतीवर लावले. रात्रीचे नऊ वाजले होते, तेवढ्यात एक माणूस आमचे जेवण घेऊन आला. आम्ही एकत्र जेवलो व हात धुण्यासाठी झोपटपट्टीत गेलो, तेथून येताना असे लक्षात आले की सर्व धर्माचे लोक एकत्र राहत आहेत. आम्ही

केंद्रावर परत आलो. आणि झोपु लागलो . वर पंखा फिरत होता आणि मी मोजत होतो, खिड़कीच्या काचा फुटलेल्या पण हवा काही फिरकत नव्हती. पूर्ण दिवसाच्या कामामुळे झोप कधी लागली समजलेसुद्धा नाही.

सकाळचे पाच वाजले, सर्व पोलीस उठले होते. मी त्यांना विचारले की सकाळच्या विधि कुठे उरकायच्या ?, ते मला झोपटपट्टीत दूरवर घेऊन गेले, माझे सर्व विधी उरकुन केंद्रात आलो, सर्व तयारी करून उमेदवाराने नेमुन दिलेल्या त्यांच्या प्रतिनिधींना मतदानाची मशीन चालू आहे हे दाखविले व त्या मशीला सील लावून मी सर्वांना काम परत एकदा सांगून दिले. सकाळचे सात वाजले आणि आम्ही मतदानाला सुरुवात केली. सुट्टीचा दिवस असल्याने मतदार सकाळीच गर्दी करू लागले होते. पोलीस सहायक शांततेत काम पाहत होते. वेळ कशी जात होती हे समजतही नव्हते. इलेक्शनला उभे राहिलेल्या प्रत्येक उमेदवाराकडून मतदानाला हातभार लावणाऱ्या सर्वांसाठी सकाळचा नाश्ता येत होता. आम्ही नाश्ता करूनसुद्धा माझ्या बाजूला पाच ते सात पाकिट झाली होती. पाण्याच्या बाटल्याही येणे काही थांबले नाही. मतदान केंद्र चाळीसारखे असल्याने वरती येण्यासाठी एकच मार्ग होता त्यामुळे गर्दी झाली होती, त्यात दुपारचे २ कधी वाजले कळले नाही. मी माझ्या जागेवरून उठून बाहेर पोलीसांची कामगिरी बघत होतो. दुपारची वेळ असल्याने गर्दी कमी होती. आम्हाला जेवणासाठी प्रत्येक उमेदवारा कडूनन एक-एक बिर्यानीचे पॅकेट येत होते. जेवल्यानंतर वेळ कशी गेली हे समजले नाही. मतदानाची वेळ संपत आली तशी उमेदवारांचे कार्यकर्ते पूर्ण झोपट्टीत फिरून मतदार आणत होते. आम्हीसुद्धा पूर्ण तपासणीशिवाय मध्ये घेत नव्हतो. शेवटी मतदान बंद करण्याची वेळ झाली.

आम्ही सर्व मशीन सील लावून पेपरवर्क पूर्ण केले आणि झोनल ऑफिसरला फोन लावून आम्हाला येथून नेण्यास सांगितले त्यानी सांगितले, आम्ही बस पाठवत आहोत, ती बस दोन ते तीन मतदानकेंन्द्रांवर वर जाऊन तुमच्या कड़े येईल तुम्ही बसून रहा. मी माझा मित्र जो दुसऱ्या केंद्राचा केंद्राध्यक्ष होता त्याला फोन लावला आणि विचारणा केली असता त्यानेही तेच सांगितले. वाट पाहता पाहता रात्रीचे ९ वाजले होते. एका पोलीसाने येऊन सांगितले की बस आली आहे पण येथे येऊ शकणार नाही तुम्ही तिकडे चालत या. मी वोटिंग मशीन माझ्या जवळ ठेवली आणि बाकी सामान PO3 कड़े दिले आणि पुन्हा एकदा दोन पोलीस पुढे आणि दोन पोलीस मागे असे आम्ही बसकड़े निघालो. मी आमच्या बरोबर असणाऱ्या महिलांना तेथून घरी जाण्यास सांगितले आणि आम्ही बसमध्ये बसून ठाणे येथील त्या हॉलकड़े निघालो. २० मिनिटाच्या प्रवासानंतर आम्ही हॉलवर पोहचलो.

हॉलवरचे चित्र काही वेगळे होते. सर्वांना लाइनमध्ये आपल्या केंद्र नंबरसहित यायचे होते. माझा नंबर १२५ होता, मी विचार केला रात्रीचे १२ इकडेच होणार. आम्ही सर्व महत्वाचे पेपर्स एका बाजूला ठेवले. त्यावर वेळोवेळी झालेल्या मतदानाचा तपशील होता. वोटिंग मशीन मी स्वतः घेऊन बसलो होतो. रात्री ११.३० वाजता माझा नंबर आला. मी वोटिंग मशीन दिली आणि सही केली. नंतर पेपर्स दिले. ते पेपर्स त्यानी अशाप्रकारे ठेवले की जणू आम्ही कचरा घेऊन आलो होतो. त्या पेपर्समधून फक्त एक पेपर त्यानी त्यांच्याकड़े ठेवला बाकी सर्व कचरा ठेवतात तिकडे टाकला. रात्रीचे ११.४५ वाजले होते मला घरी जायची घाई झाली होती. मी माझ्या दोन मित्रांना फोन केला आणि कुठे आहेत याची विचारणा केली असता एक सांगतो मी हॉल बाहेर आहे आणि एक ठाणे रेल्वे स्टेशन ला आहे. मी त्याला तिकडे वाट पाहण्यास सांगितले आणि मी आणि माझा मित्र, आम्ही कसेबसे ठाणे स्टेशन गाठले. विचार फक्त इतका होता कि ठाणे येथून दादर आणि दादरवरुन विरार ट्रैन २ तासात घरी परंतु ठाणे स्टेशनला पोहचायला १२.३० झाले होते. स्टेशनवर समजले की ट्रैन नाही आहे तेव्हा आम्ही प्लेटफॉर्म वर बसून राहिलो. परंतु नंतर लक्ष्यात आले की ठाणेहुन नालासोपारा बस असतात, त्याने जाऊ या. आम्ही ठाणे बस डेपोमधे गेलो तर त्यांनी सांगितले आता बस नाही आहे सकाळी ३.३० ची बोरीवली बस

आहे. आम्ही परत ठाणे स्टेशनवर आलो आणि प्लेटफॉर्म बसून राहिलो.  प्लेटफॉर्म स्वच्छ नसल्यामुळे खुप मछरही चावत होते. कसे तरी ३.३० वाजले आणि आम्ही ठाणे ST डेपोमधून बोरीवली बस पकडली आणि बोरीवलीला आलो. तेथून घरी पोहचेपर्यंत सकाळचे ६:३० झाले होते. अशाप्रकारे १ दिवसाच्या मतदानला आम्ही ३ दिवस बाहेर काढले. २०१४ चे ते इलेक्शन मी अजूनही विसरु शकलो नाही.

## आईपणाची आस - डॉ.रिबेका दोडती

माझं बालपण पुन्हा एकदा जगतेय...मला स्वतःला कलेकलेनं मोठ्ठं होताना पाहतेय....पडणं, धडपडणं,प्रयत्न करणं ,जिद्दीनं उठणं...सारं अनुभवतेय ...आई होताना... माझ्यातल्या कीर्र अंधारात उगाच चालू असायचं तुझं कूरबूरणं..तुझा प्रत्येक नवा दिवस आणि घट्ट होत जाणारी आपली मैत्री...
कधी तूझं शांत बसणं काळजाला घरं पाडणारं...कधी अवखळ झर्यासारखं सतत खळखळत राहणं...मला अल्लड बनवणारं...
क्षण मोजत जात होते...श्वासही कळू लागला होता...कधी भीती ..कधी धीर... कधी मुळूमुळू रडलेही आणि कधी बेभान हसलेही...एकटं असण्याचा प्रश्नच नव्हता...मुळात मी नव्हतेच...तूच होतास...अधिराज्य गाजवत होतास..  तू उमलत होतास...मी अस्त पावत होते..माझ्या अल्लडपणावर तू सहनशीलता कोरत होतास..माझ्या ऊथळपणाला संयमाची धार लावत होतास..माझ्या काळीजकातळावर प्रेमाची बाग फुलवत होतास...माझ्या ह्दयाचे ठोके आतनं ऐकत होतास...मला स्वत्व जाणायला शिकवत होतास...एक 'वात्सल्य ' घडवत होतास....

आत किती छान वाटतं नाही...छान मऊ पेशींची दुलई ,मोहवणारे तरंग, श्वासांचं संगीत,कोशातलं सुखासीन जगणं, मनसोक्त बागडायचं...पण ह्या सगळ्यांना संपवणारी ती 'घटका'...धीर संपत होता..गर्भगळीत होणं समजत होतं..प्राणांतिक वेदना आणि तूझा जन्म....अगदी उंचावरून कोसळणारा धबधबा जमीनीला भिडताच  शांत लयीत वाहत राहतो तसलं काहीतरी...गळून पडलेली तरी उभारलेली...ना वेदनेचा लवलेश ...ना आव्हानाचं भय...सारं शांत शांत...नवा जन्म...तू दिलेला नवा जन्म...आई'...

सारीच नवलाई...शून्यात पाहत राहायचास पण नजरेत आई कळायची...स्पर्शाचा गहिवर...इवल्याश्या मुठीची घट्ट पकड ...आपल्या मैत्रीचा हुंकारातला होकार...लोण्याचा गोळा कवेत आणि गाभुळलेलं मन...पराकोटीचं ममत्व, तत्परता ,उत्साह यांनी विनलेलं 'आईपण'....

तुझ्या हसण्यानं घायाळ होणं...तूझ्या करामतींनं बेजार होणं...सार्या प्रशंसेनं मनोमन सुखावनं..तुला तासन् तास न्याहाळणं..शतदा गोंजारणं...उराशी कवटाळणं...प्रेमात पडल्यासारखं...तुझ्यासोबत रात्र जागवणं...तुला उमलताना पाहणं...जगण्याचा अर्थच बदललेला...केंद्रबिंदू ही तूच आणि परीघही...सारंच जादूई ..सारंच भारलेलं...      एक छानसा बांध तयार झालेला...नेत्रांच्या कुशीत तुला जोजवणं...ईवल्याश्या तुला मोठ्ठं झालेलं पाहणं...खूप मोठ्ठं...तू  हसावस म्हणून माझ्या ओठांचं इंद्रधनू सतत ताणून ठेवणं..तुला जाणून घेणं...'आई' म्हणून तू ओळखणं..माझ्या कवेत शांत पहूडणं...किती समाधान ...सारं किती लोभस...

सतत धडपडत असतोस...काहीतरी नवीन हवं असतं...स्वतः शिकतोयस..आईला शिकवतोस.. कधी अडखळतोस...कधी लागतं..कधी धडपडतोस....पण थांबत मात्र नाहीस...प्रयत्न सुरूच...हीच प्रेरणा आहे आईसाठी...जगण्याची... आणि 'आईपणाची'....

# लव्ह,लाईफ & एलिफंट ॲन आफ्रिकन लव्ह स्टॉरी - दॅफ्ने शेल्डरिक --

## अपर्णा लव्हेकर

ही एक अनोखी प्रेमकहाणी आहे,ही आफ्रिकन लव्ह स्टॉरी डेव्हिड आणि दॅफ्नेची तर आहेच पण त्याच बरोबर हे दोघे आणि हत्तीची प्रेमकहाणी आहे, सगळेच प्राणी निसर्गाशी जुळवून घेतात. येणाऱ्या नैसर्गीक संकटाची त्यांना आंतरीक जाणीव होते. त्या संकटाशी सामना करायची त्यांची तयारी असते. निसर्गात होणाऱ्या बदलांना ते आनंदाने सामोरे जातात. आजुबाजूच्या निसर्गात ते आपल्या जन्ममरणाचा खेळ खेळतात. ही प्राण्यांची जीवनपद्धती आहे. डेव्हिड शेल्डरिकने प्राण्यांचं अतर्मन जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवनातील रहस्ये शोधुन काढली. हत्ती हा तर त्याचा आवडता प्राणी. हत्तीची बुद्धी , त्यांची संवेदनशीलता ,त्याची शक्ती ह्यांचा त्याने अभ्यास केला. हत्ती माणसांशी जुळवून घेतो , माणसावर खरे प्रेम करतो पण राग आला की माणसाला उधडुन टाकतो मात्र आपल्या लाडक्या कुटूंबाशी , आपल्या कळपाशी त्यांचेएकनिष्ठ संबंध असतात सगळ्या हत्तींना सांभाळुन घ्यायची व्रुत्ती असते. म्रुत्यूच्या बाबतीत हत्ती फार हळवा असतो. एखाद्याचा म्रुत्यू झाल्यास सगळा कळपच शोक करतो बरेच दिवस तो कळपच उदास असतो. हत्तींची स्मरणशक्ती चांगली असते. डेव्हिड शिकारी लोंकापासुन हत्तींना संरक्षन देई . पोरक्या आणि छोट्या हत्तींना घरी घेऊन येई त्यांचा प्रेमाने सांभाळ करी एकदा का ते मोठे आणि सशक्त झाले की जंगलात सोडुन देई. या त्याच्या प्रवासात दॅफ्नेने त्यांची जन्मभर साथ केली. हत्तीवर आणि इतर प्राण्यावरही तिने आईसारखी माया केली.

दॅफ्नेच्या कथेची सुरवात तिच्या आजोबा पासून होते. अठराशे वीस साली केनियाच्या गव्हर्नरनी तिच्या आजोबांना एक ऑफर दिली ते जर स्कॉटलंड मधल्या वीस कुटूंबांना आफ्रिकेत आणतील तर तिथली इंग्रज सरकार त्यांना शंभर एकर जमीन फुकट देईल तिचे आजोबा वीस कुटूंबासहीत जहाजाने प्रवास करीत केप ऑफ गुड होपला पोचले. तेथुन अनेक संकटाचा सामना करीत ते नैरोबीला आले आणि तिथुन जवळ असलेल्या आपल्या शंभर एकर जमिनीवर पोचले. सर्वप्रथम सगळी जंगल तोडुन त्यांना ती जमीन शेतीसाठी तयार करावी लागली. जंगल नाहीसे झाली तसे वन्यप्राणी पलिकडच्या जंगलात निघुन गेले . आदीवासी लोकांची मदत घेऊन आजोबा शेती करायला लागले. एके दिवशी पहाणी करण्यासाठी आजोबा शेतात आले. लांब गेल्यावर विश्रांती घेण्यासाठी ते थांबले. ते एका दगडावर बसले , इतक्यात शेजारच्या जुडुपातून एक वाघ आला आणि त्यांने त्यांच्यावर उडी मारली . आजोबांना वाटले आत्ता संपलं सारं त्यानी गच्च डोळे मिटुन घेतले. पण घोडा धावतच आला आणि वाघावर उडी मारली. वाघ उताणा पडला , तत्काळ त्यांनी घोड्यावर उडी मारली . घोडा त्यांना बेफाम वेगाने घरी घेऊन आला. तेव्हापासुन त्या घोड्यावर त्यांचे प्रेम होतं. त्यांला ते फार जपत असत. आदिवासी लोकांनाही त्यांनी प्रेमाची वागणूक दिली. पंधरावीस दिवसासाठी आजोबा जर कुठे गेले तर हे आदिवासी त्यांना जाऊन भेटत आणि परत घेऊन येत एका दिवशी जंगलात प्राणी आवाज करायला लागले , त्यांचे आदिवासी नोकर धावत आले आणि आत्ता टोळधाड येणार घरात चला घरात चला म्हणु लागले. मग सगळेच घरात गेले आणि दारं खिडक्या बंद करून घेतल्या . दोन तासानी आवाज बंद झाल्यावर ते सगळे बाहेर आले तर संपुर्ण शेत उध्वस्त झालं होतं. आपला आणि आपल्या कुटूंबाचा जीव वाचला म्हणुन आजोबांनी त्यांच्या प्रती क्रुतज्ञता व्यक्त केली.पुढे दॅफ्नेच्या वडीलांनी आर्मीत नोकरी केली . काही वर्षानी ते परत आले. मार्जोराशी लग्न केलं. बरीच जमिन विकत घेऊन ते शेती करू लागले. दॅफ्नेची आई चित्रकार होती. निरनिराळी चित्रं काढुन ती घर सजवीत असे. घर स्वच्छ ठेवित असे. घरात छोटे प्राणी आणि पक्षी खेळत असत म्हणुन दॅफ्नेला लहानपणापासुनच प्राण्याचा लळा लागला बुशी

नावाचा एक पक्षी तिच्या अंगाखांद्यावर खेळायचा. रिकी नावाचा मुंगूस तिच्या पायात घोयळत राहायचा. बुशी गेला तेव्हा तिला फार दुःख झाले. तिच्या आजोबाने तिला सांगीतले की तो आकाशात गेला तेव्हा कितीतरी दिवस ती तो दिसेल म्हणुन आकाशात पाहत राहायची. दॅफ्ने मग नैरोबीला शिकायला गेली . तिथे ती बिलच्या प्रेमात पडली. आई-वडीलांनी तिचं लग्न लाऊन दिलं. नंतर बिलला सावो नॅशनल पार्क मध्ये नोकरी लागली. दॅफ्नेला मुलगी झाली तिने तीचे नाव जिल ठेवलं. तिथेच सावो नॅशनल पार्कच्या वॉर्डनच्या ऑफिसात दॅफ्नेला स्टेनॉग्राफरची नोकरी मिळाली. डेव्हिड शेल्डरिक या वॉर्डनच्या हाताखाली ती काम करु लागली. जिलला ती ऑफिसमध्ये घेऊन जाई. तिची आया तिला सांभाळत असे आणि दॅफ्ने काम करीत असे.

केनियात स्वातंत्र्यासाठी लढा सुरू झाला किकीयू , मौ मौ वगैरे आदिवासी टोळ्यांनी बंड सुरू केले . इंग्रज कुठेही दिसु लागले की ते हल्ला करु लागले बिल आणि दॅफ्नेवर एकदा हल्ला झाला. एका हाताने तिचं डोकं खाली दाबुन धरत बिल त्यांच्यावर पिस्तुल चालवू लागला . कसे तरी दोघे घरी परतले. एकोणिशे बावन्न साली केनिया स्वतंत्र झाला त्यानंतर आफ्रिकेच्या जंगलात नविनच खेळ सुरू झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात हस्तिदंताची किंमत वाढली ऱ्हायना◌ेच्या शिंगाची किंमत वाढली त्यामुळे आदिवासी लोक या दोन्ही प्राण्याना मारू लागले. हे पोचर्स हत्तींना विषारी वाण मारत ते तडफडुन मेल्यावर त्यांचे दात काढुन नेत सरकारमध्ये तक्रार करूनही काही फरक पडलानाही कारण सगळीकडे भ्रष्टचार बोकाळला होता डेव्हीड आणि बिलला या पोचर्सवर नजर ठेवावी लागे त्यांना पळवून लावणे भाग होते दूर जंगलातल्या हत्तीवर नजर ठेवणे शक्य नव्हते मग जंगलातल्या हत्तीच्या पोरक्या पोरांना डेव्हीड आपल्या घरी घेऊन येई त्यांच्या घरी सॅमसन आणि फुतुमा नावाचे हत्ती लहानाचे मोठे झाले होते. या हत्तीवर डेव्हिडचं फार प्रेम होतं,लंडनला जाऊन त्यांने लग्न केलं होतं पण त्याच्या बायकोला हे जंगल हे प्राणी आवडायचे नाहित. तीन चार वर्षात ती आपल्या मुलीला घेऊन लंडनला परत गेली. आता डेव्हिडला घरी दारी फक्त प्राण्यांचाच आधार होता.

दॅफ्ने आपल्या संसारात स्थिर होण्याची स्वंप्न पाहत होती.पण हळूहळू तिच्या लंक्षात आलं की बिलचं संसारात लक्षच नव्हतं तो वेळेवर कधी घरी यायचा नाही जिलला घ्यायचा नाही. त्यांचा हॅपी गो लकी ॲटीट्यूड बघून तिला समजलं की घरची सगळी जबाबदारी तिलाच घ्यावी लागेल. तिचे वडील नियमीतपणाबद्दल फार आग्रही होते . आई-वडील काटकसरीने संसार करीत. ते दोघे घर स्वच्छ ठेवत. घरी येणाऱ्याचे आगत स्वागत करीत. तिला बिलच्या बेजबादार पणाचा फार राग येई . अजुन एका गोष्टीचा तिला संताप येत असे. बिल ऑफिसमध्ये ट्यूटीवर असतांना प्राण्यांना वाचवण्याचा प्रयत्न करे पण सुट्टीच्या दिवशी शिकारीला बाहेर पडे. शिकारीचा त्याला फार नाद होता. प्राणी मारण्याचा त्यांचा हा छंद तिला अजिबात आवडत नसे. लहानपणापासुन प्राणी सांभाळायचा तिला नाद होता. हळूहळू त्या दोघांचे जमेनासे झालं. मात्र दॅफ्ने कबुल करते की या बेबनावाचं कारण फक्त बिलचा बेजबादारपणा नव्हता. तिला डेव्हिडबद्दल वाटणारं वाढतं आकर्षण हे ही याचं महत्वाचं कारण होतं डेव्हिडचं भारदस्त व्यक्तीमत्व ,त्याचा समजदारपणा ,सगळ्यांना साभांळून घेण्याची व्रूत्ती,त्यांच प्राणी प्रेम आणित्याचा प्राण्यांचा अभ्यास एवढ्या गोष्टी दॅफ्नेच्या आकर्षणाला पुरेशा होत्या. दॅफ्नेचं प्रेम जेव्हा डेव्हिडच्या लक्षात आलं तेव्हा तो अस्वस्थ झाला. त्याचा स्वःताचा संसार उध्वस्त झाला होता म्हणुन तो दुसऱ्या कुणाचा संसार उध्वस्त करू ईच्छित नव्हता. त्यांने दॅफ्नेला तसे समजावले की तू बिलवर अन्याय करू नकोस. मी त्याची बदली कपतो. जिलमध्ये तू ईतकी बिझी होशील की तुला माझी आठवन ही राहणार नाही. मग शेवटी तिने विचार केला की बिल नको आणि डेव्हिड नको. जिलच्या शिक्षनाचाही प्रश्न होता तेव्हा ती सरळ नैरोबीला निघुन गेली. जिलला शाळेत घालुन ती नोकरी करू लागली, बहिनीकडे राहु लागली. एकदा तिला भेटायला बिल आला तेव्हा तिला राहवले नाही, तिने डेव्हिडच्या प्रेमाची गोष्ट त्याला सांगीतली बिलने अतिशय समजदारपणा दाखवला. हा तुझा प्रश्न आहे तू निर्णय घे म्हणाला. मग त्या दोघांचा घटस्पोट झाला. घटस्पोटासाठी तिकडे टोकाची दुष्मनी लागत नाही,मन न

जुळणं हे ही कारण महत्वाचं असू शकतं. जेव्हा डेव्हिडला कळलं तेव्हा तो पहिल्यांदा तिच्या आईवडीलांकडे गेला. त्यानतंर त्यांने दॅफ्नेशी लग्न केलं. जिलला हॉस्टेल मध्ये ठवून ते दोघे सावो नॅशनल पार्कमध्ये परत आले. तिला अँजेला नावाची मुलगी झाली. अँजेलाचा सांभाळ करणं जिलची काळजी घेणं आणि स्टेनॉग्राफरची नोकरी असा दॅफ्नेचा संसार सूरु झाला. पण डेव्हिड बरोबरचा तिचा संसार हळू हळू कसा विस्तार गेला हेच तिला कळलं नाही.

जंगलात पोचर्स हत्तींना मारत होते त्यांच्या पोरक्या हत्तींना डेव्हिड घरी आणि. दॅफ्ने त्यांचा सांभाळ करी. हत्तींची संख्या वाढत गेली पण ते मोठे झाले की जंगलात निघुन जात त्याचं दॅफ्नेला वाईट वाटे. ती तीन चार दिवस उदास राहायच. तेव्हा डेव्हिडने तिला समजावून सांगीतले की ज्यावेळी त्यांना संरक्षणाची गरज असते तेव्हा ते संरक्षण देणं आपलं काम आहे. एकदा का तेमोठे आणि सशक्त झाले की त्यांना त्यांच्या नैसर्गीक वातावरणात मुक्तपणे जगू द्यायला हवं. त्यांना कायमचं गुलाम म्हणुन डांबुन ठेवण्याचा माणसाला अधिकार नाही. त्यांचं आयुष्य त्यांच्या पद्धतीप्रमाणे जगू दिलंस तरच तुझं त्यांच्यावर खरे प्रेम आहे म्हणायचं, त्यांना अडवणं हा तुझा स्वार्थ आहे. प्रत्येक प्राणी आपल्यासाठी एक लोन(कर्ज) आहे. ते लोन वेळेवर फेडायला पाहीजे. दॅफ्नेला त्यांचे म्हणने पटलं, तिने असा कधी विचारच केला नव्हता. मग मात्र दॅफ्ने आपल्या ऑर्फन वल्ड मध्ये रमुन गेली. डेव्हिडच्या घरात सॅमसन आणि फुतुमा हे हत्ती लहानाचे मोठे झाले होते. सॅमसन नळ उघडायचा त्याला लावलेला पाईप सरळ आपल्या तोंडात घालुन पाणी प्यायचा , पाईपने अंगावर पाणी उडवून खुश व्हायचा. त्यांला आपल्या स्टेबलला लावलेली कडी काढता यायची. तो अगोदर फुतूमाच्या स्टेबलचं दार उघडुन देई मग आपल्या स्टेबल मध्ये जाई. जिल आणि अँजेलावर त्यांचं फार प्रेम होतं. त्या दोघी त्यांच्या पोटाखाली लपुन बसायच्या. या दोघींना सोंडेवर उचलायची त्यांला सवय होती. त्या दोघी उंच गेल्यावर घाबरत नसत. उलट त्यांना खुप मजा वाटायची. एका दिवशी कोरी नावाचा पक्षी जोरजोरात ओरडायला लागला तिच्या आदिवासी नोकरांने येऊन सांगीतले आत्ता पाऊस येईल पण दॅफ्नेचा विश्वास बसला नाही. पण थोड्याच वेळात धुंवादार पाऊस पडू लागला तेव्हा तिला कोरीचं फार कौतुक वाटलं. त्यांच्याकडे एक मोठ माजर होतं. त्याचं नाव ओल्ड स्पाईस कारण त्या नावाचे डेव्हिडचं आफ्टर शेव लोशन त्यांला फर आवडायचे. डेव्हिडने दाढी करायला सुरूवात केली की हा आफ्टर शेव लोशन घेऊन पसार व्हायचा. शेवटी त्यांने दार बंद करून दाढी करायला सुरवात केली. ग्रेगरी पेक नावाचा पक्षी सतत दॅफ्नेच्या खांद्यावर बसायचा मोठारीतून सगळीकडे फिरायचा. एकदा बोटीतुन प्रवास करतांना तो खाली  नदीत पडणार होता तेव्हा दॅफ्नेने त्याला आपल्या फ्रॉकमध्ये झेललं होतं त्यानंतर नदीतुन जाताना त्याला पिंजऱ्यात ठेवलं तर तो थयथयाट करायचा त्यांला तिचा पाऊडर लावायचा पफ फार आवडायचा तिने पाऊडर लावायला सुरूवात कपताच तो पफ घेऊन खिडकीतुन पसार व्हायचा हुप्पटी नावाचा झेब्रा तर सारखा तिच्या मागेच असायचा घरात तर मागे मागे असायचाच पण तिच्या बरोबर ऑफिसमध्येही जायचा. शेवटी दॅफ्नेने पुढच्या दाराजवळच्या झाडावर आपला फ्रॉक लटकवुन ठेवला आणि मागच्या दाराने ती बाहेर पडली ती ऑफिसमधुन घरी येईपर्यत तो त्या फ्रॉकजवळ बसुन होता. तिच्या ऑर्फन वल्ड मध्ये दोन शहाम्रुग होते. सावो पार्कमध्ये फिल्ड फोर्स कवायत करत असे हे सगळयांच्या अगोदर मैदानावर पोहोचायचे आणि त्यांच्या बरोबर आंनदाने लेफ्ट राईट करायचे एकदा दोन सोल्जर्स जोरजोरात भांडु लागले तेव्हा ते आंनदाने नाचायला लागले.

या पोरक्या प्राण्यांच्या संगोपनासाठी दॅफ्ने कष्ट ही खुप घेत असे हत्तींना ती पाऊडरचं दुध पाजवायची. ते छोटे हत्ती त्यामुळे जगू शकले. डेव्हिड इंग्लडहुन दूधाच्या पाऊडरचे डबेच डबे मागवी एकदा एक ऱ्हायनो तिच्याकडे आला. तिने त्याला पाऊडरचे दुध पाजले तर तो प्यायला तयारचं होईना. दोन तीन दिवसात तो अशक्त दिसु लागला तेव्हा तिला काळजी वाटु लागली. एका आदिवासी म्हातारीने तिला त्या दुधात खोबरेल तेल म्सळायला सांगीतले. आणि काय आश्चर्य! ते दुध तो गटागटा प्यायला लागला. दॅफ्नेच्या डोळयातुन घळाघळा अश्रु वाहायला लागले डेव्हिडने

तिच्या खांद्यावर हात थोपटत शांत केले तिच्या इंपालाला एक जखम झाली होती. तो बाहेर गेला तेव्हा बाहेरचे कुत्रे त्याच्यावर तुटून पडले आणि ते इंपाला तिथेच  पडला होता दॅफ्नेच्या रागाला पारावार राहिला नाही. त्याला किती यातना झाल्या याची तिला कल्पनाही करवेना. तेव्हा डेव्हिडने तिला पुन्हा समजावून सांगीतले की ज्यावेळी असा एकदम हल्ला होतो तेव्हा माणसाला काय किंवा प्राण्यांला काय ते दुःख जाणवत नाही कारण अशावेळी मेंदुतून इंडीमार्फिन द्रवाचा स्राव सुरू होतो त्यामुळे त्याला बधिरता येते. तो आर्मीत होता तेव्हा त्यानं पाहिलं होतं सैनिक जख्मी होत होते पण रक्त दिसेपर्यंत त्यांना त्याची जाणीवच होत नव्हती. दॅफ्ने ते ऐकुन शांत झाली पण तिला त्या वेळी कल्पनाही नव्हती की असाचं प्रसंग तिच्यावरही येणार आहे.

दॅफ्नेचा हत्तीचा कळप फार मोठा व्हायला लागला. अेलियानेर नावाची छोटी हत्तीण आली. ती फारच मस्तिखोर होती आलेल्या टुरिस्टवर ती पाण्याचे फवारे उडवायची तिच्या दांडगाईला सॅमसन आळा घाली. तो अेलियानेरला फार प्रेमाने सांभाळी. मोठी झाल्यावर ती या कळपाची मुख्य झाली कारण तोपर्यत सॅमसन जंगलात निघुन गेला होता. तो कधी कधी दॅफ्नेकडे येई दोन दिवस राहुन परत जाई. पण एक दिवशी डेव्हिड जंगलात येत होता त्याला सॅमसन दिसला. त्यांने जाऊन पाहिले तर विषारी बाण त्याच्या पायाला लागला होता आणि तो तडफडत होता. त्याची तडफड वाढतच गेली. शेवटी डेव्हिडने त्याची सुटका करण्यासाठी त्याला गोळी घातली. तात्काळ सॅमसन गतप्राण झाला. घरी आल्यावर मात्र त्यांला फार अपराधल्या सारखे वाटु लागले. तेव्हा दॅफ्नेने त्याला समजावून सांगीतलं की तो कसाही मरणारच होता. तु उलट त्यांची यातनेतुन सुटका केलीस.

आफ्रिकतेल्या हत्तींना पोचर्सचा त्रास होताच पण आता एक नविनच त्रास सुरू झाला. पोचर्सच्या बाबतीत डेव्हिडने वाईल्ट लाईफ मिनिस्ट्रीत बरेचदा सांगुन पाहीलं पण हस्तिदंताच्या  जबरजस्त किंमतीमुळे सगळे पैसे खाऊ लागले होते. आता हत्तीचा अभ्यास करण्यासाठी परदेशातुन शास्त्रज्ञ येत आहेत असं डेव्हिडला कळलं त्यांच्या सखोल अभ्यासामुळे आपल्याला खुप माहिती मिळेल असं त्याला वाटलं वाईल्ट लाईफ मिनिस्ट्रीने डॉ लॉ नावाच्या शास्त्रज्ञांना सावो नॅशनल पार्कमध्ये पाठवले. त्यांच्या बरोबर त्यांचे विद्यार्थीही होते. अभ्यासासाठी म्हणुन हे लोक हत्तींना मारायला लागले पोचर्समुळे पाच लाख हत्तींची संख्या आता तीन लाख झाली होती त्याचच त्याला दुःख होतं आणि आत्ता त्याच्याच डोळयासमोर त्याचेच हत्ती हे मारत होते. त्यांनी जेव्हा तीनशे हत्ती मारले आणि अजुन दोन हजार हत्ती तरी मारावे लागतील असं म्हणु लागले तेव्हा मात्र डेव्हिडचे डोकं फिरलं. तो सरळ वाईल्ड लाईफ मिनिस्टरसमोर उभा राहिला. तो अटीतटीवर आला होता. एकतर या डॉ लॉ आणि त्यांच्या शिष्यांना लवकर हाकलुन टाका नाहीतर मला हाकलुन टाका म्हणु लागला हा वाद जेव्हा विकोपाला पोचला तेव्हा त्या मिनिस्ट्रीने विचार केला की हे शास्त्रज्ञ काय केव्हाही येऊ शकतील आणि नाही आले तरी काही बिघडनार नाही पण डेव्हिडसारखा वार्डन आपल्याला शोधुनही सापडनार नाही त्यांने डॉ लॉला सरळ त्यांच्या देशात पाठवुन दिलं आणि नैरोबीतल्या पाचही नॅशनल पार्कचा हेड म्हणुन डेव्हिडची नियुक्ती केली.

डेव्हिडला हा मान काही सहजासहजी मिळाला नव्हता. सावो नॅशनल पार्क हे जगातले वन ऑफ द बेस्ट पार्क आहे ते डेव्हिडने केलेल्या कष्टामुळेच. एकोणिशे पन्नासमध्ये एक लॉरी आणि सहा कामगार घेऊन घेऊन आला होता तो जंगल साफ करण्यापासुन त्यानं सगळं केलं. आदिवासी टोळयांची मदत घेतली. त्यांच्याशी चांगले संबंध ठेवले आणि सावोचं रुपच त्यानं बदलुन टाकलं. त्यांने तिथे दोनशे बेडचं शानदार टुरिस्ट हॉटेल बांधलं सावो पार्कच्या भोवतालचं भव्य जंगल त्यांनं तसंच राहु दिलं हॉटेलच्या मोठ्या मोठ्या खिडकीतुन निसर्गाचे भव्य रुप प्रवासी पाहु शकतात. ठिक ठिकाणी तुम्हाला हत्ती,ऱ्हायनो ,झेब्रा, हरणं, मुंगूस वगैरे सागे प्राणी मुक्त विहार करताना दिसतात. कुंपणात असलेले वाघ सिंहही तुम्ही निर्धास्तपणे पाहू शकता. नयनमनोहर असे धबधबे तिथे आहेत. या पार्कमध्ये चांगल्या रस्त्यांचं जाळं विणलं गेलं आहे. छोटी धरणं, नद्यांना जोडणारे पूल आहेत. अनेक डाकबंगले आहेत.

डेविडने रेडियो नेटवर्क तेथे आणलं आहे. म्हणूनच प्रवासी जेव्हा या पार्कमध्ये जातात तेव्हा एकीकडे मॉडर्न वर्ल्डच्या खुणा दिसतात तर दुसरीकडे जुना भव्यदिव्य असा निसर्गही पाहायला मिळतो.

आता पाचही पार्कमध्ये डेविडची भ्रमंती सुरू झाली. तो पाचही पार्कची देखरेख करायचा. नव्या सोयी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करायचा. कित्येकदा डेफने आई एखादा प्राणी त्याच्याबरोबर असायचा. एका दिवशी बंटी नावाचा सुंदर इंपाला त्याच्याबरोबर होता. जंगलातून जाताना तो एकाएकी ओरडायला लागला. डेविडने मोठा टॉर्च लावून पाहिलं तर बाजूच्या झुडुपातून एक सिंह त्यांच्याकडे येत होता. डेविडला हे माहीत होतं की आपण आक्रमक झालो की ते पळून जातात. सगळे उतरले आणि मोठमोठ्या दगडांनी त्या सिंहाला मारू लागले. तो सिंह मागच्या मागे पळून गेला. बंटीमुळे त्याची मृत्यूच्या दारातून सुटका झाली. पण प्रत्यक्ष मृत्यू आला तेव्हा डेविडला कुणीच वाचवू शकलं नाही. एकदा दौऱ्यावरून परत येतांना तिच्या छातीत दुखू लागलं. डेफने म्हणाली की आपण हॉस्पिटलमध्ये जाऊ या. पण घरी येईपर्यंत त्याचं दुखणं कमी झालं. सकाळी हॉस्पिटलला जाऊ म्हणून थकलेला डेविड झोपी गेला. रात्री दोन वाजता त्याच्या छातीत दुखू लागलं आणि हॉस्पिटलमध्ये जाण्याअगोदरच त्याचा मृत्यू झाला.

डेफनेच्या दुखाला पारावार राहिला नाही. यावेळी तिचं सांत्वन करायला  प्रथम बिल आला. डेवीडचे मित्र आले. सगळ्यांनी तिला जाणीव करून दिली की तिला तिच्या दुखात बुडून राहता येणार नाही. तिच्या ओरफीन वर्ल्डला ती वाऱ्यावर सोडून देऊ शकत नाही तिला डेविडचे काम पुढे न्यायचं आहे. मग मात्र दुखा सावरून ती कामाला लागली. तिने डेविड शेल्दरिकवाइल्ड लाईफ ट्रस्टची स्थापना केली. या कामात तिला तिच्या मुलींची मदत मिळाली. नैरोबीला ट्रस्टचं मोठं ऑफिस आहे. पोरक्या हतींना दोन वर्षे सांभाळुन मग सावो नेशनल पार्कच्या जंगलात सोडून दिले जाते. केनिया सरकारही देफ्नेकडे छोटे हत्ती पाठवतं. ती अनेक प्राण्यांना सांभाळते हे आता सगळ्यांना माहीत झाले आहे. रोंमरून पोप आले तेव्हा त्यांना सगळे पार्क दाखवण्याची जबाबदारी केनिया सरकारने तिच्यावर सोपवली होती. आज सावो नॅशनल पार्कची व्यवस्था अंजेला व तिचा नवरा पाहत आहेत.

एकदा इंग्लंडहून आलेल्या मित्रांना डेफने पार्कमध्ये घेऊन गेली. हत्तीचे कळप तिने दाखवले. एकाने तिला विचारले की तुझी एलियानेर कुठे आहे. ती तिच्या जवळ गेली. तिच्या मानेवरून व गालावरून हात फिरविला. तिच्या मानेखाली हात घालताच त्या हत्तीने सोंडेने उचलून दूर खडकावर फेकून दिले. ती अलियानेर नव्हती तर कथेरीन होती. गडबडीत तिच्या लक्षात आले नाही. डेफने खडकावर आपटली. आपल्या पायाची हाडं मोडली हे तिच्या लक्षात आलं तिला आश्चर्य वाटलं की तिला त्या क्षणी दुखाची जाणीवच झाली नाही.तिला वेगळाच आवाज ऐकू आला. कथेरीन तिच्याकडे धावत येत होती. डेफनेने ओळखलं, आपला मृत्यू जवळ आला आहे. ती डोए मिटून देवाची प्रार्थना करू लागली, पण झालं वेगळचं. तिच्या लक्षात आला की तिच्या अंगावरून हत्ती प्रेमाने सोंड फिरवितो आहे. तिने डोळे उघडून पहिले तर ती अलियानेर होती. कथेरीन डेफनेजवळ जात होती. तेव्हा अलियानेरने ओरडून तिला आपल्या भाषेत सांगितलं की ती आपली मैत्रीण आहे. तेव्हा मग कथेरीनही तिच्या अंगावरून सोंड फिरवू लागली. मग मात्र डेफने बेशुध्द्ध पडल्ली, नंतर तिने खूप उपचार केले, जपानला जाऊन अक्युप्रेशरची ट्रीटमेंट घेतली नंतर तिचा पाय बरा झाला. जेव्हा अलियानेरने तिचे प्राण वाचवले की तेव्हाच तिने ठरवले की मी आणि माझ्या हत्तींची कथा लिहिन, मग अशाप्रकारे नंतर लव्ह,लाईफ & एलिफंट' या पुस्तकाचा जन्म झाला.

# कविता :-

## मी वाट पाहत थांबलोय --- सायमन मार्टिन

नाताळ आला संपून गेला

जसा जन्म माझा संपून गेला

०००

खूप उशिराने कळलं मला

नाताळ आला घराबाहेर येण्यापूर्वीच तारा मावळला

०००

शोधलं असतं तर सापडला असतास तू

तुला शोधणं दूरच राहिलं मी कधीच शोधलं नाही मला

०००

का असं होतं कळत नाही

पुन्हा-पुन्हा तू जन्म घेतोस मरण मात्र माझं टळत नाही

०००

बरे केले रोगी प्राण फुंकले मरणात

चाललो काही पावलं पाण्यावर

तुझं बोट सुटलं मात्र आणि मी बुडालो खोल पाण्यात

०००

आठवत बसलोय तोच नाताळ

मध्यरात्र झालेली उठून बसलो होतो अंथरुणावर

काही अक्षरं होती माझ्याजवळ काही थेंब होते

डोळ्यातून वाहणारे तुझं जन्म झाला म्हणून

०००

काही पावलं चालल्यावर येईल तो तुझा गाव

उघड माझा दरवाजा तुला डोळे भरून पाहायचंय मला.

०००

तुझं नाव घेतलं आणि भरून आले नाहीत डोळे

असं कधी झालं नाही तुझ्यासाठी डोळे नाही आले भरून

तर डोळे फुटून जातील माझे.

०००

ठाऊक असूनदेखील प्रेम केलंस माझ्यावर चांगल्यावर कुणीही करील प्रेम

तू आलास म्हणून निभावलं दुर्जनांचं.

०००

तेहतीस वर्षात मरायला पाहिजे होतं

तेहतीस वर्षात जे मरून गेले तरुण आहेत त्यांचे चेहरे आजही आपलं चुकलचं

०००

आपण भेटलो होतो हे खरंच वाटत नाही

तू बोलत नाहीस माझ्यावर कोण ठेवणार भरवसा?

०००

हेदेखील खरं नाही की तू बोलत नाहीस

तुला ऐकायला, पाहायला माझ्याजवळ कान-डोळेच नाहीत.

०००

वाट पाहतो मी नाताळची तो अखेरचा महिना असतो

संपतं एक वर्षाने आयुष्य माझं

तुझ्या जन्माच्या आशेवरच मी सामोरा जातो मरणाला

०००

दु:खातच सरतो नाताळ

कारण तो तुझ्याशिवाय असतो.

०००

तू भेटतच राहतोस नाताळ संपल्यावरदेखील

खोलवर काळजात रूतलेला भाला म्हणजेच तर नाताळ

०००

खात्री आहे मला तू कधीच देणार नाहीस अंतर मला

म्हणूनच वर्षभर मी नाताळ-गोठा सजवत राहतो

कोरा कागद आणि पेन घेऊन वाट पाहत थांबतो.

# शेनशा - फेलिक्स डिसोजा

रिश्ते में हम तुम्हारे बाप लागते हैं
नाम हैं शेनशा
हा हा हा हा हा हा हहा
असं जोरजोरात हसत
टाळीसाठी हात पुढे करणारा मायकल उर्फ मींगेल उर्फ शेनशा

मायकलला वाटायचं आपल्याला कुणी मायकल म्हणून
ओळखूच नये ओळखावं सगळ्यांनी शेनशा म्हणून
आपल्याभोवती लोकांचा गराडा असावा आणि
आपण बोलावेत धडधड शेनशाचे डायलॉग

शेनशा गप्प बसलेला कधीच कोणाला दिसला नाही
जेव्हा तो दिसायचा तेव्हा
मोठयाने बोलताना दिसायचा कोणाशीतरी किंवा स्वतःशी

आणि बोलताना तो हमखास सांगायचा दिवसातून एकदातरी
त्याचे अमिताभविषयीचे प्रेम आणि त्याच्यातल्या शेनशाविषयी

तो सांगायचा त्या रात्रींविषयी ज्या रात्री
तो मित्रांसोबत गेला होता कुठल्यातरी दुसऱ्या गावात
जेथे कुठल्यातरी सणानिमित्त दाखविला जाणार होता
पडद्यावर हिंदी रंगीत पिक्चर शेहनशाह

पिक्चर संपवून मित्र परतले गावात पण त्यांच्याबरोबर जो
परतला तो मायकल नव्हता तो होता शेनशा
तदनंतर त्याने कितीदातरी पाहिला शेहनशाह पण
शेहनशाह हा शब्द त्याला शेनशा असाच उच्चारता येत होता
अमिताभला तो अमिताफ म्हणायचा
पण जेव्हा तो बोलायचा अमिताभचे डायलॉग

तेव्हा स्पष्ट आणि मोठ्या आवाजात बोलायचा
आणि म्हणायचा
दिवार मध्ये अमिताफ बिडी फुंकायचा
म्हणून आपण फुंकू लागलो बिडी
आणि कुलीमध्ये अमिताफने वाहिली नसती ओझी
तर मी दुकानात गडी म्हणून लागलो नसतो कामाला
आणि टाळीसाठी हात पुढे करीत म्हणायचा
दुकानात आहे कामाला
म्हणूनच उचलता येतात ओझी अमिताफसारखी
हा हा हा हा हा ...हहा हा हा ....

अख्ख गाव मायकलला शेनशा म्हणून ओळखायचं
जस आख्खा देश अमिताभला ओळखायचा शेहनशाह म्हणून
तो म्हणायचा अमिताफ ऐवजी मिळाली असती त्याला संधी
तर हा गाव एका खऱ्याखुऱ्या शेनशाला मुकला असता
हा हा हा हा ..हा
टाळीसाठी हात पुढे करत म्हणायचा
नशीब गांडू तो क्या करेगा पांडू

मुलं खेळून दमूनभागून बसलेली असायची
तेव्हा शेनशा सांगायचा त्यांना अमिताभच्या
खाजगी आयुष्यातील गोष्टी
त्या इतक्या खऱ्या वाटायच्या मुलांना
कि त्यांना वाटायचं शेनशा अमिताभचा वर्गमित्र आहे आणि रोज
संध्याकाळी शुटींगनंतर अमिताभ पीत असतो दारू शेनशाबरोबर

जेव्हा बारा गोणीचे चोवीस रुपये
रॉनीशेठकडून घेताना चुकून पडायचे
हातातून एक दोन रुपये खाली
तेव्हा शेनशा म्हणायचा
रॉनीसेठ मैं अब भी फेके हुए पैसे नही उठाता

आणि पडलेले पैसे न उचलताच

निघून जायचा सपासप अमिताभसारखा

शेनशा बिडी फुंकायचा अमिताभसारखी

दारू प्यायचा बॉटल तोंडाला लावून

अमिताभसारखीच ओझी उचलायचा

आणि नाचायचा अमिताभसारखाच पायातल्या पायात

पण आयुष्यात तो कधीच चालू शकला नाही ताठमानेने

अमिताभसारखा

तो नेहमी वाकलेला असायचा

खताच्या गुळाच्या किंवा भुस्याच्या गोणीखाली

खाण्याचा शौकीन नव्हता शेनशा

दारूने भरलेलं असायचं पोट त्याचं पण

वाजायची कधीनाकधी पोटाची रिकामी खळगी

तेव्हा साध्या वड्यासाठी सुद्धा

तो अमिताभसारखा नाचताना दिसायचा

गावातल्या उनाड मुलांसमोर

स्वतःला शेनशा समजूनही

कुणी काम करवूनही दिले नाहीत पैसे

म्हणून कधी चकार शब्द काढला नाही त्याने किंवा

गावात कुणी संकटात आहे म्हणून

मदतीसाठी पुढे यावेत

इतके लांब नव्हते त्याचे हात

शेनशा जगत होता शेनशाचे आयुष्य

जगू शकला नाही तो कधीच मायकलचे आयुष्य

आणि एके दुपारी अमिताभचे डायलॉग बोलता बोलता

शेनशा कोसळला जमिनीवर

डॉक्टरांनी सांगितलं

भुकेनं खाऊन टाकली आहेत आतडी
आणि उरल्यासुरल्या आतड्यांचा
गुंता तयार झालाय पोटात

आठ दिवस घुटमळत राहिला त्याचा जीव शरीरात
आठ दिवस लोक सोडवत राहिले शेनशाच्या आयुष्याचा गुंता

काही म्हणत पिक्चरपायी उमदा तरुण वाया गेला
काही म्हणत कौतुकाने एकदातरी मिळायला हवी होती संधी
शेनशाला चित्रपटात
काही जण आपापसात कुजबुजत त्या रात्रींविषयी
आणि म्हणत ती रात्र अमावसेची होती
आणि कुठल्यातरी अतृप्त आत्माने काबीज केलं मायकलचं आयुष्य
जो अद्यापही घुटमळतोय त्याच्या बेशुद्ध शरीरात

पण फार काळ राहू शकल्या नाहीत अपूर्ण इच्छा
त्याच्या दुबळया होत जाणाऱ्या शरीरात
आणि निघून गेली अपूर्ण इच्छेची असंख्य भूतं
त्याच्या शरीरातून
तेव्हा कोणीच नव्हतं त्याच्या खाटेजवळ रडण्यासाठी

गावातील पोरांनी
लिहिली त्याच्या मरणाची बातमी बोर्डावर

मायकल उर्फ मींगेल उर्फ शेनशा याचे निधन

तेव्हा कुणीतरी म्हटलं
पुसून टाका ती पहिली दोन नावे
मायकल त्या रात्रीच मेला होता

आणि आज मेलाय
तो आहे शेनशा.

# कविता - महेश लिलापंडित

## पॉर्न

पॉर्न मुव्हीज्ना
शब्द नाही
मराठी पर्यायी
माझ्या जवळ
एवढा अभद्र प्रकार तो
तो प्रकार असतो
माणूसकीला काळाकुट्ट कलंक
ज्या क्षणी
माझ पाहून संपतं

## एग्जीस्टींग आणि जगणं

सगळ्या संदर्भाचा
मारत राट्टा
अ अननसाचा
ए फॉर अपाल्
बी फॉर मेहनत
आ सोशल स्टेटसचा
इ नोकरीचा
सी फॉर लठ्ठपगार
डी फॉर कारघरनोकर
ई फॉर चा
जगणं जातं
हरवून केव्हा
नशेची अनुभूती
कुठेय राव
पण

फुलटू हन्गाओव्हर
आणि कहर
कडक उन्हाचे
सपके डोळ्यांवर
त्या सणकेनं
जी जाते कापत मेंदू
जेव्हा कळतं
जीवन जगणं असतं दुर्मिळ
आपण फक्त
असतो अस्तित्वत
मेंदू करप्टीड
व्याख्या व्हायरसने
कृती प्रवण
जगणे सुंदर करण्याच्या
दशकी प्रयत्नात

# कविता  - तनवीर सिद्दीक़ी

## आई

देवा माझी आई खुप दारू पिते
तिला येत नाही अंगाई भावगीते
ती सिगरेट, गांजा, विडीही ओढते
त्याच हाताने माझी वेणीही माळते
हाथ थरथरतो पाजताना दूध बिध
पण आता ती राहु लागलीये शुद्धीत
आईबहीण बापावर शिवी ही देते
पण ती मला पेन्सिल वही ही देते
जुगार ही खेळते फावल्या वेळेत
चोरुन ही पाहते ती मला शाळेत
जेवणाला कचऱ्याचा वास ही येतो
चुलीच्या चटक्याचा आवाज ही येतो
मिळेल ते काम करते, भीक मागते
पण रात्री मला राजाची गोष्ट सांगते
पण ती ना पाव कधी ही खात नाही
रोजच डाळभात, का ते सांगत नाही
मला माहीत आहे कारण काय होते
कचऱ्यात मी होते आणि पाव होते !
होती पोटात भुक, होती डोळ्यात भुक
तिने मला उचलले आणि केली चुक
ती पुरुषी आहे...खरंतर पुरुषच आहे
पण आई, बाबा, मित्र तो सगळच आहे
आता तो आजारी आहे, त्याला बरे कर
देवा तू देव आहेस, स्वतःला खरे कर

तोच माझे शाळेत, समाजात 'नाव' आहे

तो नाही तर मी कचऱ्यातला पाव आहे

## कवीसंमेलन

एक कवीसंमेलन जमले होते

त्यात

अल्लाने क़ुरान नावाची कविता वाचली

कृष्णाने गीता

येशुने बायबल

बुद्धाने त्रिपिटक

नानक ने आदिग्रंथ

वाचल्यावर सगळ्यांना वाटले की

सगळ्या कविता सारख्याच आहेत

- चोरली की काय संकल्पना बाकी सर्वांनी

- कमी, आधिक ?

काय झाले असेल नंतर?

शंका, राग, अपमान, घृणा ?

च्छे, सगळे नुसतेच हसले

कवितेचे कागद बाजूला सारले

टाकून दिले पायाशी - पृथ्वीवर

आणि सगळे मित्र गप्पा मारू लागले

पण

आता रोज त्यांच्या गप्पात भंग होतोय

खाली पाहुन - पृथ्वीवर

हसणारे, आनंदी मित्र एकदुसरयाकड़े पाहतात

संशयाने, रागाने, अपमानित नजरेने, घृणेने, कीव येऊन

आणि विचारतात

स्वतःला

एक दूसरयाला

खाली पृथ्वीला उद्देशुन ही

की

चूक केली का हो कविता लिहून ?

मला त्यांचा प्रश्न रोज ऐकू येतो

मी रोज म्हणतो त्यांना,

नाही !

तुम्ही फ़क्त

कवितेखाली आपलं नाव टाकायला नको हवे होते

हेच चुकलयं तुम्हा सर्वांच !

कविता वाईट नाहीये !

तुम्हालाही एक दिवस ऐकू येईल प्रश्न

उत्तर तयार ठेवा

तुम्हाला कवितांची जाण आहे अस ऐकले आहे मी.....

उत्तर तयार ठेवा....

## माणूस बनून राहायचं जाते !! - सचिन मेंडिस

गावात असतो तेव्हा मी 'बोळींजकर' असतो
आगाशी, उमराळे अन नंदाखालकरांनी माझ्या गावाविषयी बोलले,
तर मी अस्वस्थ होतो, पेटून उठतो, जशास तसे उत्तर देतो !!
गावाबाहेर पडतो तेव्हा मी 'कुपारी' बनतो.
'दारू-बिर्याणी पाजली की कुपारी मत फिरवतो' असे ऐकले की माझे टाळके फिरते.
मी आगाशी, उमराळे अन नंदाखालकर मित्रांसमवेत निषेध व्यक्त करतो,
प्रसंगी बोलणाऱ्या ब्राम्हण, आगरी, वाडवळ जातींचा उद्धार करतो.!!

समाजाबाहेर पडतो अन लोकल गाडीत चढतो तेव्हा मी 'विरारकर' होतो.
डाउनला येणाऱ्या अन बोरिवलीला चढणाऱ्या प्रवाशाची ' आय-माय' एक करतो
विरारच्या हक्कासाठी लढा देतो, प्रसंगी कायदा हातात घेतो. !!

मी अजून पुढे जातो, दिल्ली मुंबई विमानात बसतो

पुढे बसलेला अन मराठी पेपर वाचणारा प्रवाशी माझे लक्ष वेधतो.
भय्या, गुजराती अन मारवाडी प्रवाशापेक्षा तो आपलासा वाटतो
मी 'जय महाराष्ट्र' म्हणून त्याला मंद स्मित देतो !!

मी अजून झेप घेत घेतो अन जगाला गवसणी घालतो,
गोऱ्या कातडीच्या 'जिनिवा' शहरात तो मला 'भारतीय' वाटतो
माझे देशप्रेम उचंबळून येते अन 'कहा से हो भाई' म्हणत विचारपूस करतो
'मै कानपूर से, और आप कहा से' म्हणत ग्लासाला ग्लास भिडते.
'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्तां हमारा' गीत मनोमनी वाजते !!

मी असतो कधी बोळींजकर, कधी कुपारी, तर कधी विरार का छोकरा,
बनतो मी मराठी, कधी बनतो इंडियन,
का कुणास ठाऊक, माणूस बनून राहायचं जाते,
'सारे विश्वची माझे घर' माझ्या पुस्तका पुरता उरते !!

## तुला जन्मायला हवं.. - एडवर्ड डिसोझा

ते विचारात गेले
प्रश्नांवर प्रश्न...
तू मात्र निशब्द
त्याचीच शिक्षा दिली तुला
डोकी काटेरी मुकुट अन  हातापायां खिळे  ठोकून...
 तू उठलास मरणातून आणि  संधी मिळाली आम्हांला आणखी एका पार्टीची.. .
पण तू असा उभा का?
दूर उंच कालवारीच्या कड्यावर... तुला तर आम्ही जन्माला घातलंय लखलखीत दिव्यांच्या गोठ्यात सालाबादप्रमाणे... .

तू कंटाळला असशील, थकला असशील
जन्म, मृत्यू नंतर मरणावरील विजय
सततच्या या चक्राला...  प्रत्येकवेळी सादर केली असेल तुला  उंची पेयं आणि मसालेदार चमचमीत खाणं
यानंतर स्नानसंस्कर, वाढदिवस, लग्नसोहळे
कार्यक्रम ठरलेलेच
नाकारता येणार नाही भेट देणं तुला..

आता पोटाचा घेर बदलल्याचं जाणवतंय
जाणवतोय  थोडसं चालल्यावर थकवा
धरधरून फुटतो घाम सर्वांगाला... जपावी लागते गोळी खिशात  रक्तदाब, कोलेस्ट्रोल वाढू नये म्हणून...

उबग आला असेल तुला या साऱ्यांचा
म्हणूनच तू उभा असशील
दूर टेकडीवर आमची वाट पाहत...
आम्ही येऊ
नक्कीच येऊ..
पण त्याआधी तुला  आमच्या मनात, हृदयात  जन्मायला हवं...

## जगणं - डॉ. रिबेका दोडती

अनोळखी लवचिक धाग्यानं
स्वतः भोवतीच  मी कोष विणतोय...
स्पर्धेच्या ट्रेडमिलवरून जीवाच्या
आकांतानं मी रोजचाच पळतोय...
माया मिळवली तरी मोहाचं
पोट भरणं अशक्य झालंय...
दाखवायला पोट धरून हसतोय पण
श्वास घेणंही कठीण झालंय...
शिल्लक  राहतेय शिल्लक सारी
तरी बाकी शून्यच येतेय..
शोधत फिरतोय भविष्याचं ओॲसिस
पण वर्तमानाचं  मात्र वाळवंट होतेय...
फूंकून फूंकून पितोय आजकाल
सार्या जबाबदार्यांचं ताक..
वाकून वाकून सुखाच्या राणीपुढे
आता स्वाभिमानालाही आलाय बाक...
खळगी भरतो पोटची...पण
मनाची झोळी रिकामीच आहे...
बाजीगर होईन कधीतरी पण आता
जगणंच सौद्याला लावलं आहे....

# कादोडी कविता - बर्नड लोपीस

शाळीत असताना मला काईम वाट्यासा
का खपे ता खपॅदॅ एकदा कवीला भॅट्यासा
कवी दिखार्तॅ कॉहॉ. बोलातॅ कॉहॉ. रॅतॅ कॉहॉ
खाते का पेते का ? मन पॉट भरॉन बग्यासा

आयतीस कवीला 'वारॉन हाड्याशी' संधी आली

कबाडातनॅ नवा सदरा आन काडला जाकीट
खांद्या घायली शबनम त्यात लिकविला पाकीट
कवी मनानेस शेठ अहात्यात आहा आयकीलता
दोन हजाराइ नोट बगॉन काकुळदॅ
भगून पाकीट ढाकीलता

आज कवी भॅटनार बघून मनामिनॅ लाडू फुटलॉ
फेसबुकोर फटू टाक्यादो बघून कॅमेरॉ पान घेटलॉ

जिन्योर सडता सडता भागलॉ
नि मनात विसार आलॉ
कवी  दिहाशे तारे  बग्यादो भगून
ऑडा वरती सड्या लागलॉ

ग्राऊंड प्लस फोर बिलडिंगीतशी वरशी खोली
बिल्डींगूस अनधिकृत तॅ पुडॅ बॉल्याशी सोरी
एकदा लेबर कॉन्ट्रॅक्टरनॅ लिफ्ट बेव्हडली
खोल्यो विकॉन होताखोटी ती कार्डॉन निली

दारोर पाटी होती कवीआ नाव मिनॅ लिविलता
जहांगीर 'नावाला' बहुतेक घारामिनॅ
राज्य नूरजहाँसास होता.
बंद दारापुढे ऊबा रेऑन विसार कॅलॉ
बेल वाजवॉ गा ई तुटलेली कडी वाजवॉ
जात पडली कवीशी कदाचित लिवना सालू हायदे
डिस्टर्ब कऱ्या जायनॅ नि पावणो हातसॉ जायदॅ

हातातसा आमंत्रण परसादाघती धरला
हळूस कडिला हात धरॉन दार लोटीला
साळीमिनशी काळोखी वन रूम
आमंत्रणाहेगाट आतल्यंगा गॅलॉ तिगाळा बगिला
पाय टाकिताखोटीस घर खपलॉ.

कवी उघड्या आंगायॅ मोरीत ऊलॉ
सुलीपुडॅ ठावभांडे सोळतोतॉ
सुमाळणा कुहना नि कवी कुहनॉ
काळोखात कय समजात नॉता

जातिवंत कवी जरा पान नाय लाजलॉ
हातातशी गुंडी ठवॉन बिनधास्त बोयलॉ
या या...
दारोरशी बेल वाजलीस नायदे ना ?
लायटीआ काईम सॉकाट जालेलास अहातॅ
आन बेल पाण पक्की अगुनाळी जाले,
मोदी आल्यापासून
नीट करे करे पान काईम टाईम नाय
जडशे तडशे आमंत्रणे सालूस
त्याला देश फिर्याशी होस
आन माला गावे फिर्याशी होस
कविता वाचनाकरतान...

कवी पटकन माकून बोयलॉ
मागे एकदा कुनॅतरी दाराई कडी वाजविलीती
कडीइ निखळली आन  कडीऑ हूक
निखळॉस रॅलो 'मा घतीन'

बांदकाम जाहा तही कडी
कवीसास घर अँटिकूस अह्यासा
त्यात नवाल कादो वाटॅ पाय

खोआळातॅ गा येवॅान पाडत्यात ता बग्यासा

कवी बोयलॅा
आमशी जात पडली वेडी
आमशे घरे काइमशे निंबरात
टाळ्यो आयकील्यो गा  फुगात्यात
कविता करॅान पोटे कुनाय भरल्यात

एकदा तुमसॅा मेसेज आलतॅा खरॅा
सांस्कृतिक संमेलनातील आपली कविता
आमच्या कार्यक्रमात वाचली जावी..इ.
पान पाचशे रूपाशा मोबाईलवर
गदाळ जालेलॅ स्क्रीनवर पुडसा
नीट वाशिता पान आला नाय

माये पोरे गावात हांगात्यात
आमसॅा डॅडी भॅाठॅा कवी हाय
अभ्यासाला आमाला पुस्तक नाय
पण डॅडी काव्यसंग्रह मात्र छापणार हाय
जडे तडे कविता वासॅान वासॅान
ऑाबडे सन्मानपत्रे हाडल्यात
कय कबाडात नि कय बायार धूळ खात पडल्यात.
इंग्लीश शाळीइ फी परवडॅ नाय भगून
मराठी टिकव्यासा निमीत करॅान
दोनू पोरे मात्र झेड.पी.शाळेमीनॅ घायल्यात

कवी सहसा कुनाआ म्हण्णा खोडी नाय
फुकटशी मिळालीस ते प्याशी होडी नाय
काश्मीर काय आनी काशीमीरा काय
कवीला जकले ठिकाणे हारकेस
ब्रॅंड बिंडसा पन कय घॅनादॅना नाय

कवीशा पोरांना पण लांब फिर्या वाटातॅ
कतॅंतरी चायनीज मिनॅ खिर्या वाटातॅ
पण कवीशॅ खिशाई शिलाय काईम फाटलेली
बायकू पोराई होस जकली अहीस आटलेली

कवीआ पोरापारांना वाटातॅ,
डॅडी कडशा कडे कवी जालॅा
बायकूला वाटातॅ वॅडॅा सल्लोसॅा.
ऑा मदगाड कडॅ गळ्यात आलॅा
घारा पावणे येत्यात आन बिन शाने जात्यात
बॅंकेये शिपाय येत्यात आन हप्तॅा सुकले हांगात्यात
आमंत्रणाय हाळाव्यासा
गा नोटीस बगॅान फाळाव्यासा

बायकूला वाटातॅ
बाबाला एकदी कही एकदा  कंबक्ती आली
आन त्याने ज्येष्ठ नागरीकाहरी एक हांज घालविली
ऑा तड्यॅ माईकवरनॅ  कवितेये गाडे आंबडतोतॅा
लोकायो टाळ्यो आयकॅान बाबा मनात गाठी मारतोतॅा

दुहर्या दिहास दादीबाबा मनाय जाली तयारी
दुनिया मुठीत ठवनारॅा ऑास जावाय मिळालॅा तॅ भारी
दाव्वीतनॅ गरफळॅान मा शाळीआ हिका  तुटला
माई 'सॅाबा कामाला आली' पान या बोख्याआ हादला

नवी नवरी होती ताव याने मेरॅदेरॅ झॅपाटॅ घायलॅ
हळांब्यात पिलोटे आले नि याला कवितेऑ वेद लागलॅ
सांद सुर्याओ कविता आयकॅान
मॅ या हरी लगीन केला
अवलतीई दवलत आली नि
या तॅज काइमसा मावळला.
या तॅज काइमसा मावळला.

# कविता - रवीन्द्र लाखे

## टाळा

बाहेरून कुणीतरी कडी वाजवली
मी दरवाजा उघडला
बाहेर उत्साह उभा.
मी घराबाहेर आलो
दाराला कंटाळा लावला घट्ट.
कंटाळ्याची चावी गिळून टाकली.
ती पचेस्तोवर जेवायचे नाही ठरवले.
चावी नीट गिळली जावी
म्हणून वर पाहीले
चावी गिळतांना
बंद घरावर एक ढग दिसला.
त्या ढगापाठोपाठ मी निघालो.

## तप

लोक म्हणतात
तू येतोस
जातोस..
मग तू
थांबत का नाहीस..?
तुला माहीतीय;
कधी थांबशील
तेंव्हा
हे एक घने जंगल
उर्ध्वमूल अध:शाखांचे
करील स्वागत तुझे...
आणि
हे जग देईल
तुला एक जिवंत
प्रेतासन
ज्यावर खाली डोकं
वर पाय करून
तुला देवा
तप करावे लागेल
अनंतकाळ..
माणसाच्या पुनर्निमितीसाठी.

## बाळ

तुझ्या माझ्यात
आता काय उरलं आहे?
बंद दरवाजांची शांतता
आणि अनंत रात्र.

अनंत रात्रीच्या पायरीवर एक बाळ.
शांततेशी खेळतय आणि
अधूनमधून कुणाची वाट पाहातं आहे?
आपल्या दोघांना सोडून गेलेल्या
आपल्यातल्या नात्याची?

बाळ थकून झोपी जातं
पायरीवर
त्याच्या अनंत रात्रीच्या स्वप्नात
पहाट होते.

आता तुझ्या माझ्यात
काय उरलं आहे?
शांततेचे बंद दरवाजे
आणि अनंत कोलाहल.

## भरवसा ठेवा - पास्कोल कोरिया

चिंता देवा करमेना मंगल देव्हाऱ्यात
फिरतो तो अतृप्त शोधात शेजोळात
वात चिटूकली मिणमिणते मंदिरात
जागते डोळसपणे, सावध एकटी रात

दलित बदलतो कुस, व्याकुळ जीवनात
इच्छितो ह्याच आनंदात सुखाचा अंत
समाधानाने पोटावरुनी हात फिरवी पंत
अमिरीजीवनात नसते थोडीशीही खंत

गवत उगवे रानीवनी शालोमनासम साज
अल्पजीवी जगणे सुंदराचा घेई ध्यास
ना पिकविते, साठविते धान्य कोठारात चिमणी
विलासात रमते, बागडते आभाळी चिंता ना मनी

विश्वासून जगासोबत मज, उणे पडे ना काही
जगी श्रेष्ठ तुम्ही, पुरविन तुम्हा बारामाही
चोच दिली तुम्हाला अन्नाचा दुष्काळ नाही
शोधा म्हणजे सापडेल, मी वसे ठायी ठायी

## कोण होतीस तू - मेल्सीना तुस्कानो

त्या रात्रीचे ते भयाण स्वप्न
मला वेगळ्या विश्वात घेऊन गेलं,
सामोरे कोण नसताना हे माझचं
प्रतिबिंब मला मात्र दिसू लागलं,

आठव कोण होतीस तू तेव्हा
अन आता बघ तू काय झालीस,
तो फसवे प्रेम करुन गेला
तू मात्र त्याची वाट बघत राहिलीस,

खोल गेले ते पाणीदार डोळे
त्याच्या साठी रडून रडून,
गेलेला कधी आलाच नाही
बघितलेही नाही मागे फिरुन,

त्या प्रेमापायी तू लढली, चिडली
तुझ्या स्वतः च्या जन्मदात्यांशी,
पण चाहूल काही लागली नाही
प्रेम केलेल्या व्यक्तीच्या परतण्याची,

तेव्हा कोण, कशी होतीस तू
हसती खेळती आनंदी तू,
फसव्या प्रेमासाठी बदललीस तू
अन आता काय झालीस तू...

# कविता - रमेश सावंत

## विद्रोह

मी त्यांच्याकडे घेऊन गेलो विचार
ते म्हणाले,'तू हो लाचार'
आणि त्यांनी बांधले माझे हात
त्यांच्या गुलामीच्या बेडयांत

तरीही मी काही बोललो नाही,
मग माझ्या पोटावर जेव्हा त्यांनी मारली लाथ
तेव्हाही मी समजावले माझ्या लाचार भुकेला,
एवढयावरही भागले नाही म्हणून की काय
ते माझ्या गावात आले
नि फिरवू लागले बुलडोझर
माझ्या घरदारावर अन शिवारावर

गडयांनो,मग मात्र माझा तोलच सुटला
आणि मी भिरकावून दिले माझे नागरिकत्व
त्यांच्या वचननाम्याच्या भेंडोळयावर
ज्याकडे आज कुत्रं देखील ढुंकून बघत नाहीये

आता मात्र मी वाट पाहतोय
माझ्या पूर्वजांच्या रक्ताघामाने
वर्षानुवर्षे पेटत असलेल्या विद्रोहाच्या आगीत
या पाशवी सुलतानांचे मनसुबे
पुरते भस्मसात होण्याची....

झाडं
('जंगल बदलत आहे '- या कविता मालिकेतून )

झाडं उभी ठाकतात
मातीत आपले पाय रोवून
आणि मूकपणे ऐकतात
उदास होत जाणारी जंगलधून

झाडांचे हे असे उदास होणे
भकास करते जंगल विराणे
पाऊस,वारा अन धूळ खात
झाडे गातात जीवनगाणे

एक बरंय झाडांचं की
हलत नाहीत मुळापासून
हजारो घाव पडले तरी
गुमान बसतात मूग गिळून

तुमचं आमचं काय जातं?
जेव्हा झाड निष्प्राण होतं?
कळेल तेव्हाच त्याचं ऋण
जेव्हा जगू झाड होऊन!

# फॅशन पहावी करून - संजय लोहार

फॅशन पहावी करून फॅशन पहावी करून
जीन्स पॅंट पाहावी गुडघ्यावर फाडून
विविधरंगी चिंध्या एकमेका जोडून
'हेच मॉडर्न ड्रेसेस' सांगा कंठ फोडून

फॅशन पहावी करून फॅशन पहावी करून
डोक्यावरल्या केसांची स्टाईल पहावी करून
शेतासारखे रूप त्यांना पाहावे देऊन
फोफावले काही ठिकाणी पीक, गेले बाकी सुकून

फॅशन पहावी करून फॅशन पहावी करून
काटकसर कपड्यांची पहावी करून
तोकडवस्त्रा मल्लिकादेवीला स्मरून
नको त्या ठिकाणी देहा ठेवावे उघडून


फॅशन पहावी करून फॅशन पहावी करून
मॅचिंग नावाचा प्रकार पाहावा अवलंबून
टिकली चपला केस ड्रेस समरंगी लेवून
टकामका नजरा पाहून धन्य जावे होऊन

फॅशन पहावी करून फॅशन पहावी करून
दुर्वांच्या जुडीसारखी पोनी पहावी बांधून
स्त्रियांनी पुरुष, पुरुषांनी स्त्रिया पाहावे होऊन
गे मेरेजच्या मुंडावळया पाहावया बांधून

# कलाकुसर :-

## ऑस्टिन डाबरे :-







## रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-









**पॉल डिमेलो :-**







**लिओनार्ड रिबेलो :-**









# BIRDS IN MY BACKYARD

Stepping out on the second floor terrace of my house early one cold, wintry morning the sight unravelling before me held me spellbound. A bright yellowish Golden bird was busy feasting on a huge caterpillar it had found on the Tamarind tree growing adjacent to our house. I watched mesmerized as the bird with its golden feathers all gleaming in the morning sun and oblivious to my presence devoured the caterpillar and almost immediately found another amongst the leaves of the branch it was on. As I gawked at him from a safe distance another bird with a long flowing white tail suddenly pounced on him trying to flee with its juicy catch. The two continued to play amongst themselves for a good thirty minutes or so before they abruptly ended their fight and moved on to another tree. I was hooked to Birding for life.

That was seven years ago and such encounters were beginning to get quite common now that we had just moved into our newly built house which stood surrounded by tall trees and some dense foliage. Searching online for information I came to know that the two birds I had seen were the Indian Golden Oriole and the Male of the Indian Paradise flycatcher. Back then I remember waking up to noisy calls and chatter of around a tree full of pied starlings mixed with common Myna’s and Rosy starling’s, when the birds woke up after roosting and once again in the evenings when they gathered on the jackfruit tree right outside my Bedroom window. There were some tangle of trees, weeds and underbrush all around us. Greater Coucals with their typical short calls foraging in our garden early morning is a common sight even now. You can find the Asian Koel feeding on the ripe fruits of the papaya. Also present in the garden feeding on the seeds of the Tulsi plants, planted by my Mother, are the Ashy and Plain Prinia’s and the Spotted Munia’s. During their Nesting

season I have observed the Spotted Munia's plucking the long leaves of the lemon grass plants from our garden to build their nests. It is now common for us to sight almost daily the Black naped Monarch and paradise Flycatcher on one tree or another in and around someplace in the backyard while The Tickell's blue flycatcher announces the day break with continuous singing and calling first thing in the morning all the while sitting on one of our window sills.

The Jackfruit tree is also a favourite of another regular visitor - The Asian Paradise Flycatcher who normally drops by in the quite afternoons and wakes up anyone sleeping with its shrill, sharp and incessant calls. Another regular afternoon visitors were the group of Jungle babblers who could be heard before they could be seen. Almost always in a group of around eight to twelve they would forage noisily amongst the banana trees searching for grubs hidden amongst its fleshy bark. On quite afternoons The White Breasted Waterhen can be also be seen foraging amongst the thick shrubs their calls sometimes going late into the night especially during monsoons when it is their breeding/nesting season.

Parakeets visit our neighbours Lady Finger crop to feast on the tiny seeds of its mature fruits. The drumstick tree (***Moringa oleifera***) growing nearby are the favourite hunting grounds for the Purple Rumped Sunbird, pale-billed flowerpecker and for the Golden Orioles who would be regularly found feasting on the tiny caterpillars found on its tender leaves .You can catch the White-throated Kingfisher sitting quietly on the mango tree looking out for some scorpions or grasshoppers. And when he spots one he would suddenly make a dive amongst the fallen dry leaves and grab it after which he would devour it leisurely. Early mornings and during the day on weekends, Weekdays being very busy, was the only time left to explore the winged beauties. While just taking a walk in our backyard or in the garden one can stumble upon many interesting birds. There was the usual regulars like Greater Coucal, Ashy prinia, Plain Prinia purple-rumped sunbird all feeding on small insects on the various Hibiscus shrubs or on the Tulsi plants or on some flowering shrubs in and around our garden.

The habitat around our house can be described as thickly wooded or an urban forest type. There are dense wild shrubs of Hairy Fig (***Ficus hispida*** or kala Umbar or bokeda), Wild Mango (***Spondias pinnata*** or Ambada, or dholamba), Sand Paper or Toothbrush tree (***Streblus asper*** or Khoreta) on one side and huge trees of Mangoes (***Mangifera indica***), Jackfruit(***Artocarpus heterophyllus***) , Tamarind(***Tamarindus indica***), Monkey Jack fruit (***Artocarpus lacucha*** or Kshudraphanas),Aden apple(***Thespesia populnea*** or Bhendi) Wild Almond tree(***Sterculia foetida*** or Jangali badam )and Barringtonia(***Lecythidaceae*** or Nevar)on the back side. The Lantana (***Lantana camara***) flowering shrubs which are spread sporadically in between add some colourful variety to the habitat.

Many of my birding encounters have been pleasant surprises or chance happenings. I remember one incident some four years back when I Was Down with fever and bedridden with massive weakness continuously for some three days .On the fourth day I felt a little better so thought of taking a stroll on our terrace. As usual eyes were out searching for any bird movement on the adjoining trees. Saw a Sun-bird couple feasting out on some ants on the neighbouring Mango tree so I excitedly ran down and got my Camera. I was trying to get a proper angle to frame a shot when I noticed this Shikra (A bird of Prey) quietly but hungrily feasting on an Oriental Garden Lizard freshly killed by him. The Shikra Immediately noticed my presence but continued with its meal. Keeping an eye out on me I watched him quietly finish his meal before flying off. I managed to get some decent shots of the bird looking at me while holding its half-finished catch in its talons.

Another time I managed to get three lifers (A species that a birder has seen and identified in the wild for the very first time in their life is called a Lifer) during a span of around two and a half hours spent around the house. It was a sunny Sunday morning and I was standing in my backyard with a hot cup of tea when I spotted a Male paradise Flycatcher with its trademark white flowing long tail jumping amongst the branches of a Mango tree trying to catch some insects. As I moved closer to try and click some pictures without disturbing him a Black-naped monarch flew right past me and sat so close on a shrub that I had to actually take a few steps back in order to focus with the telephoto lens mounted on my camera. Moving on a little further I got the third surprise: A Tickell's blue flycatcher swinging from a dry creeper hanging from a tree. What a day it was to get three lifers within such a short time span.

The joy and happiness experienced after nature springs such surprises has no parallel. It was similar exuberance that I felt after spotting the extremely secretive orange-headed thrush in our backyard some two years back around December. This bird from the thrush family is common in well-wooded areas of the Indian Subcontinent and Southeast Asia. Most populations are residents. I was out shooting some birds when the Thrush flew and landed in some dense bushes some distance ahead of me. I managed to get couple of record shots of this orange beauty. Last year around November was another such time When on an quite Sunday afternoon reading the newspapers while sitting our terrace I noticed some movement on top of the Moringa tree in front of me. I immediately fetched my camera and fired some shots of the bird. Looking at the markings and colour I assumed it to be a Eurasian wryneck, a migratory bird which gets its English name from its ability to turn their heads through almost 180 degrees. If indeed this was a Wryneck it would be a new addition to the backyard list. But the Markings and colour of this bird had me confused so I sent the picture to a senior birder friend for ID confirmation. He wrote back to say that it wasn't a wryneck I had found but a Banded bay cuckoo a species of small cuckoo found in the Indian subcontinent. They are mostly found in well-wooded forests, mainly in hill areas and Insects are their primary diet.

The latest and newest addition to the list has been a Grey bellied Cuckoo which was sighted by me while on a bird walk in the backyard with a friend. This happened on the first weekend of January this year when one of my friend had dropped by for clicking the Banded bay cuckoo. We did not get the Banded bay but got the Grey bellied Cuckoo instead, a lifer for me and for my friend as well. That's how nature works. In surprises!!!

Earlier when I started all I owned was a small Canon point and shoot with some 12x digital zoom. Learning from my fellow birders my focus started turning slowly but surely more towards documenting the various details about these birds I kept seeing around in my garden and backyard. I also managed to get decent photographs of them. By this time I had graduated to a DSLR and a good birding lens. (Nikon D7000 and the versatile Nikkor 80-400 VR-II). I got myself a good pair of binoculars too so as to observe the birds and their behaviour more closely. The binoculars were also of immense help in identifying the Bird and to study them in their own world and habitats without being disturbed. It was a great treat to watch these beautiful creatures foraging (search for food), preening (tidy and clean its feathers with its beak), feed their young, defend their territory from predators and going about their normal routine as I watched them through the binoculars without any disturbance or harm to them. The Latest addition to my shooting equipment has been Nikon's excellent 200-500mm VR Lens.

Couple of times the thought did enter my mind and I wondered how many species of birds would there be around my backyard. So one fine day I sat and made a list of the Wide variety of avifauna (bird life) that I had sighted and recorded in and around my garden and backyard. I was amazed and pleasantly surprised to find that the list crossed the fifty mark at the first try which was around a year back. With the additions of sightings in the year gone the list has reached to almost sixty. Looking at the list one can safely say that National parks are not the only place one can discover wildlife and some rarities. I consider myself blessed to be a witness to such beauty that too at such close quarters.

So here goes the list and with it some Photo Highlights:

1.Indian Pond Heron
2.Little Egret
3.Cattle Egret
4.White Throated Kingfisher
5.White Breasted Waterhen
6.Shikra
7.Black Kite
8.Brahminy Kite
9.Spotted Owlet
10.Long Tailed Shrike
11.Common Myna
12.Bank Myna
13.Asian Pied Starling
14.Purple Rumped Sunbird

15.Purple Sunbird
16.Ashy Prinia
17.Plain Prinia
18.Orange Headed Thrush
19.Blyth's Reed Warbler
20.Jungle Babbler
22.Little Green Bee Eater
23.Scaly Breasted Munia
24.Indian Silverbill
25.Red Vented Bulbul
26.Red Whiskered Bulbul
27.White Browed Bulbul
28.Eurasian Cuckoo
29.Common Hawk Cuckoo
30.Indian Cuckoo
31.Black Drongo
32.White Throated Fantail
33.Asian Paradise Flycatcher
34.Black naped blue Monarch
35.Tickell's Blue Flycatcher
36.Indian Golden Oriole
37.Rose Ringed Parakeet
38.Oriental Magpie Robin
39.Baya Weaver
40.House Sparrow
41.Common Tailorbird
42.Coppersmith Barbet
43.Zitting Cisticola
44.Common Iora
45.House Crow
46.Asian koel
47.Greater Coucal
48.Common Hoopoe
49.Pale billed Flowerpecker
50.Barn Swallow
51.Brahminy starling
52.Indian Roller
53.Asian brown flycatcher
54.Banded Bay cuckoo
55.Pied Cuckoo
56.Rosy Starling
57.Indian Cormorant
58.Green Warbler
59.Blyth's reed warbler
60.Grey-bellied Cuckoo

You can follow my photography page at following links:

https://www.facebook.com/LeonardoDaFotogravinci

https://500px.com/LeonardRebello

https://www.instagram.com/leonardodafotogravinci_/